अमेरिकेंतील हिन्दी सेनापती

वंगवीर सुरेशचंद्र विश्वास

अद्भुत-घटना-पूर्ण चरित्र

शंकर गंगाधर जोशी
अहमदनगर.

किंमत] १९५० [१२ आणे

आझाद हिंद सेनेचे सरसेनापती

—○ श्री सुभाषश्चंद्र बोस ○—

यांचे स्मृतीस

अमेरिकेंतील प्रजातंत्र राज्याचा सेनापती

वंगवीर सुरेशचंद्र विश्वास

[एक हृदयंगम जीवन चरित्र.]

अनुवादक

शंकर गंगाधर जोशी, संगमनेरकर.

हिंदी कहावत कोश, राष्ट्रभाषा मुहावरा कोश व हिंदी बाल व्याकरण

कर्तव्य भूमिति सौंदर्याकृति इ. पुस्तकांचे कर्ते

बँक रोड, अहमदनगर.

सर्व हक्क स्वाधीन

प्रजातंत्र भारत दिन शके १८७१ } किंमत १२ आणे { सन १९५०

– मुद्रक –
दत्तात्रय शंकर जोशी,
नवभारत मुद्रणालय, अहमदनगर.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

मुंबई–परचुरे पुराणिक मंडळी, तुकाराम पुंडलीक शेटचे राधाकृष्ण स्टोअर्स, कुलकर्णी बंधु ठाकूरद्वार, बापट आणि कंपनी समर्थ-बुकडेपो, भारत बुकडेपो, बॉम्बे बुकडेपो गिरगांव, लख-वानी बुकडेपो रामकृष्ण बुकडेपो गिरगांव, दादर बुकडेपो, नरेंद्र बुकडेपो व दादर येथील सर्व बुकसेलर्सकडे.

पुणें – न्यु किताबखाना, हिन्दमाता मंदिर, लक्ष्मण ना. गोडबोले, नेर्लेकर बुकसेलर, व्हीनस बुकडेपो, न्यू पूना बुकडेपो स्वस्तिक ग्रंथ भांडार. नगर, सोलापूर, नासिक, धुळे, जळगांव येथें पुस्तक विक्रेत्याकडे मिळतील.

अहमदनगर–नवभारत मुद्रणालय. **संगमनेर**–शिवाजी प्रेस.

– प्रकाशक –
शंकर गंगाधर जोशी
नवभारत कार्यालय, अहमदनगर.

अनुवादकाचें मनोगत.

वीर पुरुषांची चरित्रे वाचून वाचकांच्या हृदयांत वीरतेचा सांसार होऊन ती उचंबळून कार्योन्मुख व्हावीं हें साहजीक आहे. भीष्मार्जुनतुल्य वीर प्रसवणारी ही मातृभूमि परदास्यामुळे स्वावलंबन व आत्मतेज विसरली, तीच भारतमाता आज स्वदेशी, बहिष्कार, सत्याग्रह, करबंदी यांच्या तपोबलानें स्वातंत्र्य सुखाच्या परिसरांत प्रजातंत्र भारताचे महत्पदावर आरुढ झाली आहे.

सुमारे पंचवीस वर्षापूर्वीच्या काळाच्या उदरांत पूर्व गोलार्धा वरील एका अवनत देशांत जन्मून, पश्चिम गोलार्धावरील एका प्रचंड प्रजासत्ताक राज्यांत स्वावलंबनानें व आत्मबलानें एक बंगाली वीर प्रसिद्धीस आला.ज्या बंगाली राष्ट्रस लॉर्ड मेकॉलेसाहेबानें "भागूबाई" (Effeminate) या शब्दानें हिनविलें, त्याच देशांत असा वीर निर्माण व्हावा हें महद्भाग्य होय. या पुरुषाचें विचित्र घटनापूर्ण असे चरित्र इंग्रजी, बंगाली, पोर्तुगीज, हिंदी इ. अनेक भाषांत छापून प्रसिद्ध झालें आहे. वीरतेचं बालकडू प्यालेल्या महाराष्ट्रीय वाचकांपुढे त्या वंगवीराचें चरित्र ठेवावें हाच हेतु घरून त्याचा अनुवाद केला आहे.

स्वराज्य प्राप्तीनंतर आपल्या देशांत सर्वच प्रकारचे संक्रमण होऊ लागले आहे. परकीय आक्रमणापासून स्वदेशाचे संरक्षणाकरितां राष्ट्र संरक्षक दलें, ग्रामरक्षक दलें, (होमगार्ड) अशी संघटक दलें, सरकारी प्रोत्साहनानें निघू लागलों आहेत. अशावेळी देशांतील तरुण पिढीतून शूर, घाडसी, कर्तृत्ववान व रणधुरंधर सेनापति. भूदल, नौदल व वैमानिक दलांकरितां अव्याहत निघत रहावेत. अशी आपल्या सरकारची महनीय इच्छा असणें साहजीक आहे. म्हणून आपल्याच देशांत निर्माण झालेलीं जीं नररत्नें परदेशांत शूर सेनापति होऊन कीर्तिसंपन्न होऊन गेली, त्यांचीं चरित्रं बाल, तरुण व प्रौढ स्त्री पुरुषांना मार्गदर्शक व वीरोत्साहवर्धक होतील या हेतूनें हें पुस्तक पुनर्मुद्रित करण्यांत येत आहे. बाल, तरुण व वृद्ध या सर्वांस हें पुस्तक वाचनीय आहे; हें केसरी सारखी वृत्तपत्रे व म. म. प्रा. पोतदार यांचे अभिप्रायांवरून वाचकांस सहज कळेल.

अनुवादक

प्रस्तावना.

माझे मित्र, श्री. शंकर गंगाधर जोशी शिक्षक यांनी मराठीत अनुवाद केलेल्या 'कर्नल सुरेश विश्वास'चें चिमूकले चिरित्रास प्रस्तावना लिहिण्याचे काम मी मित्रेच्छा म्हणून पत्करलें आहे. वास्तविक पहातां, त्यांचे पुस्तकास प्रस्तावनेची गरज नाहीं; तें चरित्र आहे तरी नवल कथेसारखे आहे, तसेंच तरुणांस बोधप्रद व स्फूर्तिदायकही आहे. परंतु वाढती वहिवाट व कापरें कन्या वात्सल्य हयांच्या पुस्तक कर्त्यावरील जोड जबरदस्तीचें फळ मला भोगावें लागत आहे! आपल्या प्रथम कृतिकन्येच्या पहिल्या, सासरचे पाठविणीचे वेळीं कोणत्या लेखक पित्याचें हृदय कातर होत नाहीं ? पण सुख दुःखाचे मोहक मिश्रणाचे अशा प्रसंगीं, एखादी मुरलेली मावशी काकी न मिळाल्यास, पाठराखणीचे काम एखाद्या तरुण ताईमाईच्या अननुभवाचेच बोकांडीं पडतें. तसाच कांहींसा माझ्या प्रस्तावनेचा प्रकार आहे, तिच्या हातून पुरेशी पाठराखणी न झाली तर तो दोष माझा नसून ग्रंथकर्त्याच्या पक्षपाताचा आहे. असो.

आतां अलंकार, उपचार, विनोद बाजूला ठेवून वाचकांना विशेषतः तरतरीत तरुण विद्यार्थ्यांना माझे मनापासून असें सांगणें आहे कीं हें पुस्तक अवश्य वाचा. एकदा सुरवात केलीत म्हणजे साग्र वाचावयला सांगणे नको. एका पुढें एक रोमहर्षण प्रसंग वाचीत जातांना तुमचें कुतूहल सारखें जागतें व धांवतें राहील, नेत्र विस्फारित होतील, हृदय प्रस्फुरित होईल; व न कळत वेगानें ठेपलेला 'समाप्त' शद्व पाहून तुमची अतृप्त उत्कंठा 'शाबास वंगवीर, शाबास हिंदपुत्र' असें उद्गारील !

पाश्चिमात्य मेकॉलेच्या दुर्विदग्धदर्पाने आमच्या बंगबंधूंना सरसकट कृष्णकारस्थानी भागुबाई ठरवून २५ वर्षे झाली असतील नसतील इतक्यांत त्या धिक्काराच्या निधड्या निषेधाचा जिवंत जबाबच जणूं वंगभूमीच्या हृदयांतून ' सुरेश विश्वास' उद्भवला, व त्यानें आपल्या बिन भांडवली बहुरूपी बहादुरीचा झेंडा पश्चिमेत उभारून तेथे धन्यता मिळविली व आपल्या

– मातृभूमीचे मुख उज्ज्वल केलें, ह्याबद्दल कोणत्या हिंदपुत्राला स्वत.च्या सख्ख्या भावाच्या विजयासारखा सप्रेमाभिमान वाटणार नाहीं ? इंग्रजांच्या इतिहासरसिक म्हणवणाऱ्या आमदानींत झालेल्या ह्या ऐतिहासिक, अर्वाचीन वंगवीराचे चरित्रहि इतकें संक्षिप्त व त्रुटितच हाती लागावे हें शोचनीय आहे.

आजकाल अशा पुस्तकांची, म्हणजे प्रसह्यकारी पराक्रम, विजयी वीर्य, सफल साहस, यांच्या खऱ्या व काल्पनिक कथांची गरज फार आहे. देश दीर्घ निद्रेतून जागा झालेला आहे; मुख्यतः त्याच्याच अज्ञानानें व द्वैतानें त्याच्यावर पडलेल्या भयंकर अर्थहानि व तीहून भयंकर मानहानि करणाऱ्या दास्यशृंखला त्याला दुःसह झाल्या आहेत. व त्या कशा तोडाव्यात ह्या विवंचनेत तो तडफडत आहे. अशा काळीं हृदयाला विसविशीत करणाऱ्या पान् चट प्रेमकथा नको आहेत; तर पुरुषार्थप्रवण करणाऱ्या, हृदय वज्रदृढ बनविणा-या, स्वातंत्र्यसंग्रामोत्सुक करणाऱ्या वीरकथा आमच्या तरुण तरुणींच्या मनाचें खाद्य झाल्या पाहिजेत. तशापैकी ही एक सत्यकथा आहे, एवढे सांगितलें म्हणजे आणखी शिफारशीचो जरूर नाहीं. कर्नल विश्वास एक बगाली वीर होऊन गेला, किंबहुना सर्व हिंदभूमीच्या प्रेमाभिमानास पात्र होऊन गेला हें जरी खरें आहे तरी त्याच्या चरित्रांतील सर्वच गोष्टी अनुकरणीय आहेत असें समजू नये.

ह्या चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांत ग्राह्याग्राह्य काय आहे हें प्रायः उघडच दिसणारें आहे, तथापि प्रस्तावनालेखकाचे कर्तव्य म्हणून दोन तीन गोष्टींचा उल्लेख करतों.

१ कुमारवयांतील हूडपणाविषयीं--ह गुण अनेकवेळां कैरीच्या चिकाळ तुरट आंबटपणासारखा असतो हे समजून पालक व शिक्षक यांनीं अशा तरुणांशी सुजाण सहानुभूतीचे वर्तन ठेवल्यास सुपरिणाम होण्याचा संभव पुष्कळ आहे. निदान कुपरिणाम सहसा होणार नाहीं दुसऱ्यापक्षीं; जसें लो० टिळक पुष्कळ सुपारी खात. म्हणून लोकमान्य होण्यासाठी सुपारीचें आडमाप व्यसन लावून घेणे मुर्खपणाचें होईल; तसेंच, कांही उनाड मुलें मोठेपणीं सुरेश विश्वास, क्लाइव्ह यासारखी पराक्रमी निपजतात म्हणन बुद्ध्या उनाड बनण्याचे मुलांनी मनांत आणू नये.

२ कामिनी व कादंबरी यांचा मोह अत्यंत दुर्निवार आहे, योगी तपस्वी यांनाहि दुर्जय आहे. है जाणून असल्या मोहांविषयीं झुंजार शौर्यापेक्षां, पळपुटा विवेक च चांगला हें लक्ष्यांत धरून नेहमीं वागावें. साध्या शब्दांनी सांगावयाचें म्हणजे दारू व वेश्या यापासून नेहमीं दूर रहावें. या दोन बाबतींत विशषतः परदेशीं जाणाऱ्या तरुणांनीं विवेक व आत्मसंयमन धरणे फार जरूर आहे. आपल्या वर्तनानें स्वतःचे अब्रूबरोबरच स्वदेशाचीहि अब्रू राखणें किंवा घालविणें आपलेवर अवलंबून आहे, हें त्यांनीं कधींहि विसरूं नये.

३ कदापि स्वधर्माचा त्याग करूं नये; इतर धर्माविषयी अनादर नसावा; किंबहुना पूज्यभाव धरावा. सर्व धर्माचें सार, रहस्य एकच आहे हें जाणावें. सर्व धर्म ज्यानें केलें त्यानेंच आपल्याला एका विशिष्ट धर्मात जन्मास घातलें म्हणून आपल्या ह्या जन्माचें सार्थक ह्याच धर्माचे दुरभिमानरहित, सुजाण निष्ठेच्या आचरणांत आहे हें लक्ष्यांत ठेवावें.

'न जातु कामान्न भयान्न मोहात् धर्मत्यजेज्जीवितस्यापिहेतोः '

अर्थ--कामासाठीं मोहामुळे, किंबहुना जीव वाचविण्यासाठींहि स्वधर्माचा त्याग करूं नये.

हे शास्त्रवचन सतत मनांत वागवावें.

शेवटी, परमेश्वरापाशीं अशी प्रार्थना करतों की श्री.शं. ग. जोशी ह्यांनीं ज्या मुख्य हेतूनें हें पुस्तक लिहिलें तो, म्हणजे तरुण विद्यार्थ्यांस सन्मार्गास लावण्यास यथाशक्ति मदत करणारी सरस्वतीसेवा करावी; त्यांचा हेतु उत्तरोत्तर अधिक सफल होवो व त्यांस धनकीर्तीचा, महाराष्ट्र वाङमयास त्यांचे हस्तें सद्ग्रंथाचा, व वाचकांस मनोरंजनासह बोधांचा लाभ होवो,

संगमनेर देविदास भास्कर लेले. बी.ए.
१८४३ हेड मास्तर,पेटिट हायस्कूल
रामदास नवमी. संगमनेर,जि.नगर

अभिप्राय.

केसरी ३१-३-२३ सुरेशचंद्राचा लहानपणाचा हूडपणा पुस्तकीविद्येविषयीं तिटकारा, साहसकर्माची आवड, त्याचा ब्रम्हदेश, इंग्लंड, जपान व अमेरिका या देशांतील प्रवास, त्याच्या अनंत हालअपेष्टा, धर्मांतर, सर्कशीतील नोकरी व शिताफीचीं कामें अखेर अमेरीकेपैकीं ब्राझील देशांत कायमची वस्ती, विवाह, अमेरीकन सैन्यांत कर्नलच्या पदापर्यंत केवळ स्वपराक्रमाच्या जोरावर बढती इत्यादि हकीकती वाचल्या म्हणजे आपण एखादी अद्‌भुत कादंबरी वाचीत आहों कीं काय असें वाटल्याचून राहत नाहीं. हा कर्तृत्ववान धाडशी-पराक्रमी व विलक्षण सामर्थ्याचा पुरुष १९०६ सालीं मृत्यु पावला त्यांचें हें छोटें चरित्र अलौकिक माणसें देशाच्या पडल्या काळांतहि स्वपराक्रमानें व हिमतीनें असें नशीब काढू शकतात याची साक्ष देत आहे.

प्रो. दत्तो वामन पोतदारः- सुरेशचंद्र विश्वासचें स्फूर्तिदायक चरित्र मी वाचलें; चरित्र रम्य उतरलें आहे व तें लोकापुढे चटकदार पणे मांडलें आहे. तरुण लोकांना तें अनेक दृष्टींनी मार्गदर्शक होईल. लहाणपणापासून विद्‌यार्थ्यास योग्य मार्ग दाखविणारा न मिळाला म्हणजे मुलें कशीं बनतात, परतु त्यांतूनच जे वोर्यशाली आहेत ते पुन पुनः विघ्नें आलीं तरी ती आपला पराक्रम जगास कसा दाखवितात याचें सुरेशच्या चरित्रावरून उत्तम चित्र मनांत भरतें. आपल्या देशांत सांप्रत वीर्यप्रभाव प्रदर्शनास आज अनुकूल भूमि आहे याचा आनंद वाटतो. हत्यार मिळवावें व हत्यार गाजवावें ही माणुसकीची पहिली परीक्षा भारत संतानानीं द्‌यावी, हा सुरेश चरित्राचा एकच मुख्य बोध आहे व तो तरुणांस आपण लिहिलेल्या पुस्तकावरून सुचण्यासारखा आहे. हिंद भूमीच्या उद्‌धाराचा एक रस्ता सुरेश चरित्रापासून आपणास दिसू लागतो यासाठीं तें प्रत्येकानें वाचावें.

विद्यार्थ्यांस उपयुक्त पुस्तकें.

श्री. शंकर गंगाधर जोशी, बँकरोड अहमदनगर यांची सरकार मान्य व इतर पुस्तकें मुंबई, पुणें, नाशीक सोलापूर, नगर, धुळें जळगांव येथील सर्व पुस्तक विक्रेत्याकडे मिळतील.

१ **हिन्दी कहावत कोश**–मराठी हिन्दी म्हणी संग्रह किं. १ रु. १२ महाराष्ट्र राष्ट्रसभा पुरस्कृत डेक्कन व्हृ. ट्रॅ. सोसायटीने व मुंबईप्रांत बोर्ड ऑफ हिंदुस्तानी या संस्थांनी प्रशंसिलेला ; म. म. प्रा. दत्तो वामन. पोतदार यांची सुंदर प्रस्तावना; वृत्तपत्रांचे व तज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय

२ **कर्तव्य भूमिति** भाग १ व २ किं ८१२ दुसरी आवृति मुंबईत गिरगांव, परेल व दादर व पुणें जिल्ह्यांतील कांहीं विद्यालयांनीं क्रमिक पुस्तकांत प्रविष्ट केलेली आहे.

३ **कर्तव्यभूमिति** भाग ३ रा किं. १२ आ. २५० कृत्यें व परीक्षाचे प्रश्न इंटर मिजियट परीक्षेस अत्यावश्यक.

४ **भूमितिसौंदर्याकृति** २०० डिझाईन्स व नक्षीकाम किं ८१० रंग ज्ञान, रंग सौष्ठव व चित्र रचना कशी करावी याची सोपपत्तिक माहिती, व परीक्षांचें प्रश्न.

५ **हिन्दी बाल व्याकरण** (दुसरी आवृत्ति)किं. ८६

६ **राष्ट्रभाषा मुहावरा कोश** अर्थात् हिन्दी मराठी वाक्प्रचार कोश, संख्या ६००० किं. २८१२ विद्यार्थी प्रत किं. रु. २ न्युज प्रिंटवर

७ **वंगवीर सुरेशचंद्र** अमरिकेतीलहिन्दी सेनापतीचें अद्भुत घटना पूर्ण चरित्र, तिसरी आवृति, पाने ११२ किं १२ आणे.

८ **आगामी प्रकाशन** मराठीसे हिन्दी कहावतें और मुहावरे,

९ **हिंदी कहावत प्रयोगादर्श** दृष्टान्त रूपसे प्रयोगाविष्करण

सूचनाः–व्यापाऱ्यांस शें. २५ कमिशन मिळेल. सर्व पुस्तकें नवभारत मुद्रणालय अहमदनगर व शिवाजी मुद्रणालय संगमनेर या पत्त्यावर मागवावींत टपालखर्च व व्ही. पी. खर्च पडेल.

नवभारत प्रकाशन कार्यालय, अहमदनगर.

अमेरिकेतील हिंदी सेनापती



कर्नल सुरेशचंद्र विश्वास

वंगवीर सुरेशचंद्र विश्वास

१ नदिया व तेथील रहिवासी

बंगाल प्रांतांत नदिया परगण्यासारखा सर्वसंपन्न परगणा दुसरा क्वचितच असेल. याचें प्राचीन नांव नवद्‌वीप असें होतें. या जिल्ह्यांत सेन घराण्यांतील राजाचे पदरीं पूर्वीपासून विद्‌वान् व गुणी लोकांचा भरणा असे. या जिल्ह्याची कीर्ति त्याकाळीं चोहोंकडे दुमदुमत होती. हा जिल्हा अद्‌यापिही आपली कीर्ति तशीच कायम राखून आहे. या ठिकाणीं संस्कृत विद्‌येचा प्रचार, बनारस (काशी) किंवा विक्रमपूर (उज्जयिनी) पैठण या शहरांप्रमाणेंच चालू आहे. इतकेंच नाहीं, तर नवद्‌वीप हें महात्मा गौराङ्ग यांची जन्मभूमि आहे.

महात्मा गौराङ्ग ही एक दिव्य विभूति होती. त्यांचे विचार निरंतर आपले राष्ट्राचे उन्नतीकडे लागलेले असत. त्यांची श्रेष्ठता, औदार्य व धार्मिक प्रवृत्ति यांविषयीं प्रशंसा न करणारा एकही हिंदु नाहीं. त्या काळी अधर्मरूपी समुद्रांत बुडत असलेली हिंदुधर्माची नौका त्यांनीं सुखरूप पैलतीराला नेली हें प्रत्येकास कबूल करावें लागेल. तो काळ असा भयंकर होता कीं, लोकांची ईश्वरावरील श्रद्‌धा देखील उडाली होती, आणि परधर्मीय लोकांनी हिंदूंना जुलुमाने बाटवून अहिंदु करणें हेंच आपले कर्तव्य समजून, त्यांनीं चोहींकडे धुमाकूळ चालविला होता. जरी आपण महात्मा

गौराङ्ग यांना देवाचा अवतार नाहीं मानिलें, तरी ती एक अलौकिक अशी विभूति होती यांत मुळींच संदेह नाहीं. ह्या महात्म्याचा अवतार होऊन त्यावेळीं धर्माचा उद्धार न होता तर त्या भागांत आज धर्माचा ठाव ठिकाणही दुर्मिळ झाला असता. तेव्हांपासून नवद्वीप हैं तीर्थयात्रेचें एक मोठें स्थान समजले जात आहे. अलीकडे त्याचें नांव बदलून नदिया नांवानें तें प्रसिद्ध आहे. सर्व बंगाल इलाख्यांत अद्यापि त्याची महति सर्वमान्य आहे. याचें कारण तेथील लोकसंख्या मोठी हेंच केवळ नसून, ज्या प्रसिद्ध पुरुषांनीं स्वदेश व स्वाभिमान कायम राखण्याकरितां आपलें जीवित तृणवत् लेखिलें, अशा थोर व प्रसिद्ध पुरुषांची ही जन्मभूमि आहे, हेंच होय. बंगालप्रांताचे मध्यभागी असल्यामुळे या परगण्याची सुस्थिति आहे. येथें निळीची लागवड अतिशय होत असल्यामुळे परदेशी व्यापाऱ्यांचे पांढरे पाय प्रथम येथेंच लागले. ज्या जुलुमानें इंग्रजी व्यापाऱ्यांच्या धवल कीर्तीला काळिमा लागला, व ज्या जुलुमानें बंगाल इलाख्यांतील कित्येक जिल्ह्यांतील लोक गुलामगिरींत खिचपत होते, त्या जुलुमाचें नदिया हेंच मूळ स्थान होय. या परगण्यांत विश्वास नांवाच्या घराण्यांतले लोक रहात असत. या घराण्यांतलि लोक मध्यम स्थितींतील होते. ते फार प्रसिद्धिस आलेले नव्हते तसेंच ते श्रीमंतही नव्हते; तथापि आपल्या गरीब दुबळ्या शेजाऱ्यांच्या संरक्षणाकरतां त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करून गोरे मळेवाले लोकांशीं झगडा सुरू केला होता. वारंवार या वीर पुरुषांवर तसेंच सत्यप्रिय देशभक्तांवर परकीयांचे अघोर हल्ले होत असत व त्यांचेजवळ शस्त्रबल

व मनुष्यबल नसल्यामुळे त्यांचा मधून मधून सत्यानाश केला जात असे. दुष्ट शत्रूनीं त्यांचे घराची लूट करीत असावे व त्यांच्या स्त्रियांवर अत्याचार करीत असावे ! हरहर काय, त्या निःशस्त्र वंगबंधूंची दुर्दशा ! इंग्रज सरकारने जात्या पापभीरु मनुष्यांचीं शस्त्रास्त्रं काढून घेण्यांत कोणता पुरुषार्थ साधला ? तथापि धन्य त्या वीरशिरोमणी विश्वास घराण्यांतील लोकांची ! त्यांनीं जिवांत जीव असेपर्यंत झगडा बंद केला नाहीं व ते धैर्यानें सारखे लढत राहिले. त्यांनीं परोपकार व धर्म या द्वयीकरितां अशी आश्चर्यजनक कर्तबगारी दाखविली, ही काहीं कमी योग्यतेची गोष्ट नाहीं. सरते शेवटीं त्यांच्या या झगड्यानेंच त्या परगण्यांतील निळीची लागवड करणारे गोऱ्या मळेवाल्यांचे भयंकर अत्याचार बंद झाले व त्यांची कर्तबगारी फळास आली. आसपास निळीचे मळे असल्यामुळे त्या परगण्यांतील लोकांत हींवतापासारख्या रोगानेंही फार कहर उडविला होता, तरी शांतिपूर व किसनगंज येथील गवळी जातीचे लोक लाठी काठी फिरविण्यांत अद्यापहि कुशल आहेत, याची साक्षही पुष्कळ वेळां पटली आहे. तेथील बोदे व विशे नांवाचे डाकू लोक आजही महशूर आहेत यांचें शरीर व बल फार अचाट असतें. आजच्या युगांतले हे भीमच होत. नदिया (नवद्वीप) व तेथील निवासी अशाप्रकारें सुखानें व सर्वगुणसंपन्न असे आज नांदत आहेत.

२ नाथपूर येथील विश्वास घराणें.

नाथपूर हें नदिया परगण्यांतील छोटेसे गांव आहे. हें इच्छामती नांवाचे नदीचे कांठीं किसनगंजपासून केवळ चौदा मैल दूर आहे. पूर्वी हें गांव नदिया परगण्याची राजधानी होतें. व आजही या परगण्याचें हें मुख्य ठिकाण आहे. हें कांहीं फार मोठें किंवा प्रसिद्ध गांव नाहीं. तथापि नाथपुरांतील विश्वास घराण्यांतील पुरुष येथे कायमचे राहत आहेत. व आपला पूर्वापार नांवलौकिक सांभाळून आहेत. ह्या पुरुषांना आपण कुलीन तसेंच लोकांचे पुढारी असल्याबद्दल तिळमात्रही गर्व नाहीं, व ते चुकूनही आपले शक्तीचें अबडंबर-प्रदर्शन करीत नाहींत. असे असूनही त्यांची कीर्ति चारी दिशेस फडकत आहे. ते फार शीलवंत, उदार, दानशूर तसेंच धार्मिक आहेत; त्यांचे यशोबल वाळूतील मनोऱ्याप्रमाणें अल्पकालस्थायी नाहीं, तर हिमालयाप्रमाणें अचल व विस्तृत आहे. या पुराण व कुलीन घराण्यांत सुरेशचंद्राचा जन्म सन १८६१ मध्ये झाला. त्याचे वडील त्या वेळेस सरकारी कचेरींत नोकर होते. ते वैष्णव होते. नोकरी पेशामुळे त्यांचे घरी राहणें फारसे होत नसे. जेव्हां ते कुठे बाहेरगांवीं नोकरीवर जात असत तेव्हां आपले कुटुंबांतील मंडळीस घरींच ठेवीत असत. यावरून असें ठरतें कीं त्या काळीं बंगाली लोकांना कोणत्याहि प्रकारचे कष्ट पडत नसत. मध्यम स्थितीतलि बहुतेक लोक खेडेगावांत राहून शेतकऱ्यांप्रमाणें जीवनक्रम

चालविणें पसंत करीत असत. कोणासही राजधानी अगर इतर मोठ्या शहरांत राहण्याची इच्छा त्या काळीं होत नसे. याचें कारण शहरांतील थाटाची राहणी व रीतरिवाज पाळतां पाळतां त्यांच्य नाकी नऊ येत. म्हणून खेडेगांवांतील जे लोक शहरांतून नोकरीवर असत ते आपले कुटुंबास, मुलाबाळांस आपले बरोबर घेत नसत. या रिवाजामुळे ते आपले घरांतील पूर्वपरंपरा राखून व साधेपणा न सोडतां तेथे एकटे जाऊन तात्पुरत्या रहिवाश्याप्रमाणें रहात असत. वर्षातून एकदोन वेळ आपले गांवीं येऊन आपले कुटुंबांतील माणसांस व शेजाऱ्यापाजाऱ्यांस येण्याने आनंदवीत असत. अशा वेळीं शहरांतून गांवीं येणारे मनुष्यास व त्याचे आप्तेष्टांस किती हर्ष होत असेल ! व त्यांचे दिवस किती चटकन् निघून जात असतील बरें ?

३ जन्म व बालपण.

सरकारी नोकरीची बेडी पायांत असल्यामुळे गिरीशश्चंद्र यांना घरीं अधिक काळ राहतां येत नसे. त्यांना दोन मुलगे व तीन मुली होत्या. सुरेश हा त्यांचा जेष्ट पुत्र. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, या म्हणीप्रमाणें लहानपणापासूनच सुरेशला भीति ही कशी ती ठाऊक नसे. त्याची घिटाई इतर बालकांहून भिन्न होती. आगीनें चटका बसतो हें जाणून देखील आपले बोट आगीवर मोठ्या धिटाईनें तो धरीत असे. त्याचा क्रोध तर कांहीं विलक्षण असे.

आपले मनाप्रमाणें एखादी गोष्ट न झाल्यास त्याचे डोळे रागानें लालबुंद होऊन जात व आपले मनाप्रमाणें काम होईपर्यंत त्याला चैन पडत नसे. परंतु मायेच्या गोड शब्दांनीं त्याचा अनावर क्रोध तेव्हांच विलयास जात असे. जें काम छडीचा धाक दाखवूनही तो करीत नसे, ते दोन चार गोड शब्दांनीं होत असे. सुरेश हा मृदु वचनाच्या पूर्ण अंकित असे, यांत बिलकूल शंका नाहीं. वयानें त्याचे बरोबरीचे मुलांना जीं कामें करावयास कठीण, किंबहुना जी त्यांचे हातून सिद्धीस जाणे देखील अशक्य तीं सुरेश चटकन व अनायासानें तडीस नेत असे. तो धिंगामस्ती करण्यांत इतका घिटावला होता कीं दांडगाई करतांना दररोज नव्या नव्या होणाऱ्या जखमांची त्याला मुळींच क्षिती नसे. फार उंचावरून उडी मारणें, कोसचे कोस दौड करीत जाणें, भिंती, तट व झाडें यांवर सरासर चढून जाणें, हे त्याचे दररोजचे साधारण प्रतीचे व सरावांतले खेळ होते. कित्येक पुरुषांचा जन्म दुसऱ्यांवर हुकूम चालविण्याकरितांच केवळ असतो. तसाच आमचे चरित्रनायक सुरेश याचा जन्म वीर्यशाली होता. त्याचा शूरपणा, चपलता, करारीपणा इत्यादि सद्‌गुणांचा प्रभाव त्याच्या सोबत्यांवर इतका पडला होता की, ते स्वतः येऊन त्याला मुजरा करीत असत व त्याच्या आज्ञेची मार्गप्रतीक्षा करीत असत. यावरून हेंच उघड होतें कीं, सुरेशचे बालपणांतच नायक होण्यास लागणारे सदगुण त्याच्या अंगीं जन्मतांच होते. व पुढे त्याचाच परिपोष होत गला.

४ बाळपणचा अल्लडपणा, निर्भयपणा व करारीपणा .

कष्ट सहन करण्यांत सुरेश हा अधिक करारी होता. लहान मुलांना दिव्याचें तेज पाहून मोठी मौज वाटते हें आपण नेहमीं पहातों. असें एकही मूल नसेल कीं ज्यानें दिव्याच्या प्रकाशानें बोट जाळून घेतलें नसेल. सुरेश एक वर्षाचा असेल नसेल, अशावेळीं त्याचे दिव्यावर इतकें प्रेम असे कीं, आईनें रोखून धरून ठेविलें तरी तिचा डोळा चुकवून दिव्याचे तेजानें तो कधीं कधीं आपला हात भाजून घेत असे. एके दिवशीं सायंकाळीं आई घरांत कामकाज पहात असतां सुरेशनें रडण्यास आरंभ केला. त्यानें रडून रडून इतका आकांत केला कीं त्याला पलंगावर एकटें निजवून घरांत कामकाज करणें त्याच्या आईला बरें वाटेना. खोलींत काचेची नळी नसलेला एक मामुली दिवा जळत होता. तो अशा ठिकाणीं असे कीं कोणीही मूल सहज हात लावू शकेल. या सर्व गोष्टींचा विचार करून सुरेशला एकटें टाकून जावयाचें नाहीं, असा त्याच्या आईचा निश्वय असे. हा कधीना कधीं आपला हात भाजून घेईल याचा तिला नेहमीं धाक वाटत असे. त्या दिवशीं तिच्या मनांत सहज असा विचार आला कीं, दिव्याचे तेजावर हात धरला असतां भाजून दुःख होतें हें त्याला एकदां कळलें कीं मग तो रडेल व पुनः कधीही दिव्याजवळ जाणार नाहीं. विचारास कृतीचे रूप देण्यास

तिचा हात पुढे सरसावला व तिनें त्याचें एक बोट दिव्यावर धरलें. पण चमत्कार हा कीं सुरेश रडला नाहीं किंवा त्याच्या डोळ्यांत एकही अश्रू दिसला नाहीं. त्यावेळीं सुरेशनें आपले अंतःकरण इतके निष्ठुर केलें होतें कीं, पहाणाराला त्याचा हात भाजला आहे किंवा त्यास दुःख झाले आहे, हें त्याचे मुखावरून यत्किंचितही दिसत नव्हेंत. त्याची ही स्थिति पाहून तिला फार आश्चर्य वाटले. तिला प्रेमाचे भरतें आलें व पुनः कधींही सुरेशला शिक्षा करावयाची नाहीं असा तिने कानाला खडा लाविला. त्यावेळीं सुरेश अवघा दोन वर्षे वयाचा होता.

सुरेशपेक्षां दुपटीहून अधिक वयाचे मुलांना देखील, जी अवघड गोष्ट करता येत नसे ती त्यानें केलेली ऐकून त्या घटके-पासून सुरेशचा धीटपणा व चंचवृत्ति याविषयीं सर्व गांवभर प्रसिद्धि झाली. एके दिवशीं घरांतील मनुष्यें आपापलीं कामें करण्यांत गढून गेली होतीं. सुरेश एकटाच अंगणांत खेळत होता. तो पडत झडत व हळूहळू पावले टाकीत एका बांबूच्या शिडीपाशीं गेला. ही शिडी एका भिंतीला टेकलेली होती. सुरेश त्या शिडीवर चढूं लागला. चढतां चढतां तो वीस फूट उंचीवर जाऊन पोंचला. तेथे पोंचल्यावर त्याचे मनास मोठा आनंद वाटून तो दोन्ही हातांनी टाळ्या वाजवू लागला; व खालीं पाहून मोठमोठ्यानें आनंदाच्या आरोळ्या मारूं लागला. त्याचे शब्द ऐकून त्याची आई व घरांतील इतर माणसे तेथे आलीं. त्याला अशा उंच जागी पाहून सर्वांचे अंगावर कांटा उभा राहिला. अद्याप चांगले चालतां देखील येत नसल्यामुळे जो जमिनीवर वेळोवेळी धाडकन्

आपटत असे, तो वीस फूट उंचीवरून खालीं जमिनीवर आदळला तर त्याचे हाडांचा चुरा झाल्यावांचून राहिला असतां काय ? आईला व ओळखीच्या माणसांना पाहून तर सुरेशनें जोरानें टाळ्या वाजविण्याचा सपाटा चालविला, व किंकाळ्या फोडूं लागला. हें पाहून घरांतील मंडळीचा धीर खचला. शिडीवर चढावे तर शिडी हालून तो खाली पडेल, या भीतीनें तेही शक्य नव्हतें. आईनें त्याला गुपचूप राहण्यास सांगावें तों तों अधिकाधिक थैमान करून तो गिल्ला करूं लागला. थोड्या वेळाने थकल्यामुळे व थोडेसें मातेच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहून स्वारी चुप राहिली. नंतर एका मनुष्यानें शिडी खूप जोरानें भक्कम पकडून धरली व दुसरा वर चढून त्यानें सुरेशला उतरून खालीं आणलें. वाचकहो, आपले मूल सुरक्षित आपलेजवळ आलेलें पाहून त्या प्रिय मातेला किती आनंद झाला असेल याची कल्पना तुम्हीच करा. परंतु थोड्याच वेळांत त्याच मायाळू आईला असा खटाटोपी मुलगा संकटपरंपरेंतून सुटून पुढें कसा मोठा होईल याची मोठी चिंता पडली.

५ मांजराशीं मुष्टियुद्ध

सुरेशच्या बालपणाच्या साहसकर्मापैकीं एक हकीगत फारच प्रख्यात आहे. शहरांतील मांजरांपेक्षां खेड्यांतील मांजरें फार भयंकर असतात हे आपण नेहमीं पहातों. तीं केवळ उंदरांनाच नव्हे, तर चिमण्या, खारी तसेंच कबुतरें यांना काळासारखी असतात. आपण पहातो कीं

आपण पहातों कीं, कांहीं मांजरें लहान मोठ्या कुत्र्यांना देखील भीक धालीत नाहींत. मामुली कुत्रे तर रानमांजरांला पाहून पळून जातात. एकवेळ आमच्या चरित्रनायकाची व एका मांजराची चांगली लढाई जुंपली. एके दिवशीं एका मोठ्या गलेलठ्ठ बोक्यानें एका बेलाचे झाडावरून एक खार पकडून आणली. खारीचे मानेंतून जखमेमुळे रक्त निघत होतें, तथापि ती जिवंत होती. मांजर आपलें भक्ष्य जमिनीवर खालीं ठेवून आपण दूर बसली होती, व दुरून आपल्या भक्ष्याकडे टक लावून पहात शेपटी जमिनीवर आपटीत होती; आणि ती अर्धमेली खार जेव्हां जेव्हां आपलेकडून उठण्याचा प्रयत्न करति असे, तेव्हां तेव्हां ती तिजवर आपला तीक्ष्ण नखें काढलेला पंजा ठेवून तिला दाबीत असे. ती आपले भक्ष्याशीं अशाप्रकारें खेळत असतां सुरेश तेथे येऊन दाखल झाला. त्याचें वय त्यावेळीं फक्त तीन वर्षाचे होतें. खारीला पाहतांच ती उचलून घ्यावी असे त्यास वाटलें. एखादें मांजर आपणावर झडप घालील ही कल्पना देखील त्याचे मनांत आली नाहीं व तो पुढें सरसावला. त्याला पुढे सरसावलेला पाहतांच भांजरीनें गुर्र-र्र व फि स् स् करण्यास आरंभ केला, परंतु सुरेशनें निर्भयपणें ती खार उचलून घेतली. तो आतां चालूं, लागणार तो मांजरीनें त्याजवर मोठ्या त्वेषानें एकदम झडप घातली. तिला एकदम आलेली पाहून न दचकतां, किंवा तिच्या तीक्ष्ण नखें असलेल्या पंजाच्या ओरबड्यास भीक न घालतां खार उराशीं धरून सुरेशनें लाथा बुक्यांनीं त्या मांजरीशीं झगडा सुरू केला. सुमारें अर्धा तास त्यांची झटापट चालू होती. शेवटीं एक मनुष्य तेथे आला व सुरेश

रक्तानें न्हालेला पाहून त्यानें त्यास उचलून कडेवर घेतलें, व मांजरीला हाकून लावलें. मांजरीशीं झालेल्या झटापटींत सुरेशला इतकें ओरखडलें होतें व जखमा झाल्या होत्या कीं तो सुमारे महिनाभर अंथरुणावर पडून होता. अशक्ततेमुळे त्याला चांगले उठतां येत नसे. ज्या व्यक्तीच्या बालपणीं अशा आश्चर्यकारक व वीरतापूर्ण गोष्टी घडल्या ती व्यक्ति मोठेपणीं फौजेचा नेता व्हावी किंवा तिनें निधड्या छातीनें तोफांच्या धडाक्याशीं सैन्यानिशी टक्कर द्यावी ही फार आश्चर्यजनक गोष्ट नाहीं. क्लाईव्ह, नपोलियन, शिवाजी, राणाप्रताप, यांच्या देखील बालपणीं असेच प्रसंग आले असतील नाहीं.बरें?

६ पोरवयांतील खेळ

जसजसा सुरेश मोठा होत गेला तसतसे त्याचे शौर्यही वाढत गेलें. युद्धांच्या व शूर पुरुषांच्या गोष्टी तो फार मन लावून ऐकत असे. त्याला अद्याप लिहितां वाचतां मुळीच येत नव्हते. परंतु महाभारत व रामायण यांतील गोष्टी त्याला चांगल्या सांगतां येत असत. राम लक्ष्मण, अर्जुन यांच्या शूरत्वाच्या व प्रसंशापर गोष्टी ऐकण्यांत तो अगदीं तल्लीन होत असे. त्याला फक्त हिंदुस्थानांतील वीर कथा माहीत होत्या. इतकेंच नाहीं तर शिकंदर, लियोनिडस हॅनिबाल, आलफ्रेद इत्यादि परदेशांतील शूर व प्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषांचीही त्यास बरीच माहीती

होती. रॉबर्ट ब्रुस, वॉलेस, नेपोलियन तसेंच जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या शौर्याच्या व धैर्याच्या गोष्टीही त्यास अवगत होत्या. या सर्व गोष्टी त्यानें कृष्णनगर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकडून ऐकल्या होत्या. त्यावेळीं बंगाल्यांत फक्त तीन विद्यापीठें होती. हिंदु कॉलेज, हुगली कॉलेज व कृष्णनगर कॉलेज. सुट्टी मध्ये घरी येऊन राहणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर सुरेश नेहमीं उठत बसत व फिरत असे. त्यांच्या तोंडून तो निरानराळे देशी व परदेशी वीर पुरुषांच्या कथा ऐकत असे. सुरेश मुलें जमवून त्यांची फौज तयार करीत असे, आपण त्यांचा नायक होत असे. तो आपल्या मोडक्या तोडक्या भाषेत त्यांना कवाईत शिकवीत असे. ही फौज घेऊन तो इच्छामती नदीचे कांठीं तो मोठी धामधूम करीत असे व मोठ्या चतुराईनें त्या मुलांना आपल्या कह्यांत ठेवींत असे. मुलें थकून जात असत तव्हां बुद्धीबळे घेऊन तो आपल्याशींच खेळत बसे व स्वतःच स्वतःवर मात करून घेई. जरी या गोष्टी दिसण्यांत मामुली व क्षुल्लक दिसतात तथापि त्या फार मननीय आहेत. कारण याच गोष्टीनीं सुरेशचंद्रच्या निरनिराळ्या शक्तीचा हळूहळू विकास होत गेला हें दिसुन येते. तो बहुधा बुद्धिबळें खेळत असे. या खेळाची उप्तत्ती रावणकालनि आहे असे म्हणतात. त्याकाळीं रावणासारखा शक्तिमान दुसरा कोणी नव्हता. तेहतीस कोटी देव देखील त्याला थरथर कांपत असत, व त्याची श्रेष्टता कबूल करीत. लढाई करण्यापासून त्याचप्रमाणें हजारों माणसांना मारून त्यांची बायकामुलें अनाथ करण्यापासून त्यास पराङ्मुख करण्याच्या इराद्यानें सती

मन्दोदरीनें बुद्धिबळाच्या खेळाची गोडी रावणास लाविली होती. या खेळांत लढाईप्रमाणें प्रत्यक्ष कत्तलबाजी न करतां शत्स शह देऊन व आपली प्यादी इरेस घालून शत्रुची प्यादीं, उंट, घोडीं वगैरे काबीज करतां येतात. व खेळणारांना लढाईतील आनंद अंशतः अनुभवण्यास मिळतो हैं सर्वांना ठाऊक आहे. यावरून असे कोणी समजू नये कीं, केवळ सातवे वर्षीच सुरेश अगदीं पटाईत बुद्धिबळे खेळणारा होता. सांगण्याचा मतलब एवढाच कीं अशा प्रकारचे खेळ खेळून त्याच्या मनाला अत्यंत आल्हाद होत असे त्याची हुशारी व तडफ पाहून सर्व लोक त्याची वाहवा करता असत. परंतु त्याच वेळीं हा तरुणपणीं बिघडून कुमार्गास लागेल असें भविष्य पुष्कळजण करीत असत. माते खेरीज इतर सर्वांनाअसे वाटत होतें. याच सुमारास बाबू गिरीशचंद्र विश्वास यांनी कलकत्यास एक घर भाड्यानें घेऊन तेथे राहूं लागले. त्यांनीं सुरशला शाळेत घातले, सुरशचें लक्ष शिक्षणाकडे फारसे नव्हतें. अंग मेहनत तालीम कसरतीचें खेळ यांकडे त्याचे लक्ष अधिक असे. त्याठिकाणीं सुद्धां आपले एका भावाचे साहाय्यानें त्यानें पुष्कळ मुलें जमवून त्यांचें सैन्य तयार केले व त्यायोगें लढाईचं सोंग पूर्वीप्रमाणें थाटूं लागला. तो आपले सोबत्यांना शेतांत घेऊन जाऊन पलटणीच्या दोन तुकड्या करून त्या समोरासमोर उभ्या करीत असे व नंतर झाड हे किल्ला समजून एकीस झाडाचे रक्षण करण्यास उभे करून दुसरीनें किल्ला सर करीत असे. कधीं कधीं समोरसमोरच्या टेकड्यांवरून एकमेकांवर चिखली गोळ्यांचा वर्षाव करून लढाई करीत असे.

७ भयंकर सर्पाशीं झुंज

जेव्हां सुरेशचंद्र केवळ अठरा वर्षाचा होता तेव्हां एकदां त्याला एकट्याला कलकत्याहून नाथपुराचा प्रवास करावा लागला. त्याचा अल्लडपणा अद्यापिहि होता तो कधीं स्वस्थ चित्तानें राहत नसे. सदैव इकडे तिकडे स्वैरपणानें खेळत कुदत असे. व धामधूम करीत असे. तो नाथपुराला जात असतांना रस्यावर त्याला एक भला मोठा आंब्याचा वृक्ष लागला, त्यावर एक घरटें त्याला दिसलें. त्यांतील पक्ष्यांची पिलें घ्यावी म्हणून तो वर चढूं लागला. त्या घरट्यापाशी जातो न जातो तोच मागचे बाजूनें कसल्याशा जनावराचा फूत्कार त्याचे कानीं आला ! मागे वळून पहातो तो काळाभिन्न साप ! वाचक हो, आपलेपैकीं कितकजण अशा प्रकारें सापाचें दर्शन होतांच जागेवर उभे राहतील. भयाने आपले अंगास कांपरें भरून सा-सा-सा-प-प-प करीत भोकाड पसरले असते. व झाडावरून खालीं निचेष्ट पडले असता ! भर वयाच्या माणसांना सुद्धां घरांत निघालेला साप मारण्यास बाहेरून गडी माणसें बोलवावी लागतात हा आपला नित्यक्रमच आहे. साप झाडाला विळखा घालून त्याचें अंगावर त्याचे फुत्कार करीत होता. तथापि धैर्यशाली सुरेश त्या सापाला डरला नाहीं. सर्प देखील अतिक्रमण करणाऱ्या त्या बालकावर क्रोधपूर्ण दृष्टीने पहात फूत्कारीत होता, त्यामुळे सुरेशला त्याच वाटेनें उतरणें जवळ जवळ अशक्य होतें, सूरेशनें सापाकडे पाठ फिरवून त्याला न डवचता दुसऱ्या

फांदीवरून खाली उतरून जाण्याचा विचार केला. परंतु तसे करून सापाची नजर चुकविणें अत्यंत मुष्कील होते. तसेंच खाली उतरत उतरत यावे तर अधिक नजीक जावें लागतें व वरचे फांदीवर चढून जावें तर ती बोटासारखी बारीक, अशा चिकट स्थितींत तो सांपडला. थोड्या वेळानें या सर्व गोष्टींचा विचार करून शेवटीं जिवावर उदार होऊन खालीं उतरून जाणेच त्याने ठरविलें व हळुहळु उतरू लागला. इकडे सर्पही आपली शिकार आपलेकडेस जवळ जवळ येत आहेसे पाहून आपला फणा उभारून तयार झाला. थोड्या वेळानें सुरेशचा पाय आपल्या आटोक्यांत आलेला पाहून त्याला डसण्याच्या इराद्यानें सापानें आपला फणा सुरेशच्या मांडीवर मारल'. परंतु दैवयोगार्ने फणा त्याचे मांडीवर न लागतां वृक्षाच्या फांदीवरच पडला. आतां तो साप फणा उचलून घेणार इतक्यांत सुरेशनें आपला डावा हात नेमका त्याच्या फण्यावर ठेवून त्याला आपल्या अंगांत होती तेवढी ताकद खर्च करून खूप जोरानें मुठींत आवळून धरलें. बहुतकरून प्रत्येक बंगाली मुलगा आपले खिशांत एकादा चाकू नेहमीं ठेवीत असतो. सुरेशच्याही खिशांत एक चाकू होताच. त्यानें तो दुसऱ्या हातानें बाहेर काढून दांतांनीं त्याचें पाते उघडून डावे हातांतील सापाचें मुंडकें छाटून टाकलें. सुमारे चाळीस सेकंदांत त्यानें सापाचें मुडकें छाटून जमिनीवर त्याचा देह फेंकून दिला. सापाची लांबी सुमारे सहा फूट होती व पोटाचा घेर सहा इंच होता. वाचकहो, आज सुरेशप्रमाणे किती तरुण असा भयंकर साप हातांत पकडून त्याचे डोके छाटणारे

भेटतील ! रॉबिन्सन क्रूसो, वेस्टवर्डहो वगैरे इंग्रजी पुस्तकांत साहसी मनुष्यांच्या गोष्टी आपण वाचतो व थक्क होऊन जातो. परंतु प्रत्यक्ष तसले प्रसंग ओढवले असतां मनुष्य गोंधळून जातो, हात पाय लटपटतात, मुखांतून शब्द निघत नाहींत व बेशुद्धी येते. ज्या विशेष गुणामुळे सुरेशला सापाचे नरडें छाटून संकटापासून मुक्त होतां आलें तो अंगी उपजत असणें किंवा सवईनें कमविणें अत्यंत आवश्यक आहे. असो. सापाला फेंकून दिल्यावर तो खाली उतरला नाहीं. झाडाच्या शेंड्यावर असलेले पक्षाचे घरटें त्याला काढावयाचे होतें. पुन्हां असेंच कांहीं संकट येईल म्हणून तो घाबरला नाहीं. सरसर झाडावर उंच जाऊन त्यानें तें घरटें गाठलें व त्यांतील पक्षांचीं पिलें खिशांत घालून उतरूं लागला. उतरतांना ज्या ढोलींतून सापाने त्याजवर झडप घातली होती, त्या ढोलींत पक्ष्यांचीं पिसें त्याला दिसली ती पाहतांच पक्ष्यांचीं पिलें खाण्याचा सापाचा क्रम असावा असा त्यानें तर्क केला. झाडावरून खालीं उतरल्यावर तो मेलेला साप व पक्ष्याचीं पिलें घेऊन तो घरीं आला व वडिलांचे पुढें ती दोन्हीं विजयचिन्हें ठेवून घडलेली हकीगत सांगू लागला. त्याची गोष्ट ऐकून कुटुंबांतील प्रत्येक मनुष्याला सुरेश कधींनाकधीं भयंकर संकटांत पडून प्राणास मुकेल, असेंच खात्री-पूर्वक वाटू लागले. त्याचे आईला आपला मुलगा मोठ्या संकटांतून वांचला हे ऐकून आनंद वाटला. तिने त्याला अशा संकटांत सहसा उडी घालणे जिवास धोका आहे असा उपदेश केला.

८ भयंकर युद्‌ध.

बंगालमधील गांवांना त्या काळी (१८७२)
पिसाळलेले कुत्रे व गिधाडे यांचा फार त्रास सोसावा लागत असे. कुत्रे व गिधाडे एकट्या दुकट्या माणसावर किंवा गायीम्हशीवर हल्ला करतात. एवढेच नाहीं, तर कधी कधीं गांवांतील सर्व माणसांना अत्यंत त्रासवून सोडतात. ज्या गांवांत जुनीपुराणी बंदूक असते त्या गांवांत यांचा सुळसुळाट कमी असतो परंतु जेथे आमचे दयाळू सरकारचे कायद्याबरहुकूम हत्यारे वापरणे बंद केलें आहे किंवा हत्यारे नाहीत, तेथे अशा पिसाळलेल्या कुत्र्यांचा व रानडुकरांचा उपद्रव फार होतो. हत्यारे नसल्यामुळे गांवांतील कित्येक मनुष्यांना जिवावर उदार होऊन काठ्या व दगडधोंडे यांच्या योगाने त्यांना ठार करण्याचा प्रसंग येतो. एकदां सुरेश नाथपूरमध्येच असतांना तेथे एक पिसाळलेला कुत्रा लोकांना फार त्रास देत होता. त्या कुत्र्याने कित्येक मनुष्यांवर हल्ला करून चावे घेतले होते. व कित्येक जनावरांना डसून त्यांचे प्राण घेतले होते. त्याकाळी पिसाळलेली कुत्रीं डसली असतां औषधोपचार केवळ फ्रान्समध्ये पॅरिस शहरांतच होत असे. विचारे गांवकरी आपली देशी औषधें खाऊन ईश्वरावर हवाला ठेवून परोघर पडून असत. एके दिवशीं सुरेश आडमार्गाने सहल करावयास निघाला असतां, थोडा दूर गेला असेल नसेल तो त्याला त्या पिसाळलेल्या कुत्र्याने रस्त्यात गाठले. सुरेशजवळ हत्यार पात्यार कांहींच नव्हते म्हणून त्याने हातांनी धूळ उडवून धूम ठोकली. परंतु पिसाळलेल्या कुत्र्याची ती लाल डोळ्यांची लांब

जीभ काढलेली विक्राळमूर्ती मोठमोठ्यानें भयंकर शब्द करीत त्याच्या मागोमाग आली. सुरेश काय करावं या विचारांत होता, इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली तो लगेच पुढच्याच दगडी नाल्यांचे मोरीचे कांठावर तयार होऊन उभा राहिला. त्याचे पायांत मजबूत बूट होता व ठोकरा मारण्याची त्याला माहिती होती. तो कुत्रा त्याचे ठोकरीचे अगदीं टप्प्यांत आला नाहीं तोच सुरेश जरा बाजूला सरून त्यानें अशी एक जोराची ठोकर त्याला मारिली की कुत्रा क्यैवक्यैव करीतच नाल्यांत पडला. अशा रीतीनें पिसाळलेल्या कुत्र्याचे तावडींतून सुरेश निसटला व सुखरूप घरी पोहचला.

९ मृत्यूपासून सुटका.

इंग्रज लोकांना फार करून शिकारीचा मोठा शोक असतो; व शिकारीमध्ये त्यांचा पुष्कळ पैसा खर्च होत असतो. इंग्लंड वगैरे देशांत जे लोक शिकार करावयास जातात ते बहुतकरून आपले बरोबर कुत्रे घेऊन जातात. परंतु हिंदुस्थानांत राहणारे इंग्रज लोक जेव्हां वाघ, सिंह वगैरे भयंकर पशुंची शिकार करण्यास जातात, तेव्हां ते नेहमीं हत्तीवर बसून व बरोबर पुष्कळ शिकारी लोक व कुत्रे घेऊन जातात. पुष्कळ वेळां शिकारीचे रानांत वाघ सिंह यांची गांठ पडणार नाहीं अशी खात्री असते, तेव्हां ते पायीं-पायी किंवा घोड्यावर बसून जातात. परंतु शिकारीवर उपजीविका करणारे हिंदुस्थानांतील शिकारी लोक मनांत कसलीही भीति न बाळगतां

अरण्यांत जातात. व जंगलांत जरी वाघासारखे क्रूर पशुंची गांठ पडली, तरी ते लोक लेशमात्र भीत नाहींत. कधीकधीं हे लोक बिनहत्यारांनीं वाघाला केवळ हडपानी काठ्यांनीं व दगडांनीं ठार करतात

त्या काळीं नदिया प्रांतांत निळीचे कारखाने फार असल्यामुळे पुष्कळ इंग्रज लोक तेथे रहात असत. ते नेहमी घोड्यावर बसलेले व हातांत बर्ची किंवा भाला घेऊन फिरावयास निघत असत. सुरेश नाथपूर येथे असतांना एकदां तीन इंग्रज घोड्यांवर स्वार होऊन व शिकारी कुत्रे बरोबर घेऊन रानडुकराचे शिकारीकरतां जंगलांत येऊन थडकले. कांहीं शिकार न सांपडल्यामुळे ते परत जाण्याच्या विचारांत होते. इतक्यांत वेळूच्या रानांत त्यांना हालचाल दिसली. व एक रानडुक्कर दृष्टीस पडले. त्याला त्या वेळूच्या बेटांतून बाहेर हुसकून काढण्याकरितां त्यांनीं एक बंदूक झाडली. बंदुकीचा धडाडा ऐकतांच डुक्कर मैदानावर मोकळ्या जागेत आले. त्याला पाहतांच शिकारी लोक व कुत्रे त्याच्या पाठीस लागले. रानडुक्कर ज्या दिशेकडे चौपाय पळत होते त्याच बाजूनें सुरेश आपल्या सोबत्यासह फिरत फिरत येत होता. त्यांना तिकडून येतांना पाहून शिकारी लोकांनी त्यांना परत फिरण्याविषयीं त्यांना लांबून इशारा दिला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. सुरेश व त्याचे साथीदार समोर पाहून तें रानडुक्कर त्यांच्यावर चवताळून धावून गेले. रानडुक्कर आपणावर चाल करून येत आहे हे पाहून सुरेशला भीती वाटण्याचे ऐवजीं आनंद वाटला. त्यानें आपल्या मित्रांस चटकन् दूर पळून जाण्यास सांगितलें व

पळून जाण्यास सांगितलें; व आपण रानडुकराच्या समोर पवित्र्यावर उभा राहिला. ते भयंकर रानडुक्कर मोठ्या त्वेषाने व सोसाट्यानें
त्याजकडे धांवत येत होतें. व त्याचे मागोमाग मोठमोठे कुत्रे व शिकारी माणसे येत होती या सुमारास ते सुरेशपासून पन्नास हातावर होतें. थोडक्याच वेळांत तो विक्राळ प्राणी त्याच्या इतक्या जवळ आला की त्याच्या जबड्यांतून निघणारे फेंसाचे छिटकारे देखील सुरेशच्या
अंगावर पडू लागले. त्या प्राण्याच्या दृष्टीवरून व धावण्याच्या रोखावरून असे पक्के दिसून येत होते कीं, हा सुरेशचा प्राण घेतल्याशिवाय राहणार नाहीं. इतक्यांत ते रानडुक्कर सुरेशच्या
अगदी नजीक येऊन धडकलें व सुरेशला दांत भोसकण्याकरितां म्हणून त्यानें आपलें डोके खालीं केलें तोंच सुरेशनें त्याचे मुस्कटावर
आपल्या हातांतील लाठीचा असा जोराने तडाखा दिला कीं त्यासरसें तें जमिनीवर कोसळलें. सावध होऊन आपले प्रतिस्पर्ध्यावर हल्ला
करण्यास पुनः धडपड करतें तोंच शिकारी कुत्र्यांनी त्याची गर्दन आपल्या तीक्ष्ण दांतांनीं पकडली व त्याला जमीनीवर डांबून धरलें तरी सुरेशच्या लाठीचे तडाखे त्याच्या माथ्यावर व पाठीवर मधुन मधुन पडत होतेच. थोड्याच वेळांत त्या रानडुकरानें हातपाय ताणून आपले प्राण सोडून इहलोकींची यात्रा संपविली. सुरेशचे धैर्य व शौर्य पाहून ते इंग्रज शिकारी आश्चर्यानें थक्क झाले व सुरेशची फार प्रशंसा करूं लागले. तिघाही इंग्रजांनीं त्याला मध्ये बसवून मोढक्या
तोडक्या बंगाली भाषेत त्याला नांव व राहण्याचे ठिकाण इत्यादि माहिती विचारण्यास सुरवात केली. त्या वेळीं संध्याकाळ झाला होता व सुरेशच्या सांभण्याप्रमाणें त्याचे साथीदारही
त्याला सोडून निघून गेले होते . सुरेशने त्यांना –

- आपले नांव व गांव सांगितले. बालवयांतील त्याच्या बहादुरीचा त्या इंग्रज अधिकाऱ्यांचे मनावर इतका विलक्षण परिणाम झाला की त्यापैकी एकाने त्याचे नांव व गांव आपले स्मरणवहींत टिपून घेतलें. थोड्याच वेळांत चांगला अंधार पडला व सुरेशला घरीं जाण्याची इच्छा झाली; परंतु त्या इंग्रजांनी त्याला आपलेबरोबर कारखान्यापर्यंत घेऊन जाण्याचा आग्रह धरला. त्यानंतर त्यांचे खालील अर्थाचे संभाषण झालें.

सुरेशः- जर मी माझे आईबापांना रात्रीचा लवकर भेटलों नाहीं तर ते अगदी चिंतातूर होतील.

साहेबः -- तुम्ही त्याची इतकी भीति धरूं नका, आम्ही तुमच्या घरी निरोप पाठवू.

सुरेशः- पण मला भूक देखील फार लागली आहे, व तुमच्या हातचे खाऊन मी बाटू इच्छित नाहीं.

साहेबः - काय ? खरोखर तुम्ही जातीची इतकी पर्वा करतां ? खरोखर या वयांत तर तुम्हांला जात किंवा जातीचे नियम कळत देखील नसतील.

सुरेशः- मला यांतले फारच थोडे कळते, हे खरे; परंतु मी इतकें सांगू शकतों की हिंदूनें म्लेंछाने स्पर्श केलेलें अन्न कधीं खाऊं नये असं माझी आई व वडील सांगतात.

साहेबः- आपण नेहमीं नाथपुरांत राहतां कां ?

सुरेशः- नाहीं, मी बहुधा कलकत्त्यास असतो व भवानीपुरांतील लंदन मिशनरी स्कूलमध्ये शिकत असतों.

साहेबः- जर तुम्ही ख्रिस्ती शाळेत ख्रिस्ती मुलांबरोबर नेहमीं असतां, तर मग तुम्हीं अर्धे ख्रिस्ती झालां यांत कांहीं शंका नाहीं.

सुरेशः - तुमचे हें म्हणणे मी कधींही कबूल करणार नाहीं. कारण कीं त्यांनी स्पर्श केलेला पदार्थ किंवा पाणी मी कधींही घेत नाहीं.

साहेबः - पण तुम्ही नेहमी त्यांचेबरोबर उठतां, फिरतां व तसेच घरी जाऊन स्नान न करतां, चहा पाणी पितां, मग अशा रीतीने तुम्ही अर्धे ख्रिस्ती नाहीं कां झालां ?

या घोटाळ्यांत पाडणाऱ्या प्रश्नाचे उत्तर सुरेशला देतां येईना. त्यांचा असा वादविवाद चालू असतां दोन बाजूंनीं दोन कंदील दुरून येतांना दिसत होते. कंदीलवाले जवळ आल्यावर असें कळून आलें कीं, एक सुरेशचे वडिलांचा शिरस्तेदार होता व दुसरा साहेबलोकांचा एक नोकर होता. शेवटीं दुसरें दिवशीं कारखान्यांत अवश्य येईन, असे सुरेश जवळून वचन घेऊन, शिकारी साहेब आपले मार्गानें गेले व सुरेश व त्याचा शिरस्तेदार घरीं यावयास निघाले.

१० चिखलांतलें कमल.

सुरेशच्या गोष्टी ऐकून सर्व साहेब लोकांना त्याजविषयीं फार प्रेम वाटत होतें. त्यामुळे त्यांचे निळीचे कारखान्याकडे वारंवार जाणें येणें होऊं लागलें. त्या काळचे इंग्रज एतद्देशीय मनुष्याबरोबर मोठ्या आदबीने व मोकळ्या

मनानें वागून एकमेकांस भेटण्याची इच्छा करीत असत परंतु देशी लोक फिरंगी लोकांबरोबर व्यवहार करणे किवा सहवास करणें पसंत करीत नसत; त्या काळीं आजचेपेक्षां धार्मिक कल्पना कडक असत. सुरेश जेव्हां जेव्हां नाथपुरांत असे, तेव्हां निळीचे मळ्यांत नेहमी जात असे; तेथे अनेक स्त्रीपुरुषांची व त्याची मैत्री जडली होती. तेथलि मुख्य साहेबाची बायको देखील सुरेशशीं ममतेनें वागत असे. व त्याच्याशी गप्पा मारीत असे. त्या वेळीं जे इंग्रज लोक हिंदुस्थानांत येत ते प्रायः आपल्या बायका बरोबर आणीत नसत. जी मडम सुरेशचे शौर्य पाहून त्यावर प्रेम करीत असे तिला एक सुंदर मुलगा होता. तो त्या वेळीं विलायतेंत शिक्षण संपादन करीत होता.

सुरेशला इंग्रजी समाजांत वावरण्यास मिळत असल्यामुळे इंग्रजी भाषेत बोलण्याचा त्याला चांगला सराव झाला होता; परंतु शाळेतील शिक्षणाचे बाबतींत त्यानें कांहींच प्रगती केलेली नव्हती. एके दिवशीं सुरेश त्या मडमेबरोबर एका दुचाकी गाडींत बसून फिरावयास निघाला. थोडे दूर गेल्यावर एकाएकीं त्या मडमेनें गाडी खूप जोरानें काढली व थोड्या वेळानें एकीकडे असलेल्या हिरव्यागार पल्लवांनी भरलेल्या तलावापाशीं आणून उभी केली. त्या तलावांत चिखल फार असल्यामुळे निरनिराळे रंगांचीं कमळे विपुल होतीं. तो वेळ सायंकाळच्या सुमाराचा असल्यामुळे वारा मन्द, शीतल व सुंगध युक्त वाहात होता. गाडी हाकण्याचे श्रम विशेष झाल्यामुळे मडमेचे गाल आरक्त वर्ण होऊन खुलत होते. ती बाई मध्यम वयाची होती, तरी तिचे शरीर व सौंदर्य पाहून ती तरुण असावी असे वाटत असे .गाडीतून उतरल्यावर ती —-

– तलावाकडे गेली व तो सुंदर देखावा पहात उभी राहिली. तो रम्य देखावा पाहून तिचे अंतःकरण प्रसन्न झाले; व समोरचे कमळापैकी एकादे कोणी आपणास आणून द्यावें अशी तिला इच्छा झाली; परंतु चपराशी किंवा गाडीवाला कोणीच बरोबर नसल्यामुळे तिला कोणालाच हुकूम करतां येईना. सुरेशनें तिचे हृद्गत ओळखलें; व आपणच एक दोन कमळे मडमेला आणून याबी असा विचार त्याच्या मनांत आला व तो तसे करण्यास उद्युक्त झाला. त्यानें ताबडतोब आपले अंगावरील खमीस व जोडे उतरून बाजूस ठेवले व तलावांत उडी फेंकली. हें पडून मडमेला फार भीति वाटू लागली व सुरेशला परतविण्याचा तिनें प्रयत्न केला, पण तो सफल झाला नाहीं. सुरेशनें पाण्यांत उडी मारली व एका मोठ्या कमळाचे अनुरोधानें पुढें पुढे तो जाऊं लागला. तो जसजसा पुढें जाऊं लागला तसतसें मडमेला त्यास फार कष्ट होताहेत हें स्पष्ट कळून आलें व म्हणून तिनें सुरेशला परत फिरण्याचा पुनः आग्रह केला. परंतु सुरेशच्या वीर्यशाली स्वभावाला तें रुचले नाहीं; व तो तसाच पुढे पाणी रेटीत चालू लागला. अखेर त्याचे चालणें बंद होऊन हातपाय देखील हालतनासे झाले. त्याला काठीसारखा स्तब्ध उभा राहिलेला पाहून मडमेचे मनांत त्याचे जीविताबद्दल शंका वाटूं लागली व तिनें घाबरून मोठ्यानें आरोळ्या मारण्यास आरंभ केला. तिचा आवाज ऐकून जवळचे खेड्यांतील लोक धांवून आले. सुरेशला संकटांत पडलेला पाहून त्यांनी त्याजकडे एक लांब दोर फेंकला. सुरेशनें तो दोर कमरेस बांधून त्या कमळाकडे तो पुन्हां जोरानें निघाला व तें फूल तोडल्यावर दोर ओतून घेण्याचा त्यानें काठांवरील लोकांस इशारा केला.

गांवकऱ्यांनी त्याला तेव्हांच ओढून सुखरूप बाहेर काढले. बाहेर आल्यावर आपण गाळांत रुतलो होतो हे त्यानें मोठ्या मुष्कीलीनें सांगितलें; कारण बराच वेळ गाळांत चालून चालून व गात्रे गारठून बधीर झाल्यामुळे त्याला अगदीं निःशक्तता आली होती; व त्यामुळे त्याचा आवाजदेखील खोल व अस्पष्ट येत होता. थकल्यामुळे सुरेश कांहीं काळ निचेष्ट पडला होता मडमेनें त्याला तांग्यांत बसवून तडक आपले बंगल्याचा मार्ग धरला व तेथे आल्यावर तिनें त्याची उत्तम शुश्रुषा केली. हळूहळू सुरेश पूर्व स्थितीवर आला. आजारी असतांना शिकण्यासवरण्याचा त्रास नसल्यामुळे सुरेश प्रसन्नचित्त असे; मडमेनें तें कमलपुष्प आपले बैठकीचे खोलीत मोठ्या आवडीनें जवळ जवळ महिनाभर ठेवलें होतें. कारण तिच्या मर्जीप्रमाणें सुरेशला तें तोडून आणतांना कल्पनातीत कष्ट सोसावे लागले होते, याची तिला जाणीव होती.

थोडेच दिवसांनीं सुरेशला नाथपूर सोडून बेलीगंज मुक्कामीं शिकण्याकरितां जावें लागलें. मेमसाहेब व निळीचे मळ्यांतील इतर साहेब लोक व त्यांचे चाकर नोकर या सर्वांचें सुरेशवर इतके प्रेम जडले होतें कीं, त्याच्या जाण्याची खबर ऐकून सर्वांना अत्यंत दुःख झालें. तो जावयास निघाला तेव्हां सर्वांनी मोठ्या कष्टाने त्याला निरोप दिला. त्या मडमेनें व मुख्य इंग्रज कामगाराने सुरेशला कांहीं प्रिय वस्तु अर्पण केल्या. परंतु सुरेशनें त्यांचा स्वीकार न करतां त्यांनी त्या देऊ केल्याबद्दल त्यांचे आभार मानून व त्यांना प्रणाम करून आपल्या प्रवासाचा मार्ग धरला.

११ जलविहार

आपल्या चरित्रनायकाच्या बालपणच्या खेळामध्ये पोहणें व नौका वल्हविणें हे त्याच्या आवडीचे खेळ होते. नाथपूर हें गांव इच्छामती नदीच्या कांठीं आहे, ही नदी बंगालमध्ये सर्व नद्यांपेक्षां उत्तम असून तिचें पाणी नेहमीं काळेभोर असते, व शांत असते आणि याच कारणानें बहुतकरून मासे पकडणारे लोक नेहमीं येथे राहतात. त्यावरच त्यांची उपजीविका चालते. सुरेश सुद्धां आपली बालसेना घेऊन व लहान लहान होड्यांत बसून सर्व नदीतून वारंवार फेरफटका करीत असे. नाव वल्हविणें हा एक चांगला व्यायाम आहे; परंतु त्यांत जिवावर बेतणारे प्रसंगही तितकेच अधिक असतात. लहान मुलांना वल्हीं मारणे हा व्यायाम ताकदीबाहेरचा आहे. नाथपुराहून आपले बापांबरोबर कोरियाला जाण्या-येण्याच्या प्रसंगीं सुरेशचा हा मुख्य व्यायाम होत असे; कारण कोरियापासून नदी फार दूर आहे. गिरीश बाबू यांची सांपत्तिक स्थिती निकृष्ट असल्यामुळे त्यांना स्वतंत्र होडी खरेदी करणे अशक्य होतें. तथापि असे जरी होतें तरी सुरेशनें जल-विहाराची आपली आवड सोडली नाहीं. त्यानें आपल्या वयाच्या मुलांचें एक मंडळ काढलें व वर्गणी जमवून जल-विहाराकरितां एक लहानशी होडी खरेदी केली. शाळा सुटल्यावर एक घंटाभर तो आपले सर्व सोबत्यांसह नदीवर जाऊन मनमुराद नाव चालविण्याचा व्यायाम घेऊं लागला. एप्रिल महिन्यांत एके दिवशीं आपल्या चार संवगड्या-सह तो नदीवर आला. त्यावेळीं ऊन फार कडक होतें. सर्वांबरोबर सुरेशही नांवेंत

बसला व वल्ही मारूं लागला. नांव बागेकडे नेण्याचा त्यांचा इरादा होता त्याप्रमाणे ते बागेजवळ जाणार अशा वेळीं त्यांच्या दृष्टीस अस्मानी नीलवर्णाचे मोठमोठे डोंगर दिसूं लागले. पाहतां पाहतां त्यांच्या चोहोबाजूस एकाएकी घनघोर अंधार पडला. मेघांचे विकट हास्य सुरूं झालें व जोराचें वादळ सुरू होऊन विजा चमकूं लागल्या. नांव बागेच्याजवळ जाण्याऐवजी वाऱ्यानें भलतीकडेस जाऊं लागली. इतक्यांत साड् साड् करीत पाऊस जोरानें वर्षू लागला. विजा चमकून कडकडाट सुरू झाला होडींतील एकालाही निघतांना या प्रसंगाची कल्पना नव्हती. काळ्याकुट्ट अंधःकारामुळे व वाऱ्यामुळे मुलांना होडी योग्य स्थितींत हाकारतां येईना. ती चक्कर खाऊं लागली. होडी आवरतां आवरतां मुलांचे फार हाल झाले. त्यांतच ती एका खडकांशी टक्कर खाऊन वर उडाली व कलथी खाऊन बुडाली. पांचही तरुण नदींत पडले व नदीच्या वेगानें समुद्राकडे वाहत चालले. त्याचवेळीं तिकडून एक आगबोट येत होती. त्या बोटीच्या नायकानें सहाय्य करून तिथेजणांना वर ओढून घेतलें व वांचविलें. सुरेश व त्याचा एक सोबती इतके दूर वहावत गेले होते कीं, बोटीवरील माणसांना ते दिसले नाहीत. सुरेशच्या सोबत्याला चांगले पोहतां येत नव्हते म्हणून सुरेश त्याला धीर देत होता. शेवटीं त्याचा सोबती थकला व त्या प्रक्षुब्ध समुद्रानें त्याला पोटांत घेतलें. सुरेश तसाच वहावत चालला. सुदैवानें एका जर्मन बोटीवरील एका खलाशानें दुरून त्याला पाहिलें. त्याला दया आली व त्यानें सुरेशकडे एक मोठा दोर फेंकला. मुरेशनें दोर धरून बोटीवर चंढण्याचा फार प्रयत्न केला. परंतु अगदीं थकून गेल्यामुळे त्याचे हातचा दोर —

थकून गेल्यामुळे त्याचे हातचा दोर निसटला व तो पाण्यांत आदळला. त्याची ती केवीलवाणी स्थिती पाहून जहाजाचे नायकाला फार दया आली व त्यानें एक होडी खालीं सोडण्याचा हुकूम दिला. पाण्यांत आदळून अधिकच धैर्यगलित झाल्यामुळे सुरेश पाण्यावर मृतवत् पडून होता होडीवरील मनुष्यांनीं मोठ्या कष्टानें त्याला होडींत 'घेतलें. व जहाजावर सुखरूप चढविलें. त्यावेळीं सुरेश इतका बेशुद्ध स्थितींत होता की जहाजावरील सर्जननें व इतर गृहस्थांनीं जोराचे प्रयत्न करूनही तो दुसरे दिवशीं पहांटपर्यंत शुद्धीवर आला नाहीं.

सूर्योदयाचे सुमारास सुरेशला एकाएकी बराच आराम वाटला, व दुसरे दिवशीं तो चांगला बरा झाल्यावर त्याला कप्तानाने गाडींत बसवून त्याचे मातापितरांकडे पोहचते केले.

१२ फिरंगी तरुणांबरोबर झटापट.

सुरेशला व त्याचे मित्रांना नौकाविहाराप्रमाणेंच निरंतर एडन गार्डनसारख बागांतून फिरण्याची फार आवड असे. एडनगार्डनमध्यें तो बहुतकरून आपले वयाचे इंग्रजी मुलांबरोबर खेळत कुदत असे. एके दिवशीं सुरेश आपले एका साथीदाराला घेऊन दौड षहायास गेला. तेथे त्याची व दोन युरेजियन टारग्या तरुणांची भेट झाला ते युरोजियन तरुण सुरेशपेक्षां वयानें मोठे होते. दोघेही कारणावांचून सुरेश व त्याचा मित्र यांना चिडवून नेटिव्ह नेटिव्ह म्हणून शिवीगाळ –

- करूं लागले. सुरेशला दुसऱ्यानें अपमान केलेला बिलकूल सहन होत नसे. त्यानें व्याजमुद्दलासह त्यांचे गलिच्छ शब्द त्यांना परत दिले. एकदोन मिनिटांत त्यांचा चांगलाच झगडा सुरूं होईल असे पाहून सुरेशच्या साथीदाराने पोबारा केला. सुरेशचे अपशब्दांचा अहेर (मारा) त्या युरेजियन तरुणांना सहन न होऊन त्यांनीं त्याजवर एकदम हल्ला केला. सुरेशहि त्यांच्याशीं दोन हात करण्यास सज्ज होताच. त्याने दोन्ही हातांनी त्या तरुणांवर बुक्यांचा चांगला मारा केला. त्या दोघांनाही तो मारा सहन न होऊन ते जमिनीवर पडले. आपले शत्रु हरले हे पाहून सुरेशनें त्यांना अधिक मार दिला नाहीं; उलट त्यांना आराम वाटावा म्हणून त्याने आपणाकडून होणारे प्रयत्न करण्यास सुरवात केली. हे त्याचें औदार्य व मुष्टियुद्ध कौशल्य पाहून थक्क झालेल्या प्रतिस्पर्ध्यांना फार लाजल्यासारखे झालें. आपण आगळीक केली याबद्दल त्यांनीं सुरेशची माफी मागीतली. शरणागताला अभयदान देणें हें वीरांचें एक लक्षण होय.

१३ सुरेशचा उनाडपणा

लंदन मिशनरी स्कूलमध्ये अद्याप सुरेश हा शिक्षण संपादन करीत होता. त्याचे सोबतीच नव्हे तर शिक्षक देखील त्याला भीत असत. त्यांचा एक मोठा आखाडा होता. त्यांत —

सुरेशच्याप्रमाणेच धडधाकट व निधड्या छातीचे तरुण होते. सुरेशच्या फडाचे भय केवळ शाळेतील मुलांमास्तरांना असे, एवढेंच नाहीं तर शेजारी पाजारी व दुकानदार हे लोक देखील त्यांना भिऊन असत. गटारातील पाणी अडवून दुकानदाराचे नुकसान करणारे क्लाइव्हच्या पितरांना जी दहशत असे तीच बहुधा याही
दांडग्या व दुर्वृत्त तरुणांचे मातापितरांना होती. दररोज सकाळी साडेनऊ वाजतां हे बाहेर फिरावयास निघत. महिन्यांतून फार तर दहा दिवस शाळेचे तोंड पहावयास हे जात असत. नेहमी दोन प्रहराचे सुमारास शाळेचे नजीक गांवांतील व्यापारी व उदमी लोकांचे तरुण मुलांची सभा भरत असे. सुरेशच्या अशा उनाड
वर्तनानें त्याच्या आईबापांस अत्यंत दुःख होत असे. त्याच्या आईला, आपला मुलगा आज नाहीं उद्यां, केव्हां तरी ताळ्यावर आल्याशिवाय राहणार नाही असे वाटत होतें; परंतु त्याचे वडील
त्याजवर फार क्रोधायमान होत असत. त्यांना आपल्या पुत्राच्या भावी जीवनाची अत्यंत काळजी लागून राहिली. गोडीगुलाबीनें
समजावून किंवा धाकदपटशा दाखवून देखील सुरेश लिहिण्यावाचण्याकडे लक्ष देत नाहीं असें त्यांना कळून यई, तेव्हां त्यांना अपरिमित दुःख होत असे. तथापि सुरेशच्या अंगीं चतुरता इतकी
होती की जर लिहिण्यावाचण्याकडे त्याचें मूळपासून लक्ष असते तर तो विद्वानांत झळकल्याशिवाय राहिला नसता.

त्याचे शिकण्याकडे चित्त लागावं म्हणून सर्व शिक्षकांनी होते नव्हते तितके प्रयत्न करून पाहिले, परंतु ते सर्व निरुपयोगी ठरले .फार तर -

काय, त्या शाळेचे प्रिन्सिपॉल मि. ऑष्टन साहेब यानीं सुद्धां या कामी दीर्घ प्रयत्न केले. परंतु शेवटीं त्यांना देखील हात टेंकले,

वाचकहो, हें असें कां बरें व्हावें? हें शिक्षणाचे एकांगीपणामुळे तर नव्हे ? वास्तविक मुलांच्या उपजत शक्तींचा फायदा घेऊन त्यांचा विकास होणें हेंच सुशिक्षणाचे मुख्य ध्येय. आज इंग्लंड, जर्मनी व अमेरिका यांत मिळणारे, मुलांचे उपजत शक्तींचा विकास करणारे शिक्षण क्लाइव्हच्यावेळी जसें इंग्लंडांत नव्हतें, तसेंच आपलेकडेही नव्हतें. क्लाइव्हच्या वडिलांना त्याच्या हूडपणाला कंटाळून, त्याला हिंदुस्थानांत कारकून म्हणून पाठवावें लागले. येथे आल्यावर क्लाइव्हने आपला कारकुनी पेशा सोडून लष्करी पेशा स्वीकारतांच त्याच्या गुणांना वाव मिळाला व त्याच्या महत्वाकांक्षा सफल होऊन ब्रिटिशसाम्राज्याचा हिंदुस्थानांत पाया घालणारा म्हणून तो प्रसिद्धीस आला. ज्या सुरेशपुढें मि. ऑस्टनसारख्या शिक्षण तज्ज्ञ अध्वर्यूनी देखील हात टेंकले तोच सुरेश स्वावलंबनानें परदेशांत जाऊन योग्य काल येतांच एका प्रजासत्ताक राज्यामध्ये आपल्या शूरत्वादि गुणांनी कर्नलपदास चढला. असो.

सुरेश जेव्हां सायंकाळी घरी परत जात असे तेव्हां तेव्हां त्याजवर वडील व इतर माणसें फार रागावून त्याला हवें तसे अभद्र बोलत असत. हें त्याला सहन न होऊन त्याने घरी जाणें बंद केले. आठवड्यांतून एक दोन वेळ फार तर घराचे व आईचे दर्शन तो घेत असे. बाकीचे दिवस आपले खिस्ती मित्रमंडळीबरोबर तो घालवीत असे.--

– सहवासाने परकीयधर्माविषयी व त्या धर्मातील आपले मित्रांविषयी त्याला आतां पूर्वीसारखा तिटकारा वाटत नसे. हळूहळू तो त्यांचेबरोबर भोजनादि व्यवहारही करू लागला. या सर्वांचे पर्यवसान म्हणजे हिंदुधर्माविषयीची त्याची श्रद्धा कमी कमी होत गेली, व तो व्यवहारभ्रष्ट व आचारभ्रष्ट असा एक स्वच्छंदी तरुण बनला. त्याकाळी हिंदुधर्मातील गरीच व भाबड्या लोकांना बाटवून खिस्ती करण्याचा धूमधडाका चालू होता. समजून उमजून जो कोणी भेटेल त्याला बाटविण्याचा प्रयत्न केला जात असे. पण सुरेशसारखा तडफदार त्यांना आपल्या तावडीत कसा आणतां येईल याचा ते फार प्रयत्न करीत असत.

या ठिकाणी मिशनरी लोक व त्यांची मिशनें यासंबंधी लिहिलें तर अप्रासंगिक होणार नाही. मिशनरी लोकांपासून या देशावर फांहीच उपकार झाले नाहीत असे एकदम म्हणतां येणार नाही. सर्वसाधारण शिक्षणप्रसारार्थ शाळा उघडून व रोग्यांकरित दवाखाने सुरू करून मिशनरी लोकांनी आमचे देशाची थोडी बहुत सेवेच्या कामगिरी केली आहे. नाही असे नाहीं. या उपकारायद्दल आपण त्यांचे ऋणी आहोत. परंतु इतकें आहे तरी हे सांगणे प्राप्त आहे की, या लोकांनी आमचे देशाचे नुकसानही फार केले आहे. बाटलेले लोकांचे राष्ट्रीय विचार पार मावळतात हें अनुभवसिद्ध आहे.

जे लोक येथे मिशनरी म्हणून युरोपांतून येतात. त्यांविषयी तिकडील लोकांचे मत असे आहे की, हे मिशनरी लोक हिंदुस्थानांतील जंगली लोकांना शिक्षण देऊन सुधारण्याचे कामी अत्यंत मोठा–

आत्मत्याग करीत आहेत. परंतु वस्तुस्थिति याहुन फार भिन्न आहे. नीट निरीक्षण केलें तर असे दिसून येईल की, मिशनरी लोकांचा अधिकांश या देशांत येऊन मोठ्या मौजेने कालक्रमण करीत असतो. विलायतचे लोकांना त्यांचे हें कारवाईचे वर्तन पूर्णपणे न कळल्यामुळे ते या मिशनरी लोकांना कार्य करण्यास सढळ हाताने हरएक प्रकारची मदत पाठवितात. मिशनरी लोक इंग्रज व्यापारी लोकांबरोबरच हिंदुस्थानांत आले नाहीत. जेव्हां इंग्रज व्यापाऱ्यांचे बस्तान हळू हळू इकडे चांगले बसू लागले व त्यांचे राज्य हळू हळू वाढूं लागलें, तेव्हां हे मिशनरी उर्फ बाटवणारे या देशांत प्रथम आहे. एका स्वतंत्र जातीला परतंत्र बनविण्याकरितां कांही ना काही तरी बनावट उद्देश हा पाहिजेच असतो. तो या पाद्री लोकांना इकडे पाठवून सुरू करण्यात आला. याला जग असे समजू लागले की इंग्रज लोक हिंदुस्थानांत किंवा इतरत्र केवळ स्वार्थाकरिता राज्यवृद्धि करीत नसून, तेथील अज्ञानांधःकारांत पडलेल्या लोकांना ज्ञानदीप दाखवून ख्रिस्तपदास पोचविण्याकरिता होय! मग काय पहावयाचे। या ढोंगी मिशनरी लोकांचे कपटजाल सुरळीत व निर्भय चालविण्या करितां पाण्यासारखा पैसा इकडे येऊ लागला. इकडे भरतखंडांत मिशनरी लोक खंडोगणती आले व त्यांनी धर्मप्रसाराचा सुळसुळाट करून दिला. प्रत्येक गांवीं मिशनरी मठ स्थापन झाले. जागोजाग मिशनरी लोकांना राहण्याकरिता भव्य व सुंदर मंदिरें व मठ
स्थापण्यांत येऊन त्या लोकांचा संसार त्या ठिकाणी थाटला. विलायतचे लोक समजत असत की, आमचे गोरे लोक सात समुद्रांपलीकडे

जाऊन काळ्या लोकांत राहून फार कष्ट सहन करितात. व याच कारणाकरितां ते मिशनऱ्यांना स्वखुषीनें वाटेल ती मदत देत असत. लोक असे समजू लागले कीं इंग्रज लोकांनी हिंदुस्थान देश स्वतःचे फायद्यासाठीं जिंकला नसून त्या लोकांचा उद्धार करण्याकरिता काबीज केला. पण आज या गोष्टीवर कोण विश्वास ठेवील ? प्रथम मिशनरी लोकांनी हिंदी लोकांना खिस्ती बनविण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्यांना इंग्रजी शिक्षण द्यावें म्हणजे बिनबोभाट काम झालें असा होता. इंग्रजी शिक्षणा नें त्यांचें मूर्तिपूजा, कर्मठपणा इत्यादि वाईट संस्कार आपोआप नाहींसे होतील. त्यावेळीं लोकांना एकदम बाटविणें फार कठीण होते. म्हणून खिस्ती लोकांनी येथे विद्यालय व औषधालयें सुरू केली. पुढे जसजशी राज्यवृद्धि होऊं लागली तसतशी दरबारांत इंग्रजी भाषेची जरूरी वाटून ती राजभाषा झाली. इंग्रजी शिकल्यावांचून व नोकरी केल्यावाचून कित्येकांना चरितार्थाचे अन्यमार्ग बंद वाटले. या सर्व अडचणी जागून लोकांनीं मिशनरी शाळांमधून आपली मुले शिकण्यास पाठविली. वास्तविक केवळ दारिद्र्यामुळे बहुतेक अनाथ लोकांनी खिस्ती धर्माचा स्वीकार केला. याचे कारण, आज काल जे लोक खिस्ती होतात त्यांमध्ये क्वचितच कोणी उच्च व कुलीन घराण्यांतला किंवा श्रीमंत घराण्यांतला असेल. तसेंच दुष्काळामुळे जीव वांचविण्याकरितां जे जे लोक ख्रिस्ती होतात ते सर्व आपलीं नवीं नांवें धारण करूनही आपल्या प्राचीन देवदेवतांनाही मोठ्या आनंदानें वंदन करितात. " नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण " या न्यायानें हिंदुधर्माचेहि भाग्योदयाचे दिवस आल्याशिवाय रहाणार नाहीत

आज दरसाल सुमारें लाख सव्वा लाख लोक ख्रिस्ती होत आहेत. तथापि हिंदु मिशनरी संस्थेसारख्या अनेक संस्था निघून व हिंदुधर्माला व्यापक स्वरूप देऊन बाटलेल्या लोकांना परत हिंदुधर्मांत घेण्याचे प्रयत्न जोरानें आज चालू आहेत तें इष्टच आहेत.

१४ नाइलाज होऊन धर्मांतर

अगदी बालवयांत हिंदूधर्मावरील श्रद्धा व प्रेम यामुळे इंग्रज मळेवाल्यांचा आतिथ्यस्वीकार ज्या सुरेशनें केला नाहीं तो आज बाटून खिस्ती झाला आहे हें वाचून वाचकवर्गाला अत्यंत सखेदाश्वर्य वाटेल. ह्या ठिकाणी त्याला धर्मांतर करण्यास कोणती कारणे घडली याचा थोडा विचार केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं.

सुरेशचे रोजचे व्यवहार दिवसेंदिवस इतके खराब होत चालले की, त्याजवर प्रेम करणारे व त्याला हुशार समजणारे त्याचे काकादेखील त्यावर क्रुद्ध झाले. त्याचे वडील कट्टे वैष्णवपंथी असल्यामुळे सुरेशला कुमार्गापासून ताळ्यावर आणण्याकरितां हरतऱ्हेचे शिक्षा व दंड करून उपाय योजीत असत. परंतु सुरेशनें त्यांच्या कडक शिक्षांची पर्वा केली नाहीं. तो आपला सारा वेळ ख्रिस्ती मित्रांचे घरी घालवीत असे .--

एकट्या आई खेरीज इतर सर्व माणसे त्याजविषयीं एकप्रकारची निर्दयता दाखवीत असत. या कारणामुळे सुरेशचे मन देखील घरी लागेनासें झालें. अशा स्थितींत कांहीं काळ लोटला. एकीकडे गिरीश बाबू आपला मुलगा ताळ्यावर यावा म्हणून हरप्रयत्न करीत होते, तर दुसरीकडे सुरेश घरांतील संबंधच तोडून टाकण्यास उद्युक्त झाला होता. होतां होतां एके दिवशीं पितापुत्रामध्ये त्याचे वर्तनासंबंधीं बोलतां बोलतां गोष्टी इतक्या थरावर आल्या कीं, सुरेश घरी केव्हांहि परत यावयाचे नांहीं असा निश्चय करून एकाएकीं घर सोडून गेला. या बाबतींत त्यानें आपले ख्रिस्ती दोस्तांचा सल्ला घेतला. त्यांनी त्याला आपल्या घरीं ठेवून घेण्याचे आश्वासन दिलें. तथापि त्याला तें मान्य झालें नाहीं. त्याने आपली सर्व हकीकत प्रिन्सिपाल मि. अष्टन यांस निवेदन केली. त्याची त्या दुःखांतून सुटका व्हावी या सदिच्छेनें त्याला त्यांनी ख्रिस्ती होण्याचा उपदेश केला. त्यानंतर थोडे दिवसांनीं बायबल वाचन होऊन मि. अष्टन यांनीं सुरेशला बाटविण्याचे श्रेय घेतलें. हें वर्तमान जेव्हां सुरेशचा बाप व घरांतील मंडळी यांना कळलें, तेव्हां त्यांनीं सुरेशचे तोंड पहावयाचें नाहीं अशी घोर प्रतिज्ञा केली. आतां सुरेशची घर ना दार अशी स्थिस्ती झाली. परंतु मि. अष्टन यांनीं त्याला एक घर देऊन त्याची नीट व्यवस्था करून दिली. त्याचप्रमाणें सुरेशचे मनांत असते तर त्याला बायबल उत्तम शिकवून खेड्यांतून धर्मोपदेशकाचे काम मिळून त्याचा चरितार्थ चालला असता; परंतु सुरेशसारख्या मनोवृत्तीच्या नवयुवकाला हें आवडणे शक्य नव्हते.

स्वतःचा चरितार्थ चालविणें स्वतःचे अंगावर पडल्यामुळे तो आतां नोकरी धुंडू लागला; परंतु अशिक्षीत व कमी वयाचा असल्यामुळे त्याला नोकरीस कोणीच ठेवीना. या योगानें त्याचे मनाला फार दुःख वाटू लागले. परंतु दुःख करून काय उपयोग? तो ज्या गृहस्थाकडे भेटण्यास जाई तो त्याला टाकून बोलत असे. व त्याला धिःकारीत असे. 'घराबरोबर घराचे वासेही फिरतात' अशी त्याची स्थिती झाली. सुरेशची कष्टमय परिस्थिती दिवसेंदिवस वाढूं लागली. शेवटीं सुदैवानें त्याला एका फराळाचे दुकानांत लहानशी नोकरी मिळाली. स्पेनच्या एका हॉटेलचा तो मार्गदर्शक पोऱ्या झाला. त्याला दररोज फक्त स्टेशनवर जावें लागे व दूर देशाहून आलेल्या इंग्रज पाहुण्यांना हॉटेलांत पोचवावे लागत असे. प्रसंगोपात त्याला असल्या मुशाफर लोकांना शहरांत चोहोंकडे फिरवून पाहण्यासारखी स्थानें दाखवावी लागत. थोडेफार इंग्रजी येत असल्यामुळे तो त्या लोकांशी विचार पूस व गोष्टी करीत असे. तो आपले कामांत इतका दक्ष व हुशार असे कीं जे लोक तेथे येऊन रहात असत ते नेहमी त्याजवर प्रसन्न असत. थोडे दिवसांनी त्याला या कामाचा वीट आला व आपण युरोपखंडांत भ्रमण करावयास जावें असे त्याला वाटूं लागलें. तो नेहमीं कोणत्या ना कोणत्या प्रकारें विलायतेस जाण्याच्या विचारांत असे. परंतु जाण्यास पुरेसे रुपये कोठून आणावे हा मोठा प्रश्न राही. धर्मांतर केल्यापासून त्याला आपल्या काका-कडून किंवा प्रिय मातेकडूनदेखील इतके रुपये मिळणे असंभवनीय होतें. सुरेशची परदेशांत जाण्याची इच्छा इतकी प्रबल झाली की,काही झाले तरी–

- परदेशगमन केल्याशिवाय रहायाचे नाहीं अशी त्यानें घोर प्रतिज्ञा केली. मि. ऑस्टन देखील त्याच्या या प्रयत्नास यश यावें म्हणून उपाययोजना करीत होते. परंतु जरी ते सुरेशच्या उत्कर्षाकरितां प्रयत्न करीत होते तरी त्यांचे ते करणे व्यर्थ झाले. कारण सुरेशचे व सरस्वतीचें खडाष्टक होते. त्यांनीं आपल्या पुत्राप्रमाणें त्याला सुधारण्याचे बबातींत परिश्रम घेतले हें खालील लैफंट साहेबास पुढे त्याच्या भावाचा परिचय करून देण्याकरतां लिहिलेल्या पत्रावरून व्यक्त होतें.

" आमच्या शाळेचे विद्यार्थी व २१ वर्षापूर्वी आमचे मिशननें ख्रिस्ती केलेले सुरेशचंद्र विश्वास यांचे सदर बाबू महाशय हे धाकटे बंधू आहेत. माझें सुरेशचंद्रावर फार प्रेम होतें. युरोपखंडांतील देशांत भ्रमण करण्याची त्यांची इच्छा माझे घरांतच उद्‌भवली व तिचा आम्हांस प्रतिकार करवेना. शेवटीं त्यांनीं युरोपचा प्रवास केलाच. ते येथून लंदनपर्यंत बी. आय. स्टीमरचे कोठीवाल्याचे मदतनीस होऊन गेले होते. तेथे पोहोचल्यावर ते माझ्या माता-पित्यांकडे गेले. त्यांनीं व माझे भगिनींनें त्यांची हकीकत मोठ्या खुषीनें ऐकली. इंग्लंदांत सुरेशचंद्राला पुष्कळ कठीण प्रसंगांतून जावें लागलें. पुष्कळ कष्ट सहन केल्यावर त्यांची मि. जामरेक साहेबाशीं मुलाखत झाली. त्या साहेचांनी त्यास आपले जवळ नोकरीस ठेवून घेतलें, व त्यांना योग्य मार्गदर्शन केल.

थोडे दिवसांनी सुरेशचंद्र त्यांचे मंडळींत वाघाला माणसाळवून शिकविण्याचे काम करूं लागले. आपले हे कौशल्याचे खेळ सुरेशचंद्राने —

-युरोपांतील बहुतेक मुख्य मुख्य शहरीं दाखविले व खुद्द लंदन शहरांतील कृषिभुवनांत देखील करून दाखविले. पुष्कळ दिवसपर्यंत अनेक देशांत प्रवास केल्यानंतर ते ब्राझिल देशांत रायो-डि-जानिरो नामक शहरी राहूं लागले. आज ते तेथेच आहेत. तेथे ते मोठ्या हुद्यावर आहेत. एकवेळ ते तेथील अजबखान्यावर (प्राणीसंग्रहालयावर) मुख्य होते. आश्चर्याची गोष्ट ही कीं शेवटीं ते ब्राझिलचे फौजेत नोकरी धरून लेफ्टनंट कर्नलचे मोठ्या हुद्यापर्यंत चढले. तेथून त्यांनीं आपले घरचे मंडळींना पत्रे पाठविलीं आहेत. ती सर्व मला वाटतें पोर्तुगीज भाषेत आहेत. त्या पत्रांचा अर्थ कळावा म्हणून ते चिंताग्रस्त आहेत. त्यांना व मलाही हें माहीत आहे की, आपणाला पोर्तुगीज भाषेतील पत्र वाचतां येतें, अगर आपणाला वाचतां न आले तर दुसरे एकादे पाद्री साहेबां-कडून वाचून घ्यावें. आपण किंवा दुसरे कोणी सज्जन या पत्राचा अनुवाद करण्याचा त्रास घेतील; किंवा शब्दशः अनुवाद करण्याची आशा नसलीच (आपले पदरचे कोणी कामगार हैं कार्य करील तर गोष्ट निराळी) तरी पत्राचा भावार्थ त्यांना समजला तरी आम्ही संतुष्ट होऊं "

१५ ब्रम्हदेशचा प्रवास

दिवसेंदिवस कलकत्ता सोडून दुसरे देशांत जावें अशी प्रबल इच्छा सुरेशला होऊं लागली. अखेर तो ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनींत गेला, व त्या खात्यांत त्याला एक नोकरी मिळाली. तेथे नोकरी करून त्यानें रंगूनला जाण्याची तयारी केली. तो विलायतेस जाण्यास अत्यंत उत्सुक झाला होता यांत मुळींच शंका नाहीं. परंतु खर्चण्यास मुळींच नसल्यामुळे तो लाचार होता. त्या काळी ब्रम्हदेशाची स्थिति फार वाईट होती. दक्षिण ब्रम्हदेशांत इंग्रजी अंमल चांगला बसला नव्हता; आणि उत्तर भागांत अद्याप तद्देशीय राजेच राज्य करीत होते. त्या ठिकाणीं इंग्रजी जाणणारांची फार आवश्यकता होती. सुरेशनें तेथे आपणास कोणती ना कोणती तरी नोकरी मिळेल हा विचार करून आपला तिकडे जाण्याचा निश्चय केला होता. त्या ठिकाणीं त्याला नोकरी ताबडतोब धरण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. कारण रोजच्या उदरंभरणाकरितां जवळ पुरेसे दाम नव्हते. त्यासाठीं तो रंगूनला पोहोंचतांच प्रथम एक कमी भाड्याचे घर धुंडूं लागला. फिरतां फिरतां वाटेंत त्याला त्याचा एक फार जुना मित्र भेटला. त्या मित्रानें त्याला आपले घरीं नेलें; व त्याला तेथेच ठेऊन घेतले. सुरेशनें देखील नोकरी लागेपर्यंत तेथे रहाण्याचा निश्चय केला. त्यावेळीं रंगून शहर फार विपन्न स्थितींत होतें. ते फार बकाली व घाणेरडे शहर होतें. चोहोंकडे दरोडेखोर लोकांच्या टोळ्या भटकतांना दृष्टीस पडत. पोलीसचा बंदोबस्त साधारण असा

-तसाच असे. शहरच्या बाहेरचे रस्त्यावर तसंच आडरस्त्यावर दिवसा एकटे बाहेर पडण्याची भीति लोकांना वाटत असे; मग रात्रींच्या समयीं काय घडेल हें विचारावयासच नको. बहुधा नवख्या प्रवाशावर नेहमीं हल्ले होत असत. सुरेशच्या मित्रानें त्याला या सर्व संकटांची व धोक्यांची माहिती करून दिली होती व मोठ्या सावधगिरीनें रहाण्यास सांगितले होतें. मित्राचे या उपदेशाचा परिणाम सुरेशवर किती झाला याची हकीगत पुढील प्रकरणांत पहावयास मिळेल.

१६ डाकूबरोबर दोन हात.

होडीत बसून इकडे तिकडे फेरफटका करण्याची सुरेशची शोक अद्याप कायमच होता. एके दिवशीं दोन प्रहरचे सुमारास होडीत बसून इरावती नदीचे किनाऱ्या किनाऱ्यानें होडी चालवीत असतां सूर्यास्ताचा समय होत आला. संध्यासमय होतांच नदीचे किनाऱ्या-वर होडी अडकवून आपण फिरत फिरत घरीं जावें असें ठरवून मोठ्या धिटाईनें तो घराकडे हळूहळू जाऊं लागला. त्यावेळीं त्याजवळ कोणत्याही प्रकारचे हत्यार नव्हते. फक्त एक रूळ काय तो त्याजपाशीं होता. त्याव्यतिरिक्त लाठी किंवा सोटा मुळींच नव्हता. सुरेश आपल्या परिस्थितीचा विचार करीत करीत हळूहळू घरी जात होता.रस्त्यावर–

-दोन शेतकऱ्यांखेरीज त्याला कोणी सुद्धां भेटलें नाहीं. एका आकुंचित व अंधारमय गल्लींतून जात असतां त्याला आपणाकडे कोणी दगडासारखे काहीं तरी फेकीत असल्याचा भास झाला. परंतु त्याचे नजीकचे वृक्षावर ते आदळतांच कोणा तरी डाकूनें शस्त्र फेकलें असावें असे त्यास तत्काळ कळून आलें तो थोडा दूर गेला असेल नसेल तोंच तसलेंच एक हत्यार पुनः कोणीं फेंकले; परंतु ईश्वराच्या कृपेनें दोन्ही शस्त्रांपासून त्याचा अकल्पित बचाव झाला. इतक्यांत दोन पुरुष आपले अंगावर चालून येत आहेत असे त्याला दिसले. तत्काळ त्याला आपल्या मित्रानें केलेल्या सूचनांची आठवण झाली. ते पुरुष पहातांच त्याला आपल्य जीविताची बिलकूल आशा उरली नाहीं. शेवटीं मरावयाचे आहे, तर वीराला उचित असे युद्ध करून धरणीवर पडूं असे ठरवून तो दोन पावलें मागें सरकला व आपले हातांतील रूळ उभा धरून पावित्र्यावर उभा राहिला, आणि आपल्या प्रतिपक्षीयांची वाट पहात तो दांत ओठ खाऊं लागला. आपले सावज केवळ एक तरुण बालक आहे असे पाहून त्या डाकूंपैकी फक्त एकजण त्यावर चालून आला.सुरेश त्याचा समाचार घेण्यास अगदीं सज्ज होता. तो दरोडेखोर जवळ येतांच सुरेशनें आपला रूळ त्याचे कानशीलावर जोरानें मारला.तत्क्षणीं तो धाडकन् जमिनीवर आदळला. आपल्या साथीदाराची ती दशा पाहून दुसऱ्या डाकूला स्थिर बसवेना तो ताबडतोब पुढे आला,व सुरेशच्या हातांतला रूळ हिसकावून घेऊन फेंकून दिला. दोघेही निःशस्त्र असल्यामुळे झोंबाझोंबी सुरू झाली. सुरेशचा प्रतिस्पर्धी–

चांगला दांडगा गडी होता. त्याला मल्लयुद्धांत जिंकणे कठीण हें त्यानें तेव्हांच ताडलें. झगडतां झगडतां सुरेश बराच दमला. इतक्यांत दूरवर एक वरात जात असलेली त्याला दिसली. ती पहातांच त्याने मोठ्यानें बोंबाबोंब सुरू केली; तरी तो मोठ्या हिकमतीनें लढतच होता. वरातीकडची मंडळी जवळ येत आहेसें पाहून पुढें पळून जाण्यास संधी मिळणार नाहीं हें कळतांच, तो दरोडेखोर ताबडतोब पोबारा करून निसटला. इतक्यांत कांहीं मनुष्यें तेथे आली व त्यांनी सुरेशला वांचविलें.

१७ एका तरुणीस जीवदान

कित्येक दिवस सुरेशचंद्र रंगून येथील सरकारी व बिनसरकारी कचेऱ्यांत नोकरीसाठीं खेट्या घालीत होता. जेथे जेथे नोकरी मिळण्याचा संभव होता तेथे तेथे तो उमेद धरून जात असे. दुर्दैवाने त्याला नोकरी तर मिळाली नाहींच पण एकाहीं ठिकाणी थोड्या दिवसांनीं मिळेल अशी आशाहि त्याला राहीली नाहीं. शेवटीं अत्यंत निराश होऊन त्यानें तेथून कूच करावयाचे ठरविलें. ज्या दिवशीं तो तेथून निघणार होता त्याच दिशीं संध्याकाळीं शहरांत दोन घटका फिरावें असें त्यास वाटलें. फिरावयास निघाला-

---

१ येथून पुढे सुरेशला सुरेशचन्द्र या नांवानें उल्लेखिलें आहे.

-असतां थोडा चालून गेल्यावर त्याला दूरवर लोकांची गर्दी दिसली व मोठमोठ्यानें आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. तांतडीनें थोडा जवळ जातो तों, "धावा, पळा, आग लागली, " असे शब्द त्याचे कानीं आले. आग लागलेल्या घरापाशी येतांच आगीचा भयंकर देखावा त्याचे दृष्टीस पडला. एका घराला आग लागून ती शेजारचे घराकडे पसरत होती. शेकडो लोक गोळा होऊन आगीचा तमाशा पहात उभे होते. फक्त दोघे चौघे आग विझविण्याचा प्रयत्न करीत होते. कांहीं पाणी आणून आग विझविण्याचे काम करीत होते. कांहीं लोक भिंतीची पाडापाडी करीत होते. हा प्रकार पाहून सुरेशचंद्राच्या प्रकृतीला स्वस्थ उभे राहवेना. तो चटकन् आग विझविणारांचे मदतीस गेला. परंतु ह्या थोड्या लोकांचे प्रयत्न निष्फळ होऊन आग वाढतच गेली. आगीचा फैलाव होऊन जिकडे तिकडे आगीचा हलकल्लोळ उठला असतां एका घरांतून एका स्त्रीचा आर्तस्वर ऐकू आला. सर्व लोक सभयाश्चर्यचकित होऊन त्या घराकडे पाहूं लागले. इतक्यांत दुसऱ्या मजल्यावरची एक खिडकी ताडकन् उघडली. खिडकी उघडतांच तींतून धुराचे लोट बाहेर पडून थोड्याच वेळांत एक तरुण स्त्री दिसली. तिनें दोन्ही हात वर केलेले होते. व धुरानें तिचा जीव गुदमरून गेला होता. तिचा चेहरा धुरानें पिवळसर दिसत होता आणि अत्यंत करुणाजनक अशा स्थितीत ती धाय मोकलून रडत होती.

तो हृदयद्रावक देखावा पाहून सर्व प्रेक्षकांना अत्यत दुःख झालें, परंतु आगीत उडी घालून त्या अबलेचे संरक्षण करण्याची तयारी छाती एकाही-

-बघ्यास झाली नाहीं सर्वजण भयभीत होऊन त्या तरुण स्त्रीच्या दुष्ट भवितव्याचा भयाण देखावा पहात उभे होते. कोणाच्याही तोंडांतून तिच्या सुटकेचा एक देखील शब्द निघेना. असा विचार करता करतांच ती तरुणी जळून भस्म होऊन जाईल या विचारानें सुरेशचंद्राचे हृदयांत असह्य वेदना होऊं लागल्या. प्राण गेला तरी बेहत्तर पण या तरुण स्त्रीचा प्राण वाचवल्याखेरीज राहणार नाहीं, असा त्यानें निश्चय केला. त्यानें आसपास असलेल्या लोकांना शिडी आणण्यास सांगितलें. शिडी हातीं येतांच त्याने एक घागरभरपाणी आपल्या डोक्यावर ओतून अंग भिजविलें व एका भिंतीच्या आश्रयानें शिडी लावून तो वर चढूं लागला. केवळ १५ वर्षाचे बालकाचें तें निःसीम धाडस पाहून सर्वांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. आगीचा डोंब सारखा भडकत होता. मोठ्या कष्टानें व युक्तीनें सुरेशचंद्र त्या खिडकी पर्यंत गेला. खिडकी पेटून धाड् धाड् जळत होती. त्या जळत्या चौकटींतून आंत जाणे कांहीं सोपी गोष्ट नव्हती. समोरच ती तरुणी रडत उभी होती तिच्या चारी बाजूंस धुराचे लोट दिसत होते तो भयंकर देखावा सुरेशचंद्राचें अंतःकरण द्विधा झालें परंतु ती स्थिति फार वेळ टिकली नाहीं. मृत्यु आला तरी बेहत्तर. देहांत प्राण असेपर्यंत या तरुणीस आपले समक्ष मरूं देणार नाहीं, अशी प्रतिज्ञा त्यानं आधींच केली होती. पुन्हां त्याला स्फुरण चढले. शिडीच्या एका टोकावर उभें राहून मोठ्या चलाखीनें त्याने खिडकीच्या चौकटीतून–

-खोलीत उडी मारली. ती तरुणी त्याच खोलीत अगदीं हताश उभी होती. तिच्या सभोंवार चोहोंकडे आग पेटली होतो. तिला घेऊन बाहेर कसे निघावें या विचारांत तो होता. त्या खोलीत तर त्यापेक्षां अधिक वेळ उभें राहणें म्हणजे प्राणावर संकट आणण्याप्रमाणेच होते. अशा विचारांनीं अत्यंत व्याकुळ होऊन सुरेशनें चोहोंकडे पाहिले; परंतु बाहेर निघण्याचा उपाय त्याला सुचेना, इतक्यांत त्याला कांहीं सुचलें. तो थोडासा मागे सरकला, व त्याने त्या जळत्या खिडकीवर जोरानें एक लाथ मारली. लाथ मारतांच ती अर्धवट जळालेली खिडकी धडाडू एकदम खालीं कोसळली. परंतु दुर्दैवाने तिच्या आसऱ्यावर ठेवलेली शिडी एकाएकी खालीं पडली. त्यानें खाली उभे असलेल्यांना मोठमोठ्याने " बंधुहो शिडी भिंतीला लावा" अशी ओरड केली. त्या गडबडीत त्याचे ओरडणें कोणासही ऐकूं गेलें नाहीं; परंतु एका प्रेक्षकाला त्याच्या म्हणण्याचा इरादा समजून त्यानें ताबडतोब शिडी भिंतीशीं उभी केली. कित्येक लोकांनी ते दोघे उतरतांना पडू नयत म्हणून खालीं त्या शिडीला दाबून धरली होती. नंतर सुरेशचंद्रानें त्या तरुणीला कडेवर घेऊन शिडीच्या साह्यानें तो खालीं उतरूं लागला. सुमारें चार सहा हात खाली उतरावयाचे राहिले होतें, इतक्यांत शिडीचे बाजूचे लाकूड तुटून शिडी धाडकन् खालीं आलीं. सुदैवानें खालीं शिडी दाबून धरलेल्या लोकानीं दोघांनाही हातांवर झेलून धरलें, व त्यांना जखम वगैरे होऊं दिली नाहीं.

सुरेशचंद्र जमिनीवर उभा राहिला असेल नसेल, तो त्याला एकाएकीं घेरी आली व थोड्याच वेळांत तो बेशुद्ध पडला. त्याचे अंग बरेच ठिकाणी भाजले होतें, व धुरामुळे त्याचा जीव गुदमरला होता. खाली आल्यावर काय झालें, या गोष्टीची त्याला मुळीच आठवण नव्हती. जेव्हां शुद्धीवर आला तेव्हां आपण आपले मित्राचे घरीं अंथरुणावर निःशक्त स्थितीत पडलेले आहोत असे त्याला दिसले ज्या तरुणीला सुरेशचंद्रानें जीवदान दिले, तिच्या नातलगांनी त्याची शुश्रूषा फार उत्तम प्रकारें केली. सुरेशचंद्राच्या खिशांत एक कागद होतां, त्याच्या मित्राचा त्यावर ठिकाणा लिहिलेला होता; त्याप्रमाणें त्यानीं त्याला मित्राचे घरीं सुखरूप पोहचविले त्या तरुण कुमारीला सुरेशचंद्र विषयीं फार प्रेम वाटत असे. थोडेच दिवसांत तो चांगला बरा झाला. ती तरुण कुमारिका आपणांवर फार प्रेम करते, असे त्याला पुढें कळून आलें तथापि त्या प्रेमाचा मोबदला देण्यास तो असमर्थ होता. जिला मी जीवदान दिले तिच्याशी विवाह संबंध करणें हे मला अप्रशस्त वाटतें, असे त्याने तिला उत्तर दिलें. आपल्या या कठोर शद्बांनी त्या कुमारिकेला अत्यंत दुःख झालें, हें पाहून त्यालाही फार वाईट वाटले. शेवटी त्यानें रंगून सोडून देण्याचा व दुसरीकडें कोठें तरी प्रयाण करण्याचा निश्चय केला.

१८ मद्रासचा प्रवास

सुरेशचंद्र रंगूनहून परत कलकत्यास आपले घराकडे गेला नाही. रंगून शहरांत मद्रासी लोक पुष्कळ राहतात. त्यांतील कित्येक मद्रासी लोकांबरोबर सुरेशचंद्राचा चांगला परिचय झाला होता. त्याचे मनांत मद्रासेस जाण्याचा विचार आला. तेथे कदाचित् एखादी नोकरी मिळेल या आशेनें त्याने तेथे जाण्याचा आपला निश्चय कायम करून तिकिट विकत घेतले. मद्रासेस गेल्यावर त्याची स्थिति रंगूनप्रमाणेच झाली. त्याची कोणाशी ओळख नव्हती. कोणत्याना कोणत्या तरी उपायाने त्यानें आपली राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था केली. कांहीं कचेऱ्यांतून त्याने नोकरीचा शोध केला, परंतु त्याला एकही नोकरी मिळाली नाही. शेवटीं त्याजपाशी पांच कां सात आण्यांचे पैसे शिल्लक राहिले. त्यामुळे खाण्यास नसल्यानें 'जगायचे कीं मरायचे' हा मोठा बिकट प्रश्न त्याजपुढे उभा राहिला. तथापि तो निराश झाला नाहीं. एके दिवशी 'आतां काय करावें' या विचारानें भ्रमिष्ट होऊन समुद्रकिनाऱ्यावर फिरत असतां या दुःखमय स्थितीत प्राणत्याग करावा असे विचार वारंवार त्याचे मनांत आले. परंतु धीर धरून त्यानें त्या भ्रमिष्ट विचारसरणीला आपले अंकित केले व पुढे चालू लागला. इतक्यांत त्याची दृष्टी एका वृद्ध व शांत मनुष्यावर गेली. त्यानें एकदम जाऊन त्याला साष्टांग नमस्कार घातला व आपली जन्मकहाणी सांगू लागला. त्याची कहाणी ऐकून त्या वृद्ध ग्रहस्थास फार दया –

–आली. त्यानें सुरेशंचंद्राला पूर्ण साहाय्य करण्याचे आश्वासन दिले. त्याने त्यास आपल्या नातूपणतूवर देखरेख करण्यास घरी ठेवून घेतलें. सुरेशचंद्राने हे काम इतक्या उत्तम रीतीनें केलें कीं, थोडेच दिवसांत तो वृद्ध गृहस्थ व त्याचे कुटूंबांतील माणसे त्याजवर अत्यंत प्रेम करूं लागलीं. कित्येक महिने सुरेशचंद्र त्याच गृहस्थाचे घरी राहिला. पुढे थोडेसे रुपये त्याचजवळ शिल्लक पडतांच त्यानें कलकत्त्यास परत आपले घराकडे जाण्याचा निश्चय केला.

१९ परत कलकत्त्यास

रंगूनहून मद्रासेस व मद्रासहून कळकत्त्यास ज्या विशेष हेतूकरितां सुरेशचंद्राने प्रवास केला तो सफळ झाला नाही. कलकत्त्यास पोहचल्यावर देखील सुरेशचंद्र नोकरीकरितां इकडे तिकडे खेट्या घालीत होता. परंतु त्याला नोकरी मिळाली नाहीं. मि० अष्टन साहेबांनी त्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली होती, त्यामुळे त्या बाबतींत त्याला अधिक कष्ट झाले नाहींत. तो आपणास लागणाऱ्या वस्तु कधींकधीं आपले मातोश्रीकडून आणवीत असे. परंतु आशा तऱ्हेनें आयुःक्रमण करणें केवळ निरर्थक —

–व अपमानास्पद आहे असे वाटून त्याने कांहींना कांहीं तरी शिकण्याचा तत्काळ निश्चय केला. कादंबऱ्या वाचणे, त्याला फारसे आवडत नसे, ज्या पुस्तकांत निरनिराळ्या देशांचीं वर्णने असत व जीं पुस्तकें बोधप्रद असत, अशीच पुस्तकें तो नेहमीं वाचीत असे. हळुहळू त्याची बुद्धि विकास पावू लागली. त्याच्या त्या हीन व कफल्लक परिस्थितीतसुद्धां यूरोपखंडांतील देशांत प्रवास करावा, अशी उत्कंठ इच्छा त्याला वारंवार होत असे. परंतु इच्छेला जर फळे येती तर आजचें जग कांहीं निराळ्या स्वरूपांत असते. तो बहुधा इंग्रज खलाशांकडे जाऊन समुद्रयात्रा व पश्चिमेकडील अनेक देशासंबंधी पूसतपास करीत असे. या कारणांनी त्याची परदेशगमनाची इच्छा अधिक बलवत्तर होत गेली. इष्ट हेतु साध्य व्हावा. म्हणून त्यानें पुष्कळ जहजांवरील प्रमुखाकडे नोकरीचा शोध केला, परंतु चोहोंकडे त्याला नकारात्मक उत्तर मिळालें. मामुली खलाशाची नोकरी देखील त्याला मिळणे कठीण झाले. तो हताश झाला, व त्याला सर्वत्र निराशेचा अंधःकार दिसू लागला.

२० मातृभूमीची रजा व समुद्रप्रयाण

कित्येक आठवडे सुरेशचंद्र भणग्याच्या भुसा प्रमाण भटकत होता. शेवटी सुदैवाने त्याची व एका जहाजाचे कप्तानाची भेट झाली . पुढे —

नेहमीं त्याचे कडे जाणे-येणें ठेवून च कप्तानाशी अदबीनें वागून थोडेच दिवसांत त्यानं त्याचें प्रेम संपादन केले व ते दोघेही मित्र बनले. सुरेशचंद्राने ही उत्तम संधी हाती जाऊं दिली नाहीं. एके दिवशीं योग्य वेळ पडून कप्तानाला त्यानें आपली मनीषा सांगून टाकली. त्याची सांपत्तीक दुःस्थिति पाहून कप्तान त्याच्या प्रश्नाला उत्तरे देण्याची टाळाटाळी करूं लागला. परंतु सुरेशचंद्राचे प्रेमळ भाषणाचा कप्तानावर असा कांहीं विलक्षण पगडा बसला होता की, त्यानें हो ना करतां करतां आपले जहाजावर कोठीवाल्याची नोकरी देऊन इंग्लंड देशास घेऊन जाण्यास तो कबूल झाला. थोडे दिवसांनीं जहाज कलकत्त्याहून निघालें. सुरेशचंद्राच्या आयुष्यांन हा महान् क्रांतीचा दिवस ठरला.

बंदरांतून जहाज हालतांना सुरेशचंद्राच्या अंतःकरणाची काय स्थिति असेल बरें? जन्मदात्री माता, पिता, काका व इतर बांधव या पैकीं तेथे त्याला निरोपै देण्यास कोणीही नव्हतें जी व्यक्ती आपल्या देशमातेला कायमची सोडून जाणार तिचा शोक काय विचारावा? आटोकाट प्रयत्न करून देखील त्याला आपले रडें व अश्रु आवरेनात. लवकरच त्याने स्वतःचे समाधान करून घेतलें, आपली शोकमय स्थिति छपविण्याकरितां त्यानें आपला चेहरा हातरुमालानें झांकून घेतला, व थाडे वेळाने आपल्यावर सोपविलेले कार्य करण्याकरितां कोठीकडे चालता झाला.

ज्या जहाजांत सुरेशचंद्र कलकत्त्याहून निघाला तें एक साधारण प्रतीचें उतारु नेणारे वाफेचे गलबत (पॅसेंजर स्टीमर) होते. त्यांत प्रवास करणारे बहुतेक गोरे लोक होते. उतारूं खेरीज इतर लोक देखील कांहीं कमी दर्जाचे मुसलमान सोडून सारेच खलाशी इंग्रज होते. सर्व गोऱ्या खलाशांना सुरेशचंद्राला कोठीवर मिळालेल्या नोकरीचा हेवा वाटून ते मनांत जळफळत असत. परंतु कप्तानाच्या भयानें कोणाच्यानेही त्याचे काडीमात्र वांकडें करितां आले नाहीं. सुरेशचंद्राशी कोणीही फारसे बोलत नसे; म्हणून त्याला हया एकांतवासाचा थोडासा कंटाळा आला. परंतु ती सर्व स्थिति फार दिवस टिकली नाहीं. कोणा उतारूंना एखाद्या वस्तूची गरज लागली तर त्याला कोठीवाल्याकडे जावें लागत असे. सर्वांचा संबंध कोठीवाल्यापाशीं येत असे. या योगानें सुरेशचंद्राचा चांगला फायदा झाला. जहाजावरील सर्व लोक त्यांची काम करण्याची तडफ व आचरण पाहून प्रसन्न झाले, व ते त्याजवर प्रेम करूं लागले. जहाजावरील पुष्कळशा स्त्रिया देखील त्याला आपळे जवळ बोलावून त्याजकडून निरनिराळ्या गोष्टी ऐकत असत. थोड्याच दिवसांनी खलाशीदेखील त्याशीं स्नेहानें वागू लागले. या सर्व कारणामुळे सुरेशचंद्राची समुद्रयात्रा फार सुखानें पार पडली. तेहतिसावें दिवशीं जहाज सुखरूप. पणें लंदन शहराला पोहोंचलें. सर्व उतारू लोक मोठ्या उत्सुकतेनें आपापल्या घराची वाट धरते झाले.

२१ लंदन शहरांत

सर्व प्रवासी लोक भेटावयास आलेल्या आपल्या नातलगांना प्रेमानें भेटत होते. कित्येक भेटीनंतर घरोघर जाण्याच्या तयारींत होते. एकटा सुरेशचंद्र काय तो डेकवर उभा राहून आपले घरचे मंडळींची आठवण करीत होता. त्याच्या डोळ्यांपुढे नाथपूर व तेथील देखावे वारंवार येऊ लागले. आपल्या बाळपणच्या मित्रमंडळींची त्याला आठवण झाली व आपल्या प्रिय मातेची आठवण होऊन तिचं दर्शन घेण्याची लालसा त्याला होतांच दुःखानें त्याचे डोळ्यांतून अश्रूबिंदू चमकले. कप्तान व इतर खलाशी आपापले कामांत गुंतले असल्यामुळे सुरेशचंद्र कोठें आहे व तो काय करीत आहे हे कोणासच माहित नव्हतें. प्रवाशांच्या उतरण्याच्या गडबडीने चोहोंकडे आनंदमय दिसत होतें. परंतु सुरेशचंद्र डोलकाठीला टेकून ध्यानस्थ झाला होता. इतक्यांत अकस्मात् एका युवतीनें मागून येवून त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या ध्याननिद्रेचा भंग केला. ती युवती कुमारी होती. हिन्दुस्थानांत वर शोधण्याच्या कार्याकरितां ती मोठ्या आशेने आली होती. परंतु योग्य वर न मिळाल्यामुळे तिला परत घरचा मार्ग धरावा लागला. एकाच जहाजांत प्रवास करीत असल्यामुळे एकमेकांची ओळख बरीच झाली होती. इतर प्रवाशाप्रमाणें तीही आपले आईबापांचे घरी जावयास निघाली-

होती व म्हणून जातांना एक वेळ सुरेशचंद्राला भेटून जावे असे ठरवून ती त्याजकडे आली होती. तिची चाल चाकणूक व हावभाव सुरेशचंद्राला पसंत पडले नाहीत. थोड्या वेळांत ती गेली. जहाजावरील प्रवाशांची सर्व गडबड शांत झाल्यावर कप्तानाने सुरेशचंद्राला जवळ बोलावून घेतले व त्याला म्हणाला "आतां येथें आपली काय करण्याची इच्छा आहे? जहाजावरील नोकर म्हणून राहणार की लंदन मध्ये विद्याभ्यास करणार ?"

सुरेशः -येथे कोणते कार्य मला फायदेशीर होईल या गोष्टीचा मो अद्याप पूर्ण विचार केला नाही. या अपरिचित देशांत येऊन मला केवळ दोन घटका झाल्या आहेत. त्यांतून येथले रहिवासी व रीतीभाती यांच मला बिलकूल माहिती नाही. अशा परिस्थितीतः-

कप्तानः "मी आपका शुभचिंतक आहे, एवढेंच मला आपणांस सांगावयाचे आहे. मजकडून नेहमी जें साहाय्य तें आपणांस मिळेल. आणखी तीन आठवडे आमचे जहाज येथेच विश्रांती घेणार आहे व तोपर्यन्त तुमची खाण्यापिण्याची व्यवस्था याच ठिकाणी उत्तम राहील. तथापि तुम्ही स्वस्थ न बसता आपले चरितार्थाचा पुढील उद्योग करीत रहावें हें बरें .तुम्ही जर उद्योगधंदा केला नाही, तर तुमच्यावर अत्यंत बिकट अशी संकटें येऊ लागतील. मी तर एवढेच सांगू

इच्छितों की उत्तम प्रकाराने राहून आपले हातून असे सत्कार्य व्हावे की, त्यामुळे तुमची व तुमच्या देशाची कीर्ति होईल.” कप्तागाचे हें
अंत:करणपूर्वक भाषण ऐकून सुरेशचंद्राने कृतज्ञतेने त्याचे आभार मानिलें .नंतर कतानसाहेब एजेंटाबरोबर कांही बाबतीत सल्लामसलत घेण्याकरितां चालते झाले, व सुरेशचद्रही एका गोऱ्या खलाशाबरोबर शहरांत शोभा पाहण्याकरितां गेला.

लंदन शहर म्हणजे जगांतील एक अपूर्व स्थान, तेथील उंच उंच सुंदर इमारती सुशोभित दिसणारे रुंद रस्ते पाहून सुरेशचंद्राला अत्यंत आश्चर्य वाटलें. रस्त्यांवरील दुकानांच्या अपूर्व देखाव्याने सुरेशचंद्राला बराच वेळ 'दिङमूढ' असे बनविले. पुढे पुढे त्याला फिरण्याचा इतका नाद लागला की फक्त निजण्याकरितांच तो जहाजावर येत असे. बाकी त्याचा सर्व वेळ शहरांतील निरनिराळी प्रेक्षणीय स्थळे पाहाण्यातच जात असे. थोडे दिवसांनी त्याची बरेच लोकांशी थोडीफार ओळख झाली. तीन आठवडे संपतांच जहाजाची परत फिरण्याची तारीख आली. आता कोठे तरी निवास करण्याला स्थल पाहण्याची आवश्यकता त्याला भासू लागली. परंतु या बाबतीत त्याचा फारसे श्रम पडले नाहीत. त्याच्या तोंडऔळखीच्या एका मनुष्याने त्याला एका घरांत राहण्याची सोय करून दिली. है घर एका मोठ्या गुहेसारखे होतें त्यांत लहान लहान खोल्या पुष्कळ होत्या. हे घर रस्त्यापासून दूर

एका बाजूस असल्यामुळे तेथे अगदी शुक् होते. गांवांतील बदमाश व दारुबाज उडाणटप्पू लोकांचा हा एक अड्डाच होता, दारुपायीं ज्यांच्या घरादारांचे व जन्माचे वाटोळे झाले होते,अशा दुर्व्यसनी तरुणांचे हें निवासस्थान होतें. याच ठिकाणी पुष्कळ व्यभिचारिणी स्त्रियाही असत. या सर्व दुराचारी लोकांचा समुदाय पाहून सुरेशचंद्र अत्यंत भयभीत झाला व दुसरे दिवशीं सकाळींच तेथून दुसरीकडे बिऱ्हाड हलविण्याचा त्यानें मनांत निश्चय केला. त्या दिवशीं रात्री त्याला सुखाने झोप मिळाली नाहीं. मध्यरात्रीचे सुमारास कसल्याशा आवाजानें व चाहुलीनें तो एकदम दचकून जागा झाला. त्याला आपले समोर एक विचित्र आकृती पाहून अत्यंत भीति वाटली. अशा रात्री बेरात्री ही कोण विचित्र व्यक्ती आपणाकडे येत आहे, याचे त्याला आश्चर्य वाटलें. ही व्यक्ति कोण? ती कां येत आहे? - कदाचित् आपल्या जवळचे थोडें फार द्रव्य चोरण्यास तर कोणी येत नसेल ? अशा प्रकारच्या अनेक विचारतरंगांनी त्याचे मनांत काहुर उठविलें. अंधःकार दाट असल्यामुळे ती व्यक्ति कोण आहे हें त्यास कळेना. तथापि कोणी तरी आपले जवळ उभें आहे हे त्याला चांगले जाणवत होतें. शेवटीं सुरेशचंद्रानें आपण जागें आहों हें दर्शविण्याकरितां एक मोठीं जांभई दिली. इतक्यांत ती व्यक्ती दूर जाऊन दिसेनाशी झाली, थोडे वेळानें सुरेशचंद्रही आपले कपडे सावरून गाढ झोपी गेला. प्रातःकाळ होतांच–

तो नोकरीच्या शोधाकरितां बाहेर पडला. परंतु तेथील रीतीभातीशी पूर्ण अनोळखी असल्यामुळे सायंकाळ पावेतों भटकून देखील त्याला कसलीही नोकरी मिळाली नाहीं. शेवटीं पुन्हा पुर्वीच्या स्थळी, तान्हेला व भुकेला असा मुकाट्यानें परतला. चालून चालून अत्यंत थकल्यामुळे श्रमपरिहार करण्याकरितां कांहीं पेय प्यावें असें त्याला वाटलें; व म्हणून तो एका दुकानांत शिरला. काळा मनुष्य दुकानांत पाहातांच गोरे माणसांनीं त्यास गराडा घालून त्याला अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडलें.अनेक लोक मद्यपान करीत बसलेले त्याला दिसले. त्याला पहातांच दोन तरुणानीं त्याला मद्याचा प्याला दिला. तो त्याच्यानं नाकारवेना. एका प्याल्या नंतर दुसरा अशा रीतीनें बाटली खलास झाली. सुरेशचंद्र त्यांच्या पूर्ण आधीन झाला. दारूच्या निशेत सुरेशचंद्र अगदीं पागल बनला. आपण कोणत्या स्थितीत आहोंत, आपल्या हातून कोणते आनाचार होत आहेत, इत्यादींचा विचार करण्यास सुद्धां सुरेशचंद्राची विवेकबुद्धि ठिकाणावर नव्हती. सुमारे २४ तासांनीं तो अर्धवट शुद्धिवर आला. व इकडे तिकडे भ्रमिष्टा सारखा पाहू लागला. इतक्यांत त्याला पुन्हां शराब पाजण्यांत आले. झालं ! पुन्हां तो बेभान स्थितति पडून राहिला!! तो तरुण होता. त्याला जगांतलि छक्केपंजे ठाऊक नव्हते. तो अशिक्षीत होता. त्याला सुधारल्या सुधारल्या लोकांचे (?) कसब पारखें होतें. तो दुष्टांच्या जाळ्यांत सांपडला. पण त्यानें हें जाणून बुजून केलें नाहीं. कायद्याने ठरविलेली वयोमर्यादा देखील त्याने अद्याप उल्लंघिली —

नव्हती. तो अज्ञान होता. त्याजवर कोणाची देखरेख नव्हती. त्याचा कोणीही वाली नव्हता. अशा परिस्थींत कोणाचेही चारित्र्य भ्रष्ट होणें आश्चर्यकारक नाहीं. त्याचे हें आश्चर्यकारक नाहीं. त्याचें हें दुश्चरित्र निंदास्पद होतें, यांत बिलकूल संदेह नाहीं. या दुष्कर्मामध्ये हा सापडल्यानें त्याच्या चरित्राला लागलेली काळीमा चरित्र लेखकाला पुसून टाकतां येणें शक्य नाही. खऱ्या खऱ्या घडलेल्या गोष्टी जशाच्या तशा वाचकांपुढे मांडणे हेंच लेखकाचें कर्तव्य आहे. तसेच दुसऱ्याच्या दुष्कर्मानें घडलेल्या अधःपातापासून वाचकांस चांगला बोध घेतां येईल. परदेशगमन करणाऱ्या किंवा करूं इच्छिणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना यापासून पुष्कळ बोध ग्रहण करतां येईल. परमेश्वर करो व कोणत्याही प्रवासी नवयुवकावर चरित्रभ्रष्ट होण्याची पाळी कधीं न येवो !

आज पुष्कळ तरुणांना शिक्षण, व्यापार, देशपर्यटन या निमित्ताने परदेशांत जावें लागतें. तेथे गेल्यावर त्यांनी विद्यार्जन करतांना निर्व्यसनी राहून व विकार वश न होतां आपला काल व्यतीत करावा. चैनी किंवा विलासी लोकांच्या नादी लागून धनवान व्यापाऱ्यांनी आपल्याकडून नीतीविरुद्ध आचरण होऊं नये याची दक्षता घ्यावी. आपल्या आर्यभूमीची संस्कृती फार श्रेष्ठ प्रतीची आहे. तिचा अभिमान धरून पाश्चात्य देशांतील विचार व आचारभ्रष्ट लोकांना तिचे–

- अनुकरण करण्याचा मार्ग दाखवितां आला तर स्वामी विवेकानंद व त्यांचे गुरु स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या आत्म्यांस परमानंद होईल व हिंदभूचा अत्यंत गौरव होईल.

कलालखान्यांतील दारु पाजणाऱ्या नीच लोकांच्या हातीं सांपडल्यामुळे थोडेच दिवसांत सुरेशचंद्राजवळ होतें नव्हतें तें सारें
नाहींसें झालें. तो कंगाल फकीर बनला. अंगावरील वस्त्राखेरीज त्याजवळ कांहींएक नव्हतें. गांठीस पैसा होता तोंवर गोळा झालेली भुतें आतां त्याला सोडून गेलीं. ज्यांनीं त्याला आपल्या हावभावांनीं भुलविलं त्या जालीम शराब पाजणाऱ्या नटव्या त्याला सोडून गेल्या.
निर्धन व निःसहाय असा सुरेशचंद्र एखाद्या वेड्या पीराप्रमाणें इकडे तिकडे भटकूं लागला. शेवटीं तो पूर्ण शुद्धीवर आला. आपण एकाएकी कोणत्या परिस्थितींत पडलों, आपली काय अवस्था होणार आहे, इत्यादि गोष्टींचा नीट विचार करण्याकरितां एके दिवशीं तो
जवळच्या एका बागेत जाऊन बसला. विचार करितां करितां त्याला एकदम झोप आली व बसलेल्या बांकावरच तो गाढ झोपी गेला. सुमारे अर्धी घटका झोप झाली असेल नसेल, तो एका वर्तमानपत्र विकणाऱ्या मुलानें आपल्या कर्कश आरोळीने त्याला सुखनिर्देतून जागें केलें. निद्राभंग झाल्यामुळें सुरेशचंद्राला अत्यंत क्रोध आला. परंतु त्याच्या क्रोधाला न जुमानतां त्या वर्तमानपत्रविक्यानें त्याला मोठ्या नम्रतेनें नांव, गांव व परदेशांत येण्याचें कारण विचारिलें.
सुरेशचंद्रानें आपली सर्व हकीकत त्याला सांगितली. त्याची हृदयद्रावक कहाणी ऐकून त्याला त्याची फार कींव आली. घरी परत–

गेल्यावर त्याने आपलें धन्याला सुरेशचंद्रालाही आपणाप्रमाणेच वर्तमानपत्रै विकण्याची नोकरी देण्याचा आग्रह केला. सुदैवानं त्या बालकाची करुणा येऊन धन्याने सुरेशचंद्रालाही नोकरी देण्याचे कबूल केले व त्याला नोकर म्हणून ठेऊन घेतलें. परंतु सुरेशचंद्र तेथे फारच थोडे दिवस राहिला. त्याला किरकोळ नोकरी मनापासून आवडेना. त्यानें दुसरीकडे एक नोकरी धरली. परंतु " कुठेंहि गेलें तरी पळसाला पाने तीनच " हलकी नोकरी म्हणून तो तेथेंहि फार दिवस टिकला नाहीं. त्यानें खर्चाकरितां घरीं लिहिले होते; परंतु तिकडून नकारात्मक उत्तर आले. जवळ खर्चण्यास नसल्यामुळे त्याची स्थिती अत्यंत शोचनीय झाली होती. शेवटीं तो जेथे मध्यम स्थितीचे बरेच लोक रहात असत, अशा एका ठिकाणीं गेला. थोडे दिवस तो त्या वस्तीस राहिला. त्याचे एका मित्रानेंच त्याला तेथे ठेवून घेतले होते. त्याजवर गुदरलेली संकटें ऐकून तेथील रहिवाशी त्याजवर फार प्रेम करीत असत. पुढें कांहीं संशयास्पद कारण घडल्यामुळे तो तेथून निघाला व थोडे दिवस लंदन शहरापासून दूर रहावें असे त्याचे मनानें घेतले. यावेळीं त्याजवळ थोडेसे रुपये शिल्लक होते. थोडे दिवस फेरविाल्याचा धंदा करावा असे त्याचे मनानें घेतले व म्हणून एका दुकानांतून कांहीं जिन्नस विकत घेऊन तो जाण्याच्या तयारीस लागला.

२२ भाग्योदय

फेरीवाल्याच्या पेशांत सुरेशचंद्राला बऱ्याच गांवी
हिंडावें लागत असे. या धंद्यांत त्यास दर महिन्यास वाढवा येऊ लागला. म्हणून त्यानें आणखी थोडे महिने हाच धंदा करण्याचे ठरविलें. बहुधा एक किंवा दोन आठवड्यानंतर तो सामान खरेदी करण्यास लंदन शहरीं येत असे. परंतु तेथे आल्यावर तो आपले मित्राचे घरीं फारसा जात नसे. गांवोगांवी त्याचा माल उत्तरोत्तर अधिक खपून लोकही त्याला मान देऊं लागले. याप्रमाणें सुमारे पांच महिन्यांत सुरेशचंद्रानें दीडशें रुपये शिलकेंत टाकिले. या वेळेपासून आपल्या चरित्रनायकाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेल्यामुळे आपण त्यास सुरेशचंद्र याच पण बहुमानास्पद नांवानंच संबोधू

सुरेशचंद्र जरी फेरीवाल्याचा धंदा करीत असत तरी त्यांनीं आपला नियमित व्यायाम करणे व यथामति वाचन हीं कधींहि सोडलीं नाहींत. उलट त्या बाबतींत त्यांची अधिकच प्रगति झाली. याचा परिणाम असा झाला कीं साधारण मनुष्यास लागणारे शिक्षण मिळून, त्यास आपली शरीरसंपत्तीहि कमावितां आली. त्यांस ज्योतिष, गणित व वैद्यक या विषयांवरील पुस्तकें वाचण्याचा फार नाद लागला.

याशिवाय फावल्यावेळीं युरोपांतील भाषांचा अभ्यास करून ते अनेक पुस्तके वाचीत असत. फेरीवाल्याचा धंदा करतांना एकदां केण्ट नामक परगण्याचे मुख्य शहरी ते गेले. तेथे कोणा चांगले

हुशार सर्कसवाले आले आहेत, असे त्यांनीं ऐकले. अनेक प्रकारचे व्यायामाची व कसरतीची माहिती व हौस असल्यामुळे साहजीकच त्यांचे मनांत फेरीवाल्याचा धंदा सोडून सर्कशीत नोकरी धरावी, असें आलें. ते ताबडतोब ज्या ठिकाणीं सर्कसवाले उतरले होते, तिकडे गेले. कंपनीचे मॅनेजर तेथेच होते. त्यांना भेटून नोकरी मिळण्याची विनंती करतांना सुरेशचंद्र म्हणाले, " आपण जर मला आपले कंपनींत कसरत करणारा म्हणून नोकरी दिली, तर कुस्ती, पहारीवरीळ खेळ, कसरत वगैरे अंगमेहनतीची व कौशल्याची कामें मी करूं शकेन. सुरेशचंद्र दिसण्यांत मोठे पहिलवान दिसत नसत. कारण अंगकाठी लहान असून अंगलट बेताचीच होती. परंतु त्यांचे अंगांत रग अतिशय होती. व्यायाम व कसरत यांमध्ये ते लहानपणापासूनच तरबेज होते. कलकत्यास असतांना अनेक वेळां शाळेतर्फे त्यांच्या जिम्नॅस्टिक व कुस्ती खेळण्याचे कामाचे प्रदर्शन होत असे. त्यांच अंगांत शक्ती चांगली होती, परंतु सर्कशीचे मॅनेजरला त्यांची लहानशी अंगकाठी पाहून त्यांचे अंगांत कमी ताकद असावी अशी शंका आली. सुरेशचंद्राच्या ताकदीच्या गोष्टी ऐकून त्यांना हसू आलें; व थोडा वेळ गम्मत करण्याच्या हेतूनें त्यांनीं आपले सर्कशींतील सर्वात मजबूत अशा पहिलवानाला बोलावून घेतले. ब तो आल्यावर सुरेचंद्राला म्हटलें "आपण या जोडीदाराबरोबर कुस्ती खेळाल का ? सांगा पाहूं." सुरेशचंद्रांनी निश्चयपूर्ण दृष्टीनें उत्तर दिलें “हो, साहेब, कुस्ती लावून तर पहा." कुस्ती सुरूं झाली. एका बाजूस तो वज्रदेही पहिलवान व दुसरीकडे सुरेशचंद्राची

किडकिडीत वामन मूर्ती; परंतु थोड्याच वेळांत प्रेक्षकांना असे दिसून आलें कीं, जरी गोऱ्या खेळाडूचे अंगांत अधिक ताकद आहे तरी डावपेचाचे बाबतींत हिंदू पहिलवान त्याहून श्रेष्ठ दर्जाचा आहे. दहा मिनिटांचे आंतच साहेब बहादूर जमिनीवर आले व सुरेशचंद्र विजयी झाले.

कुस्ती संपतांच " हॉरिझॉटलबार व पॅरललबार वरील कांहीं खेळ दाखचूं का ?" असें सुरेशचंद्रानें विचारलें.

मॅनेजर साहेब म्हणाले " कांहीं जरूर नाहीं, मी तुमचे डाव व ताकद पाहून संतुष्ट झालों आहे. तुम्हाला आमचे सर्कशीत नोकरीवर ठेवून घेतले आहे." त्या क्षणापासून सुरेशचंद्र यांना कंपनींत सामील करून घेऊन त्यांचे वेतनही ठरविण्यांत आले. दर आठवड्यास जेवणखाण सोडून सुमारे १५ शिलिंग म्हणजे ७॥ रु. त्यांना मिळू लागले. तथापि इतर खेळाडूंचे वेतनाचे मानानें सुरेशचंद्राचे वेतन फार कमी होते. परंतु त्यांनीं तें मान्य केलें. कारण काम शिकून चांगले खेळ करतां येऊ लागल्यावर आपोआपच पगार वाढेल याची पूर्ण जाणीव होती. अशा प्रकारें एकीकडे सुरेशचंद्र खुप होते व दुसरीकडे थोड्या पगारावर चांगलें काम करणारा लाभला म्हणून कंपनीचे मॅनेजर संतुष्ट झाले होते. आपल्या कंपनीचं जाहीर हस्तपत्रक काढण्यालाही त्यांना चांगली सोय झाली. "काळा हिंदुस्थानी मनुष्य करामतीचे खेळ करून दाखवील." एवढ्या जाहिरातीवर हजारों लोक या सर्कशीचे खेळ पहावयास येऊ लागले. अगदी पहिल्याच प्रसंगी तर वरीलप्रमाणे

जाहीर करतांच शहरांतील स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी खेळ पहावयास येऊन थडकल्या. खेळ सुरू होतांच रंगी बेरंगी पोषाक चढवून सुरेशचंद्र प्रेक्षकांच्या समोर सलामी देण्यास आले. नव्या नटाची प्रेक्षकांचे समोर प्रथम येण्याचे वेळीं कशी तिरपीट उडते, हैं सांगावयास नको. तीच अवस्था आमच्या चरित्रनायकाची झाली. त्यांचे हात पाय लटपटूं लागले. डोळे दिपून चोहोंकडें अंधारमय दिसू लागलें. सर्व इंद्रिये सुन्न होऊन त्यांला एक क्षणभर अगदीं निश्चलता आली. इतक्यांत प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटानें त्यांस सचेतन केलें व खेळास प्रारंभझाला. त्यांचे खेळ चालू असतांना प्रत्येक प्रेक्षणीय उडीला किंवा कुशलतेच्या डावाला टाळ्यांचा गजर होऊ लागला, व प्रेक्षक "वाहवा, वाहवा " अशा अर्थाच्या शब्दांनीं त्यांची प्रशंसा करूं लागले. त्या दिवशीं सुरेशचंद्रांनी आपले खेळ इतक्या विलक्षण सफाईनें व कुशलतेने केले की, स्वतः त्यांना आपल्या पहिल्याच प्रसंगी आलेल्या यशाचे त्यांना आश्चर्य वाटले. अशा रीतीनें वाहवा होऊन खेळ संपल्यावर जेव्हां सुरेशचंद्र सर्कशीचे नेपथ्यगृहांत आले, तेव्हां खुद्द मॅनेजर साहेबांनी मोठ्या प्रसन्न अंतःकरणाने त्यांच्याशीं हस्तांदोलन केले. इतर खेळाडूंनी देखील त्यांच्या ह्या पहिल्याच प्रसंगाचे खेळांतील नैपुण्याचद्दल त्यांची तारीफ केली. त्यानंतर इंग्लंदांतील अनेक शहरांत त्यांचे खेळाचं प्रदर्शन झालें. सर्कशीत खेळ दाखविणें हेंच सुरेशचंद्रा चे त्यावेळीं जीविताचे उद्दिष्ट झाले होतें. दिवसांतील बहुतेक काळ ते आपले व्यवसायासंबंधी माहिती व प्राविण्यं संपादन करण्यात घालवीत असत.

जो जों त्यांचें क्रीडानैपुण्य वाढत गेलें तो तो त्यांची ख्याती दूरवर पसरूं लागली. असे होतां होतां " हिंदुस्थानी सर्कसवाला " या नांवानें ते महशूर झाले.

सर्कशीत शिरल्यावर जेव्हां जेव्हां त्यांना वेळ मिळत असे, तेव्हां तेव्हां नाना प्रकारची पुस्तकें वाचण्याचा नाद असल्यामुळे तो ते वाचण्यांत घालवीत असत. परंतु त्यांचे इतर व्यवसायबंधूंना त्यांचें हें करणें नापसंत असे. त्याच सर्कशीत कांहीं कुमारिका होत्या. त्या सुरेशचंद्रांच्या वाचणे, शिकणे इत्यादि अभ्यासू वृत्तींत व नित्यक्रमांत अडथळा करून त्यांना आपल्या नाचणें खिदळणें यांनीं व हास्यविनोदांनीं अत्यंत भंडावून सोडीत असत. साधारणतः सर्कशींत काम करणारे तरुणाचे किंवा तरुणीचे ध्येय मनमुराद आनंदांत मग्न होणें हेंच असावयाचें; परंतु सुरेशचंद्र दररोज थोडा तरी वेळ काढून व इतरांचा त्रास चुकवून वाचणें, लिहिणें इत्यादि अवश्य करीत असत. त्या कंपनींत अशा प्रकारानें ते आपला कालक्षेप करीत असत. त्या सर्कशीबरोबर ते इंग्लंदांतील बहुतेक शहरांतून फिरले त्यामुळे त्यांचे नवीन नवीन स्नेहसंबंध झाले; परंतु त्यांनीं स्वदेशावरचें प्रेम कधींच सोडलें नाहीं. आपल्या घरच्या मंडळीची त्यांना वारंवार आठवण होत असे. ते नियमानें आपले काकाला पत्रें पाठवून स्वतःचें कुशलवृत्त कळवीत. ते जेथे जेथे जात, जे जे त्यांचे हातून घडे व ज्याप्रकारें ते रहात, तें तें सर्व आपल्या चुलत्याला ते कळवीत असत. आपल्या प्रेमळ मातेकरितां त्यांचे हृदय अत्यंत व्यथित होत असे. आपल्या प्रत्येक पत्रांत ते प्रिय मातेला साष्टांग

नमस्कार लिहीत असत; व पत्राचा मजकूर बराच मातेच्या संबंधी विचारपूस, तिला सांत्वनपर संदेश यांनीं भरलेला असे. कधी कधीं हिंदुस्थानांत परत यावें असे त्यांना वाटत असे. आपल्या प्रेमी नातलगाच्या भेटीची तीव्र उत्कंठा त्यांना कधीं कधीं वाटे व ते पूर्ण मातृभक्त असल्यामुळे मातेच्या स्मरणानें अनेक वेळां त्यांचे हृदय भरून येऊन अत्यंत व्याकुळ होई. वेळोवेळीं पाठविलेल्या पत्रांतून त्यांचे मनोविकार कसे असत हें त्यांच्या महत्त्वाच्या पत्रांचा सारांश पुस्तकाचे शेवटीं परिशिष्टांत दिला आहे त्यावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

सर्कशींत सुरेशचंद्र मोठ्या बडेजावानें राहात असत. त्यांच्या नित्य व्यवहाराला नेहमीं अडथळा करणारी व्यक्ति म्हणजे सुमारे १८ वर्षे वयाची एक जर्मन कुमारी होती. ती तारेवर खेळ करीत असे. ती कुलीन घराण्यांतील असून तिला लिहितां वाचतां येत असे कंपनींत तिच्या ओळखीचीं इतर पुष्कळ माणसें होतीं. परंतु सुरेश चंद्रांशी ती फार सलगीनें वागत असे. ती व सुरेशचंद्र असे दोघेच असतांना ती बहुधा लिहिण्यावाचण्याचे वेळीं त्यांना फार त्रास देत असे; परंतु आपण त्रास दिल्यामुळे खिन्न झालेल्या आपले मित्राला पुनः उत्साहित करून त्यांचे इच्छेनुरुप त्यांस वाचू देत असे. सुरेशचंद्र तिच्या कचाट्यांतून सुटण्याचा पुष्कळ प्रयत्न करीत, पण ते त्यांना अत्यंत कठीण जाई. त्यांचें वाचन चालू असतांना जर कधी ती तेथे आली तर सुरेशचंद्रांची वृत्ति चलबिचल होत असे, व भाषणाचा प्रकारही असा असे कीं त्या परस्परांमध्ये प्रेमाचे वास्तव्य पूर्ण निष्कपटपणाचे

आहे असे दिसे. त्या सर्कशीत ते दोघेही मोठ्या आनंदानें राहात असत. कंपनींतील दुसऱ्या कोणाही व्यक्तीला यांच्याठायीं परस्परांविषयी असलेला प्रेमाचा मागमूस नसल्यामुळे त्यांचा कोणी हेवा करीत नसे.
एकदां असें झालें की सुरेशचंद्रांनीं बाजारांतून कांहीं वस्तु खरेदी करून आणिल्या. त्या वस्तू जर्मन भाषेत छापलेल्या एका वृत्तपत्रांत गुंडाळलेल्या होत्या. ते आपले खोलीत आले तेव्हां ती जर्मन तरुणी तेथे एकटीच होती. तिनें त्या वस्तू मोठ्या उत्सुकतेनें सोडून दूर व्यवस्थित ठेवल्या. हे करतांना तिची दृष्टि त्या वर्तमान पत्रांतील एका विवक्षीत रकान्याकडे गेली. तें वृत्तपत्र तिच्या मातृभाषेत असल्यामुळे जाहिरातीच्या रकान्याकडे तिचें चित्त वेधलें गेलें
वाचतां वाचतां " घर सोडून दूर भटकत असलेल्या कुमारिकेस " या मथळ्याखालीं " तुझा बाप अत्यवस्थ असून तुझी डोळेभेट व्हावी अशी त्याची फार इच्छा आहे " अशा अर्थाचा मजकूर तिच्या वाचण्यांत आला. त्या जाहिरातीचे खालील नामनिर्देश वाचून तिच्या हातांतले वृत्तपत्र खालीं पडलें व तिच्या नेत्रांतून अश्रुधारा
चाहूं लागल्या. सुरेशचंद्र त्या वेळीं दुसरे कामांत गढले होते. त्यांनी तिजकडे नजर टाकतांच तिला रडतांना पाहिलें. चटकन् जवळ येऊन व तिचे दोन्ही हात प्रेमानें आपले हातांत धरून मोठ्या शांत व गंभीर स्वरांत त्यांनी तिला रडण्याचें कारण विचारलें. एकादे तरुणीस आपल्या उराशीं धरून सांत्वन करून प्रेमानें बोलण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग. त्या तरुणीलाही दुःखाचा उमाळा आला व तिनें आपले दोन्ही हात —

सुरेशचंद्राचे गळ्याभोंवती टाकूत रूदन करण्यास सुरुवात केली. तिच्या रडण्याचे कारण न समजल्यामुळे सुरेशचंद्राला अगदी भांबावल्यासारखे झालें, इतक्यांत तिने पुढें पडलेल्या वर्तमानपत्रांतील जाहिरातीकडे बोट करून कांही दाखविले. पुनः तिचे डोळे पाण्यने भरून आले. सुरेशचंद्रांना फ्रेंच व जर्मन भाषा येत होत्या. तिने दाखविलेला मजकूर वाचतांच तिच्या रडण्याचे कारण त्यांच्या तेव्हांच लक्षांत आले. तथापि सुरेशचंद्रांनी "मग अशी रडतेस कां?" असा सरळ प्रश्न केला. यावर तिने " अद्याप मी कोण व का रडते, हें आपल्या ध्यानी आहे नाहीं वाटतें ?" असे हळूच उत्तर दिलें; व रडे आवरून गप्प बसली. ती जर्मन कुमारिका एका श्रीमान् व कुलीन घराण्यांतील होती. चवदा वर्षे वयाची असतांना घर सोडून ती बाहेर पडली, तशी बाहेरच भटकत होती. जाहिरातीतील मजकुरावरून बाप मृत्युशय्येवर मुलीच्या भेटीची आशा बाळगीत दूध घोटीत होता. दुसरेच दिवशी त्या जर्मन कुमारिकेने सर्कशीचे मॅनेजरपासून रजा मागून घेतली व ती सुरेशचंद्राबरोबर लंडनला जाण्यास निघाली. तेथून एका डच जहाजांत बसून ती स्वदेशाकडे जाण्यास निघाली. जहाज निघतेवेळी शेवटी तिने आपले हृदय सुरेशचंद्राजवळ उघडें केलें, "जिवांत जीव असेपर्यंत मी आपणांस विसरणार नाहीं" व आपणही मला असे म्हणतांना तिचा कंठ दाटून आला व तिच्यानें पुढें बोलवेना. हें पाहून सुरेशचंद्रांना गहिवर आला व त्यांचे नेत्रांत अशरु उभे राहिले. उत्तर देतांना ते म्हणाले, " तुझ्यांत व माइयांत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. तू—

थोरामोठ्याची कन्या आहेस. मी यःकश्चित हिंदी तरुण मनुष्य आहे तूं मला पूर्ण विसरण्याचा प्रयत्न करावा हें चांगलें. मीहि माझ्या मनोवृत्ति शक्य तितक्या आवरण्याचा प्रयत्न करीन. देव तुझे कल्याण करो व तूं सुखी राहोस."

सुरेशचंद्र एक उत्तम नट होते तसेंच चांगले कसरत करणारे होते; एवढेच नव्हे तर, ते जंगली जनावरें पाळून त्यांना नानाप्रकारचे खेळ शिकविण्यांतही पटाईत झाले होते. आफ्रिका खंडांतील मोठमोठे भयंकर सिंह, तसेच शिकारी कुत्रे यांना आपल्या कह्यांत ठेवून ते खेळ करण्यास लावीत. ते सिंहाच्या पिंजऱ्यांत घुसून त्याच्याशीं खेळ खेळत असत. ह्या कलेत सुद्धां प्राविण्य संपादून ते लवकरच प्रसिद्धीस आले. सर्कशीवरोचर इंग्लंदांतील कित्येक शहरीं फिरत असतांना, सुदैवानें एके दिवशीं प्रोफेसर जामरक साहेबांची व त्यांची मुलाखत झाली. जंगली जनावरे पाळण्याचे कलेत त्या प्रोफेसरांचे दर्जाचा त्यावेळीं दुसरा कोणीच नव्हता. हिंस्रपशूंच्या स्वभावाचें ज्ञान करून घेण्याकरितां त्यांनीं अनेक देशांतील अरण्यांत व जंगलांत निवास केलेला होता. ते हिंदुस्थानांत मुद्दाम वाघ, हत्ती व अस्वले यांच्या स्वभावधर्माचा अभ्यास करण्याकरितां येऊन राहिले होते. त्याकाळीं वन्यपशूना मानसाळून अंकित करण्यांत त्यांचे तोडीचा दुसरा कोणीही नव्हता. सुरेशचंद्राचें अपूर्व धाडस, तीक्ष्ण-बुद्धि, व मनोधैर्य पाहून प्रोफेसरसाहेबांनीं त्यांना आपले जवळ नोकरीस राहण्याची इच्छा प्रकट केली. सुरेशचंद्र लाही तेंच हवें होतें. प्रो. जामरक साहेबांचे म्हणण्याला त्यांनीं मोठ्या आनंदानें रुकार दिला.विपत्तीत–

इतका काळ कंठल्यावर त्यांना येथून पुढें चांगले दिवस आले. ताबडतोब सर्कशीतील नोकरी सोडून ते त्यांचे पशुशाळेत नोकरीवर रुजू झाले. सुमारे दोन वर्षे त्यांनी त्या ठिकाणीं चांगल्या प्रकारें नोकरी केली. पुढें पुनः एका सर्कशींत राहून त्यांनीं सिंह, वाघ, कुत्रे इत्यादि हिंस्र पशुंचे खेळ करून दाखविण्याचे कार्य शिरावर घेतलें. या सर्कशीबरोबर त्यांनी सर्व यूरोपखंडभर प्रवास केला. इसवी सन १८८२ मध्ये त्यांनीं लंदन येथील "रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटी " मध्ये टोलेजंग प्रदर्शन भरलें होतें तेव्हां त्यांनीं आपले खेळ करून दाखविले त्यांना या प्रसंगी पुष्कळ पदकें व प्रशंसापत्रे मिळालीं. अशा रीतीनें वयाच्या केवळ एकविसावे वर्षी त्यांनीं परदेशांत या कलेंत जगद्व्यापी कीर्ती संपादन केली. हिंदुस्तानांत कीर्ति संपादनाला अशा प्रकारची संधी त्यांना मिळाली असती कां याचा वाचकांनीच विचार करावा.

एकदां सर्कशीबरोबर प्रवास करतां करतां ते हॅमबर्ग शहरी येऊन दाखल झाले. या ठिकाणीं गॉजेनबेग नांवाच्या धनाढ्य गृहस्थाची फार मोठी पशुशाळा आहे. हे गृहस्थ देखील जंगली प्राण्यांना शिकवून कह्यांत ठेवण्यांत अत्यंत प्रवीण होते. सुरेशचंद्रांनीं शिकविलेल्या वन्य पशुंचे खेळ पाहून हे फार खुष झाले, व त्यांना अधिक पगार देऊन आपले पशुशाळेत नेमून घेतले. त्या पशुशाळेत सुरेशचंद्र सिंह, वाघ, अस्वल, आदिकरून हिंस्र पशूना तऱ्हेतऱ्हेचे खेळ शिकवीत असत. तेथील मोठाले क्रूर सिंह त्यांचे हात चाटीत व सुरेशचंद्र आपली मान त्यांचे जबड्यांत देत असत.

एका वाघाच्या बच्चाला त्यांनी इतका वश केला होता की, ते। कुत्र्याप्रमाणें त्यांच्या मागोमाग रस्त्यानें मुकाट्यानें चालत असे. त्याचें नांव त्यांनीं फेन असें ठेवलें होतें. त्याचप्रमाणें एका हत्तीलाही त्यांनीं फार गोष्टी शिकविल्या होत्या. सुरेशशंद्रांनीं खाऊं घातले तरच तो खात असे. जोग कार्ल नांवाच्या पशुंचा व्यापार करणाऱ्या गृहस्थानें तो हत्ती मोठी किंमत देऊन विकत घेतला. या हत्तीला सुरेशचंद्राचा इतका लळा लागला होता की, मि. कार्ल यांचे घरी गेल्यावर तीन दिवस त्यानें कांहीं खाल्ले नाहीं. एवढ्याकरितां मि. कार्ल यांनीं नाइलाजास्तव सुरेशचंद्राला आपले पदरीं नोकरीस ठेवून घेतलें. या नोकरींत सुरेशचंद्र यांना मोठा लाभ व कीर्ति प्राप्त झाली. त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारली व युरोपांत चोहोंकडे मानमान्यता झाली. अशा रीतीनें सुरेशचंद्र परदेशांत एक धनवान प्रख्यात व सन्मान्य गृहस्थ झाले.

२३ प्रेमकहाणी

ज्याच्या चरित्रांत प्रेमविषयक गोष्टी आल्या नाहींत असा मनुष्य संसारांत विरळा. कोणी असलेच तर ते, लहानपणापासून योगाभ्यास करून आपले आयुष्य परमार्थचिंतनांत घालविलेले,ऋषी व तपस्वी होत.इंद्रियांचे दमन–

करण्यांत खरें पौरुष आहे; पण साधारण प्रतीचे माणसांना जितेंद्रिय होणें अत्यंत कठीण असतें. तथापि कामिनीच्या कमनीय स्वरूपाला न भुलणारे पुरुषही या संसारांत थोडे तरी सांपडतील. नाहीं असें नाहीं.

सर्कशीतील ज्या जर्मन तरुणीचें सुरेशचंद्रावर फार प्रेम जडलें होते, त्या युवतीच्या प्रेमाचा मोबदला देण्याइतके तेही तिच्या मोहक स्वरूपाला व प्रेमळ व शुद्ध अंतःकरणाला पाहून तिजवर मोहित झाले होते. परंतु तिजसारख्या श्रीमंताचे कन्येबरोबर आपला विवाह होणें कठीण आहे, ही गोष्ट ते जाणून होते. व म्हणूनच त्यांनीं आत्मसंयमन करून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. स्वदेशीं गेल्यावर सुद्धां ती तरुणी सुरेशचंद्रांना प्रेमानें पत्र पाठवित असे; परंतु त्यांनीं तिच्या पत्रांना उत्तरें न देणेंच चांगलें, असे ठरविलें होतें.

जेव्हां सुरेशचंद्र सर्कशीबरोबर प्रवास करीत करीत जर्मनीतील एका शहरीं आले, तेव्हां रस्त्यानें फिरतां फिरतां एके दिवशी त्या जर्मन युवतीची व त्यांची अकस्मात् एका दुकानीं भेट झाली. बरींच वर्षे परस्परांनीं परस्परांना पाहिले नसल्यामुळे दोघेंही बुचकळ्यांत पडली. थोडा वेळ दोघेंही निस्तब्ध राहिली व नंतर ओळख पटतांच हातांत हात घालून दोघेही दुकानाबाहेर पडली व जवळचे बागेंत एका बाजूस बाकावर बसून दोघांनींही बराच वेळ गोष्टी केल्या. जातांना परस्परांनी मोठ्या प्रेमानें एकमेकांस भेटून दोघेंही घरोघर गेलीं. यानंतर कित्येक दिवस त्यांच्या भेटी होत असत. ही युवती एका धनाढ्य जर्मन–

गृहस्थाची कन्या होती. आईबाप वारल्यामुळे सर्व संपत्तीची ती मालकीण झाली होती. तिला वरण्याकरितां मोठ-मोठे सधन तरुण आपापली पराकाष्ठा करीत होते. अशा परिस्थितीत एका अज्ञान व ज्याचे कुलशील अपरिचित आहे, अशा काळ्या हिंदु मनुष्याबरोबर तिचा विवाह होऊं देणें, तिच्या आप्तेष्टांस गैर वाटलें. त्यांच्या त्या दृढ परिचयाचे विवाहांत रूपांतर होऊं नये म्हणून त्यांनी तिच्या मनोवृत्ति फिरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. एकदा तर त्यांनी सुरेशचंद्रानाही संकटांत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानंतर लवकरच सुरेशचंद्र याचे मनांत अतलांतिक महासागर ओलांडून अमेरिकेत जावें असे आलें. सुदैवानें त्याच वेळेस "वुम्बैल्स रॉयल मॅनेजरी' नांवाची मोठी प्रख्यात सर्कसकंपनी अमेरिकेस जाणार होती. सुरेशचंद्र यानीं या सर्कशीबरोबर प्रयाण केलें.

२४ ब्राझील देशांत

इसवी सन १८८५ मध्ये सुरेशचंद्र,नीं वुम्बैल्स साहेबाचे प्रख्यात सर्कशीत हिंस्त्र पशुंचे खेळ करून दाखविण्याची कामगिरीं पत्करली.
अमेरीकेस पोचल्यावर त्यांनी निरनिराळे शहरी आपले खेळ करून दाखविले. अमेरिकेतील बहुतेक प्रसिद्ध शहरीं त्यांनी खेळाचे प्रदर्शन

- केल्यावर त्यांची अमेरीकेत सर्वत्र फार प्रशंसा झाली. मोठमोठ्या वर्तमान-पत्रांतून त्यांचे फोटो येऊन त्यांची कीर्ति दूरवर पसरली. संयुक्त संस्थानांतून ते मेक्सिकोचे राज्यांत आले. व तेथून दक्षिण अमेरिकेतील विस्तृत अशा ब्राझिलचे साम्राज्यांत आले. दक्षिण अमेरिकेतील सगळा मध्य प्रदेश या साम्राज्याचे अंतर्गत आहे. या ठिकाणी अगदीं प्रथम स्पॅनिश व पोर्तुगीज लोकांनीं येऊन वसाहत केली. त्यांनी तेथील मूळचे रहिवाशी लोकांचे मुलींशीं विवाह केले. त्यापासून झालेली वर्णसंकर जात क्रियोल या नांवाने प्रसिद्ध आहे. आज मितीला ब्राझिल देशाचे रहिवाशांत क्रियोल लोकांचीच संख्या सर्वांहून अधिक आहे. याशिवाय पुर्तवाल व काफीर लोक यांचे मिश्रणानें झालेली दुसरी जात आहे. तिला मुलाटो असे नांव आहे. 'ब्राझिलची राजधानी रायो-डि-जैनिरो' हें शहर आहे. हें अटलांटिक महासागर चे किनाऱ्यावरील एक मोठें बंदर आहे. त्याची लोकसंख्या साडेतीन लाखांहून अधिक नाहीं. या नगरांत येऊन सुरेशचंद्रानीं आपले खेळ करून दाखविले. त्यावेळीं सुरेशचंद्र सर्कशीत काम करीत होते, एवढेच नव्हे, तर विविध विषयांवर उत्तम व्याख्यानेही देत असत, असे तेथील लॉ ऋनिको' नांवाचे वर्तमानपत्रावरून समजतें, ते इंग्रजींतच, व्याख्यानें देत असत, इतकेंच नाहीं, तर ब्राझिलची राजभाषा जी पोर्तुगीज, त्या भाषेतही व्याख्यानें देत असत. त्यावेळी त्यांना इंग्रजी,--

-जर्मन स्पॅनिश, फ्रेंच, पोर्तुगीज, इटालियन, डॅनिश व डच अशा आठ परकीय भाषा बोलतां येत असत. वाचकांना ही गोष्ट कदाचित् फार आश्चर्यकारक वाटेल. परंतु निरंतर अभ्यासानें पुष्कळ गोष्टी साध्य करतां येतात. दीर्घोद्योग हा सर्व यशाचे मुळाशीं आहे. जेथे इच्छा आहे तेथें मार्ग असतोच. शिक्षण संपादनास वयोमर्यादा नसते. सुरेशचंद्राचे पूर्व वयांतील शिक्षणविषयक प्रगति व ह्या वयांतलि प्रगतींत महदंतर दिसून येतें.

इ० स० १८८५ मध्ये सुरेशचंद्र ब्राझिलचे राजधानींत गेले. तेथील सृष्टिशोभा पाहून ते फार मोहीत झाले. त्यामुळे तेथेच कायमचे निवासस्थान करावें असें त्यांनी ठरविलें त्यांची ही इच्छा सफल होण्यास त्याचवेळीं कर्मधर्मसंयोगानें एक कारण घडून आलें. ब्राझिल देशांतील सरकारी पशुशाळेकरितां एक देखरेख करणाराची आवश्यकता होती. या जागेकरितां सुरेशचंद्रांनीं एक अर्ज वरिष्ठ अधिकाऱ्याकडे केला. तो अर्ज मंजूर होऊन सुरेशचंद्र यांची त्या जागेवर नेमणूक झाली. अशा रीतीनें सुरेशचंद्र सर्कशीतील साधारण खेळाडूची नोकरी धरून आपल्या कर्तृत्वानें ब्राझिल देशांतील पशुशाळेचे मुख्याधिकारी (सुपरिंटेन्डेंट) झाले.

हे पूर्वीच सांगण्यांत आलें आहे की, सुरेशचंद्राचें काम नेहमीं हिंस्त्रपशूविषयक असे, तरी वेळांत वेळ काढून ते कांहींना कांही वाचन व परीक्षण–

-करीत असत. लिहिण्यावाचण्यांत त्यांना अलीकडे फार आनंद वाटत असे. रोग चिकित्सा शास्त्रही ते शिकले होते व गणितासारख्या कठीण विषयांतही त्यांची थोडी प्रगति झाली होती. तत्त्वज्ञान, त्याचप्रमाणे गुप्तविद्या (तारण मारण उच्चाटन दि) जाणण्याची त्यांना फार आवड असे. याशिराय कांहीं प्राचीन भाषांचेही अनुशीलन त्यांनी चालविलें होतें.

एकदां अकस्मात् एका स्थानिक डॉक्टराचे कन्येची व सुरेशचंद्र यांची गाठ पडली प्रथम दर्शनाचे प्रसंगीच त्यांचे हृदयांत त्या तरुणी विषयी प्रेमसंचार आला. परंतु त्या कुमारिकेचे मन सुरेशचंद्र यांजविषयीं इतके उच्छृंखल झालें नव्हतें. थोड्या दिवसांत दोघांच ही दाट परिचय झाला. दोघांच्या भेटी रस्त्यांत, बाजारांत, फिरावयास जातांना गाडीमध्ये अथवा मित्रांचे घरी होत असत. दिवसेदिवस सुरेशचंद्र यांचे चित्त त्या तरुण युवतकडे अधिकाधिक ओढा घेऊ लागले. तथापि ती तरुणी सुरेशचंद्रावरचे आपलें प्रेम कधींच उघड दाखवीत नसे. साधारपणे स्त्रियांना शौर्य व पराक्रम प्रधान अशी अनुपम चरित्राची फार आवड असते; व म्हणून प्राचीन-काळ पासून वीरपुरुषांवर मोहीत होऊन त्यांनाच माळ घातलेल्या युवतींच्या पुष्कळ गोष्टी आपण ऐकतो. सर्व राष्ट्रांचे इतिहासांत अशाच प्रकारची उदाहरणे दृष्टीस पडतात. फार दूर कशाला. आपले चरित्रनायकांचेंच उदाहरण घ्या स्वजातीय अनेक सधन व सन्माननीय —

- जहागीरदार किंवा सरदार लोकांच्या मागणीचा अव्हेर करून गौर कुमारिकेने भरतखंडांतील एका काळे मनुष्यावर मोहीत होऊन त्याजबरोबर विवाह करण्याचें मनांत योजावें हैं नवल नाहीं कां?

तिनें प्रेम दाखविलें नाहीं, तरी ती प्रणायनी त्याचे धाडस, शौर्य इत्यादि गुणांनी परिप्लुत हृदयंगम चरित्र पहून व ऐकून हळूहळू त्यावर प्रेम करूं लागली. सुरेशचंद्र यांचें निस्पृह वर्तन, साधारण प्रतीची राहणी, शिरावर घेतलेल्या कार्यात प्राण कस्पटाप्रमाणें जोखणें, सिंह, वाघ वगैरे जंगली पशुंबरोबर निर्भयपणे खेळणें, इत्यादि साहस प्रधान गोष्टी वारंवार पाहून तिचे त्यावर प्रेम जडलें. प्रेमाज्जूनें परस्परांचे हित निगडीत झाल्यामुळे सुरेशचंद्रानीं मागणी केलेल्या प्रतिविवाहाची विनंती तिला अमान्य करवेना. कालातरानें त्या वैद्यकन्यनें आपली गंभीरवृत्ति टाकून मोकळ्या मनानें सुरेशचंद्रांशीं वर्तनक्रम सुरू केला; व लवकरच परस्परांचं प्रेम अत्यंत दृढ झालें.

या तरुण वैद्यकन्येशी झालेला स्नेहसंबंध सुरेशचंद्र यांचे चारित्र्याला कसा परिपोषक झाला व त्यामुळे त्यांची कीर्ति होऊन ते कसें उच्च पदाला चढले हें पुढील प्रकरणांवरून वाचकांस कळेल.

२५ सैन्यांतील शिपाई

एके दिवशीं त्या वैद्यकन्येशीं गोष्टी करीत
असतांना सुरेशचंद्र अगदीं तन्मय झाले होतें. ती वैद्यकन्याही मन मोकळे करून त्यांशीं बोलत बसली होती. निरनिराळ्या विषयांवर गोष्टी होतां होतां परस्परांचे पोशाखासंबंधी आवडी-निवडीचा प्रश्न निघाला. बोलतां बोलतां "आपण जर सैनिकाचा पोशाख केला तर तो आपणास शोभेल असे मला वाटते, " असें ती तरुणी भावपूर्ण दृष्टीनें त्याजकडे पाहून उद्गारली. ह्या तिच्या म्हणण्याचा आशय सुरेशचंद्र यांचे हृदयावर पूर्णपणें उमटला. त्यांनीं आपल्या प्रणयिनीला खुष करून तिचे प्रेम संपादण्याकरितां लष्करांत नोकरी करण्याचा त्यांच क्षणीं संकल्प केला. संकल्पाप्रमाणें फौजेंत नोकरी धरण्यास ते प्रवृत्त झाले. नोकरी धरल्यावर त्यांना असे कळले कीं, आतां तीन वर्षे लष्करी नोकरी सोडतां येत नांहीं. या लष्करी दंडकामुळे त्यांना देशपर्यटन करणे अशक्य झाले. इ. स. १८८७ च्या प्रारंभास ब्राझिल साम्राज्यांत ते लष्करी शिपाई झाले. त्या वेळीं त्या देशांत प्रजासत्ताक राज्य स्थापीत झाले नव्हतें. सुरशचंद्र आपल्या इतर सर्व साथीदारांपेक्षां अधिक शिकलेले होते; त्यामुळे सर्व शिपाई त्यांचा सन्मान ठेवीत असत. त्यांनीं कोणत्याही विश्वविद्यालयाची पदवी मिळविली नव्हती. तरा ती मागें लावणारे कोणत्याही तरुण

पदवीधरापेक्षां ते अधिक सुशिक्षित होते. नानाप्रकारचे कष्ट सहन करून व दूरदूरचे देशांत प्रवास करून त्यांना जें अनुभवजन्य ज्ञान मिळालें होतें, त्यानें त्यांचें मन सुसंस्कृत झालें होतें. इतकें होतें तरी लष्करांत त्यांची बढती बरेच दिवस झाली नाहीं. कित्येक वर्षेपर्यन्त एक साधारण घोडेस्वार म्हणून त्यांना नोकरी करावी लागली. नोकरींत असतांना आपल्या घोड्याची सर्व व्यवस्था ते स्वतःच पहात असत व आपलें हत्यारपात्यार स्वतःच परजीत असत.

इ. स. १८८७ मध्धे ते सॅण्टाकृझ नामक गांवांत कार्पोरल (जमादार) होते. येथे ब्राझिल देशांतील लष्करी घोड्यांना चराईकरितां एक मोठें कुरण होतें. या घोड्यांवर देखरेख करण्याचे काम सुरेशचंद्र यांजकडें होतें. या कामाखेरीज दुसरें श्रमाचें काम नसल्यामुळे त्यांनीं बसल्या बसल्या अनेक विषयांचा अभ्यास करण्याचा परिपाठ ठेवला होता. कांहीं दिवसानीं त्यांची समर-रुग्णालयावर [War-hospital] वर नेमणूक झाली. येथे राहून त्यांनी शस्त्रक्रिया करण्याची कला चांगली अवंगत करून घेतली. ते मोठ्या धिम्मेपणानें व न डगमतां चिरफाड करण्याचें काम करीत असत. वैद्यकीकडे त्यांच्या मनाचा कल प्रथमपासूनच असे; येथे काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांची ही प्रवृत्ति द्विगुणित झाली. यासमयीं त्यांनीं जीं पत्रे आपले काकास व मित्रांस पाठविली होतीं त्यांवरून ही गोष्ट चांगली प्रत्ययास येते.[परिशिष्ट पत्र नं २]-

-वैद्यकीसंबंधी त्यांची ही आवड पाहून त्यांच्या भावी पत्नीलाही अत्यंत आनंद होत असं. कारण ती तरी एका वैद्याचीच कन्या होती. लष्करी शिपाईगिरीची त्यांची तीन वर्षांची मुदत सन १८८९ त पुरी व्हावयाची होती. यावेळीं त्यांचे लहरी स्वभावाला वाटले असतें तर त्यांनीं ती नोकरी तेव्हांच सोडली असती. परंतु युद्ध व तद्विषयक गोष्टीकडे त्यांचा स्वभावतःच ओढा असल्यामुळे त्यांनीं ती सोडली नाहीं. जर कदाचित् त्यांनीं ती सोडलीच असती, तर लवकरच थोरपदास चढल्यामुळे झालेली त्यांची जगद्व्यापी कीर्ति त्यांना कशी प्राप्त झाली असती ? यावरून ही परनेश्वराची इच्छा होती की, ज्या बंगाल प्रांताला लॉर्ड मेकाले साहेचानें 'मेषपात्र, भागूबाईचे राष्ट्र (बायकीराष्ट्र) असे तुच्छतेनें उल्लेखिलें होतें, त्याच प्रांतांतील एका मध्यम कुलांतील पुरुषने-भारतमातेच्या एका संतानानें-ब्राझिल देशांतील लष्करामध्ये उच्चपद संपादन करावें. व मेकालेचें विधान असत्य व बाष्कळ ठरावे. भगवदिच्छा बलीयसी !

सुरेशचंद्र ह्या इस्पितळांत काम करीत असतांना अमेरिकेत एकाएकी पीतज्वराची सांथ उद्भवली. याशिवाय तेथे एक भयंकर चळवळ सुरू झाली होती. एके बाजूस पीतज्वरानें पीडलेल्या लोकांचे आर्तस्वर ऐकू येत होते, तो दुसरीकडे घायाळ झालेल्या लोकांच्या किंकाळ्या कानांवर आदळत होत्या. इस्पितळाचा देखावा दिवसेंदिवस अत्यंत-

- भयाण दिसू लागला. जे लोक तेथे नोकर होते त्यांची अवस्था अत्यंत हवालदील अशी झाली. करारी सुरेशचंद्र या स्थितीत राहून कधींसुद्धां कर्तव्यपराङ्गमुख झाले नाहींत. ते मोठ्या धिटाईनें व निःशंक मनानें आपले कर्तव्य चोख रीतीनें करीत असत.

हळुहळू वीर सुरेशचंद्र यांना कार्पोरलचे हुद्यानंतर सार्जंटचा हुद्दा मिळाला. इ. सन १८९३ पर्यंत ते याच हुद्यावर राहिले. तेव्हां त्यांनी आपले काकांना एकदां असे पत्र लिहिलें होतें कीं, "माझे हुद्याप्रमाणेच हुद्यावरच असलेल्या इतर काम-गोरेलोकांपेक्षां मजवर अधिक मोठें व महत्त्वाचे काम सोपविलें जात असतें. परंतु मी हिंदुस्थानी काळा मनुष्य म्हणून माझी बढती होण्यास मला फार त्रास होत आहे." सुरेशचंद्रांनी अनेक वीरोचित कार्य तडीस नेऊन राज्याची यथाशक्ती सेवा केली होती. व सर्व साहसकर्मांमध्ये यश संपादन करून त्यांच्या बरोबरीचे अधिकारी लोकांत प्रशंसा झाली होती तरी जवळ जवळ चार वर्षे त्यांना सार्जण्टचे हुद्यावर रहावे लागले. त्यावेळीं देशांत चोहोंकडे बंडाचा वणवा भडकला असल्यामुळे सुरेशचंद्र यांना अनेक लहान मोठ्या लढयांत शत्रूला तोंड द्यावं लागत असे. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांची कार्यनिष्ठा व यश संपादन करण्याची शैली पाहून बरेच वेळां त्यांना बढती देण्याची शिफारस केली. परंतु सुरेशचंद्र यांना त्यांच्या इच्छेनुरूप बढती मिळण्यास बरींच वर्षे लागली. प्रत्येक युद्धांत त्यांचे निःसीम साहस पाहून सर्व –

अधिकारी चकित होऊन तोंडांत बोटें घालीत असत. या हुद्यावर असतांना सुरेशचंद्र यांचे हाताखालीं फारच थोडे सैन्य असे. त्यांच्या हाताखालचे सैन्यांतील शिपाई त्यांना फार भीत असत; व त्यांच्या समक्ष उत्तर देण्याची कोणाची छाती नसे. वाचकहो, ब्राझिलसारखे दूरचे देशांत बालपणी उनाड व लहरी असलेल्या काळ्या मनुष्याचा एवढा दरारा बसेल व सन्मान होईल, असे त्यांचे लहानपणीं कोणी सांगितलें तरी असतें कां ?

२६ लेफ्टेनंट सुरेशचंद्र

इसवी सन १८९३ मध्यें वीर सुरेशचंद्र यांना प्रथमच लेफ्टनंट कर्नल हा हुद्दा मिळाला. पलटणीतील दुसऱ्या दर्जाचे अधिकाराचे पद हेंच होय. या हुद्यावर येतांच एका मोठ्या सैन्यदळाचे ते अधिकारी झाले. हें पद त्यांना सहज प्राप्त झाले नाहीं. या बाबतींत त्यांनी आपले काकांना स्वतः लिहिलेल्या पत्रांतील कांहीं भाग खाली दिला आहे.

" काकासाहेब, ज्या हुद्यावर मी आज आहे तो मला सहज व अनायास मिळाला असे समजू नका. या देशांतील फौजेवर मी एवढा मोठा –

–अधिकारी होईन, ही कल्पना माझे मनांत कधीहि आली नाहीं. माझ्या बढतीची वरील हुद्यावर नेमणुकीची गप्प वातावरणांत नेहमी डठत असे. परंतु मी केवळ काळा हिंदी मनुष्य असल्यामुळे वरिष्ठ अधिकारी बढतीचे यादीत माझे नांवावर काट मारीत असत काळा व गोरा यांमध्ये एवढा तीव्र मतभेद येथे पाळला जातो. परंतु जेव्हां देशांत सर्वत्र बंडाचा वणवा पेटला, तेव्हां मी व मजबरोबर काम करणारे एक एत्तदेशीय समान दर्जाचे अधिकारी, असे दोघे एका जनरलाचे हाताखाली काम करति होतो. अधिकारी माझे मुळींच परिचयाचे नव्हते; परंतु प्रत्यक्ष युद्धक्षेत्रांत माझी काम करण्याची शैली व तडफ त्यांचे नजरेस आली, व शत्रूकडील गोळ्यांच्या वर्षावामध्ये उडी घालण्याची मी जी घडाडी दाखविली ती त्यांनी समक्ष पाहीली व म्हणून मी विदेशी आहे किंवा काळा आहे, याचा बिलकुल विचार न करितां, माझे युद्धकौशल्याची शिफारस करून व मी युद्धांत यथायोग्य सहाय्य केले असे ठरवून, प्रजातंत्राने राज्यव्यवस्था पाहाणारे प्रेसिडन्टाकडे त्यांनी मजविषयीं योग्य रिपोर्ट केला. या त्यांच्या निःपक्षपाती शिफारसीनें मी लेफ्टेनंट कर्नलच्या पदास चढलो. या युद्धामध्ये मी कोणत्या प्रकारें मदत दिली है आपण जाणतच आहांत." त्यानंतर लेफ्टेनंट कर्नल झाल्यावर त्यांनी आपल्या चुलत्यास एक पत्र लिहिलें. यांतील मुद्याचा भाग येथे दिला आहे. " सोबत निथेरायचे युद्धांत सविस्तर –

-वर्णनाचा मसूदा आपणास वाचावयास पाठविला आहे. रणांगणावर माझे साथीदार मला फार भीत असत.तथापि मी त्यांच्यांशीं नीट व सरळ वर्तन करीत असे. मला आपण युद्धाचे पूर्ण वर्णन लिहा असें लिहिले.परंतु युद्धासारख्या भयंकर गोष्टीची सविस्तर हकीकत कशी लिहीतां येईल ? युद्धांतील भयंकर प्रसंगाचे वर्णन करणें हेंच भयंकर आहे. युद्धामध्ये जगांत अत्यंत मौल्यवान वस्तु जो प्राण तोच अत्यंत स्वस्त व बिनमोल तऱ्हेनें विकला जातो.जो मनुष्य युद्धांत आपला जीव कस्पटासमान समजतो, तोच सर्वाहून आपल्या जीवाचे रक्षण अधिक करतो.जगांत साहस म्हणजे काय चीज आहे हें आपण पूर्ण जाणत नसाल. ती युद्धांत चांगली कसास लागते. आपली इच्छित वस्तु दृढ प्रतिज्ञेनें अविश्रांत श्रम करून प्राप्त करून घेण्याचे कामी जी धडाडी घालावी लागते तेंच साहस जोपर्यन्त शत्रू दूर असतो तोपर्यन्त अनेक विचार व तर्कवितर्क लढवून जयाची कसोशी करणे सोपें असतें. परंतु शत्रू जेव्हां अगदी जवळ किंबहुना अगदीं सन्मुख येऊन भिडतो, तेव्हां सर्व सैन्य एकत्र करून त्यावर चाल करणे एवढाच कायतो उपाय उरतो. अशा वेळीं जो जितक्या वेगाने चाल करून जाईल तितका तो आपले शत्रूस खात्रीने पादाक्रांत करील."

प्रचंड विजेता नेपोलियन बोनापार्ट हा लढाईपूर्वी सर्व परिस्थितीचा दक्षतेनें विचार करून, कांहीं तासांनी लढाईतील हालचालींची मांडणी व त्यांचा नकाशा आगाऊच करून ठेवीत असे. आमच्या चरित्रनायकाला त्या अद्‌वितीय पराक्रमी वीराचे रांकेंत बसविण्याची इच्छा नाहीं परंतु खऱ्या वीराखेरीज रणांगणावर दुसऱ्या लोकांना आपले मागोमाग कोण नेण्यास समर्थ होईल? हजारों सैनिकांना मृत्यूच्या दाढेंत घेऊन जाणे सोपें काम नाहीं. शिवाजी महाराजासारखी उन्मादिनी शक्ती अलौकिक आत्मत्याग, धाडस, शौर्य हे गुण ज्यांचे अंगी असतात तोच लोकांना आत्मसमर्पण करण्यास उत्तेजन देऊ शकतो. इतरांस ते केवळ असंभवनीय आहे.

वरि सुरेशचंद्र यांचे ठिकाणी ही दिव्य शक्ति होती व आत्मत्याग झळकत होता, म्हणूनच केवळ परकीय देशाचा रहिवाशी असूनही विजातीय सैनिकांना आपल्या मागोमाग येण्यास त्यांना उत्तेजन देऊन यश संपादन करतां आलें. दृष्टांतादाखल एका सामान्य गोष्टीचा उल्लेख केला तर अनुचित होणार नाहीं. जेव्हां सुरेशचंद्र सॅण्टाक्रूझ शहरांत असत तेव्हां ब्राझिलमधला एक रहिवाशी त्यांचे अंगचे गुणावर इतका मुग्ध झाला होता कीं, त्यांचे पदरीं राहण्याकरितां केवळ त्यानें आपले नांव पलटणींत दाखल केलें होतें.

२७ सुरेशचंद्राचा विवाह

वाचकांना हें स्मरत असेलच की सुरेशचंद्र यांचा व रायों-डि-जैनिरो येथील एका वैद्यकन्येचा बरेच दिवस प्रेम-परिचय होता. दोघेहि एकमेकांवर मनापासून प्रीति करीत होतीं; व त्याच युवतीला संतुष्ट करण्याकरितां सुरेशचंद्रानें सैन्यांत साधारण प्रतीच्या शिपायाची नोकरी मोठ्या संतोषानें पत्करली होती. सुरेशचंद्राचा हा आत्मत्याग पाहून ती तरुणीसुद्धां त्यांवर अत्यंत लुब्ध झाली होती. तथापि मध्यंतरीचे काळांत दोघेहि दूर असल्यामुळे, बरेच दिवसांत एकमेकांचे दर्शन सुद्धां झालें नव्हते. या मध्यंतरीच्या काळांत पुष्कळ तद्देशीय सधन तरुण तिच्या पाणिग्रहणाची अपेक्षा करून दीर्घप्रयत्न करीत होते. परंतु शेवटपर्यन्त ती सुरेशचंद्राना विसरली नाहीं. तिचें अतःकरण शुद्ध होतें, व तिचा निश्चय दृढ होतां. सर्वांच्या मागण्यांचा अव्हेर करून या अपरिचित भारतवासी तरुण वीराची मूर्ति आपले हृदयसिंहासनावर अचल बसवून ती त्याची प्रेमपूजा करीत असे. जेव्हां सुरेशचंद्र यांना लेफ्टनंट कर्नलचा हुद्दा मिळाला व सर्वत्र सन्मान होवून ते राजधानींत आले, तेव्हां दीर्घकाल विरहावस्थेत काढलेल्या त्या जोडप्याची प्रेमभेट झाली. पुढें मोठ्या समारंभानें त्यांचा विवाहोत्सव उत्तम प्रकारें झाला. त्या राजनगरांतील अनेक थोर पुरुष या विवाह-समयीं हजर होते. सुरेशचंद्रांची मातापितरें व आप्तेष्ट जरी येथून–

हजारों कोस दूर होते तरी त्या ठिकाणीं त्यांचे तद्‌देशीय मित्रही पुष्कळ होते. तेथील घरंदाज लोकांमध्ये त्यांना चांगला मान मिळत असे. राजनगरीतील एक बडे जमीनदार व धनवान गृहस्थ सुरेशचंद्रांचे फार स्नेही होते. त्यांचें नांव मि. पुनांडो असे होते. त्याचप्रमाणे आणखी कित्येक थोर व्यक्तींशीं त्यांचा चांगला परिचय होता. परदेशांत असूनही या सर्व मित्रांचे सहवासांत त्यांना घरच्या मंडळीचा ओढा कमी जाणवला. ब्राझिलमध्ये सपत्नीक राहून ते आपला काळ मोठ्या सुखाने घालवीत असत. त्यांना इ० स० १८९२ मध्ये एक पुत्ररत्न झाले. त्याचे वय आज सुमारे २८-२९ असेल.

२८ निथेरायचें युद्‌ध

सन १८९३ मध्ये ब्राझिल देशांत बंड पुकारण्यांत आलें. शत्रूच्या लोकांनी चोहोंकडून राजधानीला वेढा दिला. सरकारी फौजेची युद्‌धाकरिता बिलकूल तयारी नव्हती. म्हणून तेथल्या रहिवाशांची पाचावर धारण बसली. शेवटीं किल्यावरून मारा करण्याची जेम तेम तयारी करून ब्राझिल सरकारनेंहि युद्‌ध पुकारले.

राजधानीजवळची खाडी शत्रूंच्या जहाजांनी भरून गेली होती. वीर सुरेशचंद्र यांना एका मोठ्या पथकानें अधिपत्य देण्यांत आलें होतें. दोहीं बाजूंच्या तोफांची सरबत्ती सुरू झाली. तोफा, घोडे व सैनिक यांच्या ध्वनीप्रतिध्वनीनें जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ उडाला होता. कित्येक घंटे युद्ध झाल्यानंतर शत्रूंना कळून आलें कीं, राजधानीत प्रवेश करणे सोपे काम नाहीं. जहाजांवरील शिपायांनी आपली फौज तेथे उतरविण्याचा हरप्रयत्न केला. परंतु सरकारी तोफखान्याच्या माऱ्यापुढे त्यांचा टिकाव लागेना. दोहोंबाजूंनीं तोफांचे गोळ्यांचा वर्षाव सारखाच होत होता. लवकरच शत्रूची हिंमत खचली. राजधानी काबीज करणे फार कठीण आहे असे पाहून, शत्रूनें अपला मोर्चा निथेरायवर फिरविला. लवकरच निथेरायमध्यें भयंकर तोफांच्या गोळ्यांचा पाऊस पडूं लागला. आपले फौजेनिशी सुरेशचंद्र येथेच होते. त्यांचे जवळ शत्रूच्या मानानें पुरेशा तोफा किंवा फौज मुळीच नव्हती.

अशा पेंचांत शत्रूकडील तोफांच्या भयंकर माऱ्यापुढे त्यांनी आपले प्राण कसे वांचवावेत ? सुमारे चार घंटे झाले तरी गोळ्यांचा वर्षाव कमी होईना. रात्र असल्यामुळें युद्धास भयंकर स्वरूप आले होतें. थोड्याच वेळांत निथेरायमधील मोठमोठालीं प्रसिद्ध स्थळे जमीनदोस्त झाली. निथेरायचे किनाऱ्याजवळ फौज नाहीं अशी खात्री होतांच शत्रूनीं आपले पायदळ तेथें उतरविलें. ती फौज निथेराय शहराकडे मोठ्या वेगाने चाल करून जाऊं लागली. निथेरायमधील

फौजेची फार भयंकर स्थिती झाली. तिच्यावर एका बाजूनें अस्मानांतून गोळ्यांचा वर्षाव होत होता व दुसरीकडून चालून येणाऱ्या पायदळाच्या शीघ्र तोफांचा भडिमार चालू झाला. चाल करून येणारे सैन्य इतक्या वेगानें येत होतें कीं, त्यांना रोखून धरणे फार असंभवनीय होतेंः अशा वेळीं सुरेशचंद्र यांनीं जिवावर उदार झालेले असे निवडक शंपन्नास लोक घेतले व शत्रूच्या भडिमार करणाऱ्या तोफा सर करण्याकरितां ते पुढे सरसावले. आपल्या शिपायांना नानाप्रकारें उत्तेजन देत देत, ते काळ्याकुट्ट अंधारात मोठ्या
वेगानें चालले होते. इतक्यांत शत्रूला त्यांची येण्याची चाहूल लागली, व 'तुम्ही कोण आहां?' असा आवाज आला सुरेशचंद्रांनी उत्तर दिलें, "आम्ही सरकारी फौजेंतले शिपाई आहोत.
" शरण या नाहीं तर प्राणास मुकाल " असें
शत्रूकडील लोक म्हणाले. वीर सुरेशचंद्र यांनी मोठ्या धिटाईनें उलट जबाब दिला कीं, " प्रजातंत्र सरकारचे शिपाईगडी शत्रूस शरण
जात नसतात. " हा जबाब मिळतांच त्यांचेवर अग्निवर्षाव होऊं लागला. तोफा सर करूं इच्छिणाऱ्या शिपायांची हिंमत खचली व ते
घाबरून जागींच थबकले. सुरेशचंद्र यांनीं मागें फिरून पाहिलें व पुनः ते त्यांना उत्तेजन देऊन म्हणाले " भाईहो, शत्रूजवळ तोफा आहेत, व ते लोक आपल्या नजीक आले आहेत, म्हणून ब्राझिलचे शूर पुत्र मृत्यूला डरतात काय ? हा पहा, पवित्र भारतभूमीचा हा पुत्र पांच मिनिटांचे आंत शत्रूच्या तोफा हिसकावून घेतों. "हें धीर देणारें भाषण ऐकतांच सुरेशचंद्रांचे सैनिकांना स्फुरण चढलें व ते दृढ प्रतिज्ञा करून शत्रूवर–

– हल्ला करण्यास सरसावले. ते पाहतांच सुरेशचंद्रांनी " या, भाई हो, चला," असे म्हणत, शत्रूवर इतक्या त्वेषानें व जिवाची पर्वा न करतां हल्ला केला की, शत्रू कडील लोकांचे धैर्य गळालें व ते सैरावैरा पळू लागले. सुरेशचंद्रांनी व त्यांचे फौजेने त्याला आपल्या भाल्यांनीं जमीनदोस्त केले. या विजयाने युद्धाचे सारें पारडे फिरले. प्रजातंत्र सरकारची सरशी झाली., सुरेशचंद्र यांचा हा छापा 'बालाक्वाहा' येथील हल्ल्याप्रमाणें प्रसिद्ध आहे.

वाचक हो, असा कोण हिंदपुत्र असेल की, ज्याचे हृदयांत ही हकीगत वाचून राष्ट्राभिमानाची ज्योत पेटणार नाहीं ? सुरेशचंद्र यांचे सेनानायकत्वाचा वृत्तांत ऐकून कोणत्या हिंद वीरास लष्करांमध्ये उच्च दर्जा मिळू नये असे वाटेल? जीवाची पर्वा न करतो फ्रेंच रणभूमीवर स्वामीकार्याकरितां झटणाऱ्या कोणत्या स्वाभिमानी हिंदपुत्रला काळ्या गोऱ्या मधील चालू असलेला तीव्र भेद खपेल ? सुरेशचंद्र यांचे या विजयाने हिंददेशचे कीर्तीला अजरामर केले यांत तिळमात्र शंका नाहीं.

आज आपला भारत देशही प्रजासत्ताक (Republic) झाला आहे. आज सुरेशचंद्रासारखे धडाडीचे शूर वीर भारताचे रक्षण करण्याकरितां लप्करांत शिरतील तितके हवे आहेत. अशा शूरवीरांचे प्राणास कस्पटाप्रमाणें समजणारे शौर्याची भारतास जरुरी आहे. भूदल, नौदल, व हवाईदल, या सर्व लष्करी खात्यांत भारतभूचे शूरवीरपुत्र आपल्या शौर्यानें मोठमोठ्या हुद्याचे जागांवर विराजमान झालेले दिसतील तो दिवस-

– इतिहासांत महाभाग्याचा होय या घनघोर संग्रामानंतर ते पुष्कळ लोकांना कैद करून परत फिरले. परंतु कांहीं वेळाने ते रणांगणावर फिरतीवर आले. अकस्मात त्यांना एका कुलीन घराण्यांतील एक स्त्री भेटली ती लढाईत मेलेल्या आपले मित्राचें प्रेत शोधीत होती. तिनें सुरेशचंद्रांना कबरस्थानाकडे जाण्यास रस्ता दाखविण्याची विनंती केली म्हणून ते तिच्या पुढे चालू लागले. ते फार दूर गेले नसतील तोंच शत्रूकडील दोघां मनुष्यांनीं त्याजवर सुरे घेऊन हल्ला केला. परंतु सुरेशचंद्रांनी तलवार उपसतांच दोघेही पळून गेले. थोड्या वेळाने आपल्या छावणीकडे परत येतांना त्यांना तेथील भयंकर दुर्गंधीमुळे चक्कर येऊ लागले. म्हणून ते जवळच्या दगडावर बसले. थोड्याच वेळाने त्यांचे हात-पाय गार पडूं लागले; व ते निचेष्ट पडले. कांहीं वेळाने दोघा अनोळखी माणसांनी त्यांना अर्धनग्न स्थितीत दवाखान्यांत पोचते केले. तीन दिवस ते बेशुद्ध स्थितींत होते. आठ दिवसांनी त्यांना बोलण्याची ताकद आल्यावर ते आपला ठिकाणा डॉक्टरांना सांगण्यास समर्थ झाले. सुरेशचंद्राला पाहून त्यांच्या मित्रांना, आप्तांना व सैन्यांतील शिपायांना अत्यानंद झाला.

उपसंहार

वंगवीर सुरेशचंद्र विश्वास यांचे जीवनचरित्र अशा रीतीनें आश्चर्ययुक्त व विचित्र घटनापूर्ण असें झालें आहे. ज्याला परक्यांनी भ्याड व भागुबाई

असे ठरविलें त्याच बंगाली राष्ट्रामध्ये कर्नल सुरेशशंद्र यांच्यासारख्या वीरांचा जन्म होणें ही राष्ट्राला अत्यंत सुदैवाची व स्पृहणीय गोष्ट होय.

निथेरायचे युद्धांत विजयी झाल्यानंतर आपले पत्नीसह ते मोठ्या सुखानें कालक्रमणा करूं. लागले. सामाजिक व आर्थिक अनुकूलता झाल्यानें त्यांच्या आनंदांत विशेषच भर पडली. वयाचे चवदावे वर्षापासून संसारसागरांतील भयाण तरंगावर सांपडून ते हेलकावे खात होते. ईश्वरी कृपेने व अत्यंत परिश्रमानें ते सुखरूप किनाऱ्याला लागले. दारिद्य व दैन्य यांचे अभ्रपटल नाहींसें होऊन त्यांचं भाग्याकाश निर्माण झालें, त्यांची कीर्ति चोहोंकडे ऐकू येऊं लागली. विलायतचें फार जुनें, प्रसिद्ध व हिंदुस्थानचा द्वेष करणारें वर्तमानपत्र " टाइम्स " त्याला देखील कबूल कररावें लागलें कीं, " ज्या बंगाली राष्ट्रांत एकाच वेळीं, कर्नल सुरेश विश्वास, जगदीशचंद्र बोस व अतुलचंद्र चट्टोपाध्याय उत्पन्न होतात त्या लोकांचा इंग्रजांनीं तिरस्कार करणें हें अत्यंत अयोग्य आहे." यापुढें मोठ्या दुःखानं लिहावें लागतें कीं, सुरेशचंद्र यांजकडे जीं पत्रे पाठविलीं जात तीं सर्व परत येत. मागाहून असे कळलें कीं, ते कर्नलपदाधारी झाले. त्यांच्या आप्तांनीं जीं पत्र पाठविलीं त्यांचा उलट जबाब कांहींच आला नाहीं. पुढें रायो डि-जैनिरो येथील ब्रिटिश वकिलातीकडे पाठविलेला पत्राचा जबाब आला कीं, कर्नल सुरेशचंद्र विश्वास हे ता. २२ आगष्ट १९०६ इ. रोजीं स्वर्गवासी झाले. त्यांचे परमस्नेही मि. पुनांडो लीमोस साहेब यांचे हातचे पत्रांतील–

मजकूर खालीं दिला आहे; त्यावरून आपले चरित्रनायकानें ब्राझिलमध्ये कशी कीर्ति संपादन केली, हें वाचकांच्या चांगले ध्यानांत येईल. ते पत्र सुरेशचंद्र यांचे वडिलास आले होतें. मि. पुनांडो लीमोस साहेब हे ब्राझिलमध्ये एक सन्माननीय धनाढ्य गृहस्थ आहेत, म्हणून त्यांचे पत्राचे महत्त्व विशेष आहे.

रायो-डि-जानिरो.
१२ मार्च १८९४

महाराज,

आपले चिरंजीव ब्राझिल प्रजातंत्र सरकारी सैन्यांत नोकर होते है आपाणास ठाऊक आहेच. ते एका सैन्यविभागावर पहिल्या नंबरचे लेफ्टनंट कर्नलचे हुद्यावर होते. आजही ते त्याच हुद्यावर आहेत. सांप्रत निथेरायचे लढाईत अप्रतिम शौर्य उत्साह व युद्धनिपुणता दाखवून ते पूर्ण यशस्वी झाले आहेत. त्या संस्मरणीय रात्री भयाण युद्धक्षेत्रावर शत्रूनी सुमारे सहा घंटे तोफांचा भडिमार करून त्यांना वेढून धरले होते. माझे परमाप्रय बंधु व आपले सत्पुत्र आपल्या फौजेनिशी तेथेच होते. पन्नास माणसांची तुकडी बरोबर घेऊन शत्रूचा घोर हल्ला परतविण्याकरितां त्यांना शत्रूवर तुटून पडावें लागले. त्यांची येण्याची चाहूल शत्रूला लागून त्यांनी 'कोण आहे ?' असा सवाल केला. सुरेशचद्रांनी आम्ही प्रजातंत्र, सरकारचे शूर शिपाई आहे असा जबाब दिला.' हत्यारे ठेवून शरण या' असा शत्रूच्या पक्षानें हुकूम केला; त्यावर सुरेशचंद्रांनी उत्तर दिले की, ' प्रजातंत्र सरकारचे शिपाई शत्रूला हार जाणे जाणत नाहीत 'हे उत्तर देऊन त्यांनीं आपले लोकांना शत्रूवर त्वेषाने हल्ला करण्यास सांगितले. शत्रूकडील लोकांनों त्यांवर तोफांचे गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. सुरेशचंद्रानी थोडा विचार करून आपले सांथीदारांना उद्देशून ते म्हणाले,

‘ भाई हो, शत्रु तोफा सज्ज करून आपले अगदीं नजीक आहे; ब्राझिल देशांतली थोर पुत्र मत्यूला कैंव्हांही भीत नाहीत हा पहा पवित्र हिंद भूमीचा पुत्र पाच मिनीटांचे आंत शत्रूच्या तोफा काबीज करतो. चला, व्हा तयार, या माझ्या मागें चला!, इतकें बोलून त्यांनी शत्रूवर घोर हल्ला चढविला. शत्रू त्याच्या माऱ्याला घाबरले व थोड्याच वेळांत त्यांनी तोफा सर केल्या. अशाप्रकारें सुरेशचंद्र त्या लढ्यांत विजयी झाले.

फेब्रूवारी अखेरपर्यन्त (१८९४) सुरेशचंद्र माझेच घरी होते. त्यांचा आमचे घराण्याशी निकड स्नेह आहे. त्यांनी एके दिवशी मला असे सांगितले की. " जर कदाचित मी येथून चालतां झालों तर माझे घरीं एक पत्र पाठवून कळव कीं सुरेश जेथे जेथे गेला तेथे तो विजयी झाला व त्यांचा पुत्रही त्याप्रमांणें विजयी होईल." आपली नूतन परिणीत पत्नी व वर्ष सव्वा वर्षांचे लहान बालक या दोघांना टाकून ते कोठे गेले आहेत देव जाणें ! त्यांची ही अपत्ये आम्हास नेहमी पूज्यच ओहेत. यांच्या पालनपोषणाला मुबलक संपत्ति ते ठेवून गेले आहेत. व ईश्वरकृपेने मीहि थोडा फार श्रीमंत आहे. समाजामध्ये सुरेशचंद्र हे अत्यंत धैर्यशाली व व्यवहारांत अत्यंत सभ्य व विद्वान म्हणून प्रख्यात अहित. त्यांच्या मस्तकांत नेहमी नव्या नव्या कल्पना व नव नवे विचार खेळत असतात व ते नेहमी शास्त्रीय व्यासंगांत दंग असतात. ते संकटाला स्वावलंबनानें तोंड देतात अलीकडे ते तत्वज्ञान शास्त्राचा अभ्यास करण्यांत गढून गेले आहेत. वैद्यशास्शांत ते इतके निष्णात आहेत की, त्यांनी माझे पत्नीच्या पायाला झालेला पक्षवात आठ दिवसांत बरा केला. कोणाही डांक्टराला तो बरा करतां आला नव्हता. त्यांनी माझे पत्नीला औषधपाणी मुळीच दिले नव्हते.

शरीरावर बोटांनीं केवळ स्पर्श करून त्यांनीं तिला निरोगी केलें."

अशा रीतीनें वीर सुरेशचंद्र यांचे जीवन चरित्र अनेक प्रसंगांनी चटकदार व अद्भुत कादंबरी प्रमाणें मनोरंजन झालें आहे. आजमितीस सुरेशचंद्र यांची मातापितरें हयात नाहीत. मरणसमयीं सुरेशचंद्र यांचे वय ४६ वर्षांचे होते. त्यांचा वडील मुलगा आज सुमारे २८-२९ वर्षे वयाचा असेल.

प्रतिकूल परिस्थितींत सुद्धां प्रतिभाशाली पुरुष ईश्वरकृपेने आपले प्रचण्ड कर्तृत्वशक्तीचे जोरावर आपली उन्नति कशी घडवून आणतात याचे हें चरित्र एक उत्तम उदाहरण आहे.

परिशिष्ट.

कर्नल सुरेशचंद्र यांनी आपले काकांना पृष्कळ पत्र पाठविली, त्यांतील कांही महत्त्वाचे पत्रांचा येथे अनुवाद केला आहे.

सॅण्टाक्रूझ ८ फेब्रूवारी १८८७.

काकासाहेब:

वर सॅण्टाक्रूझचा ठिकाणा वाचून मी आज रायोडि-जैनिरो येथे नाही हैं आपणास कळेलच. माझी तेथून या ठिकाणी बदली झाली आहे. सॅण्टाक्रूझ हें एक लहानसे गांव आहे. काही वर्षापूर्वी हें ब्राझीलच साम्राटाची खाजगी मिळकत होती. व त्यांचे गुलाम येथे शेती करीत असत. परन्तु आपल्या उपजत व सर्वलोकविदित दयाद्रतेला अनुसरून सम्राटाने सर्व गुलामांना –

– दास्यमुक्त केलें आहे, त्यामुळे हें गांव अगदीं ओस पडलें आहे. आज हें गाईम्हशींना चरण्याकरितां उपयोगांत आणले आहे. मी सांप्रत घोडेस्वरांच्या पथकांत नोकर आहे, या जागेवर मला घोडे वगैरे जनावरांवर देखरेख करावी लागते. या सर्व घोड्यांना व दुसरे जनावरांना चराईकरितां ह्या गांवची विस्तीर्ण पहाडी जमीन राखून ठेवण्यांत आली आहे. काकासाहेब, सैनिक लोकांमध्ये एका मानाच्या जागेवर माझी नेमणूक झाली आहे, हे कळविण्यास मला आनंद वाटतो. ज्या हुद्यावर मी आज आहे त्यास फ्राससी भाषेत केबो० डी० एस्को याड्रा व इंग्रजीत कार्पोरल (लष्करी जमादार) म्हणतात. आतां मी माझे हाताखालचे सैनिकांना मर्जीप्रमाणे हुकूम करूं शकतो. मी जेथे जेथे जाईन व ज्या ज्या जाती पाहीन त्यांच्यविषयी आपणास सविस्तर लिहीत असावें असे आपलें नेहमी मला सांगणे असते. परंतु तसे करूं गेल्यास मला मोठमोठी बाडें लिहावी लागतील माझे युरोपियन मित्र देखील मजशी संभाषण केल्यावर माझी योग्यता व अनुभव पाहून मला अशाच प्रकारची माहिती लिहून काढण्यास सांगतात. वास्तावक अध्ययन फार धोडे केले आहे. मी प्रायः सर्व शास्त्र थोडीफार पाहिली आहेत व सुमारे सात भाषाही मला येतात. इंग्रजी, फरारिसी, जर्मन, स्पॅनिश, व पोर्तुगीज भाषांत मी चांगला बोलू शकतों व इटालियन, डॅनिश व डच भाषाही थोडयाथोड्या जाणतो परंतु मी त्या गणणेत धरीत नाही. घरांतून निघताना बरोबर एक पै देखील मी घेतली नव्हती. एखाद्या नंग्या फकीराप्रमाणें मी घर-दार सोडलें. निघताना परमपूज्य मातेचे दर्शन करीन ही इच्छा होती

परंतु जगान्नियंत्या परमेश्वराची इच्छा यापेक्षा कांहीं निराळीच होती! यामुळे या आयुष्यांत तिचें दर्शन करण्याचे सौभाग्य मला लाभले नाहीं.

हाय I ससारांत मी सांप्रत एकटा आहे व असाच एकटा राहीन! जै माझे दैवी असेल तेंच होईल. सर्वशक्तिमान् परमेश्वराचे निःसीम राज्यांत एकटे भटकत राहून सृष्टिजननीचे शोभासौंदर्य अवलोकन कर वे एवढेच काय तें मला सुख आहे. खरी मैत्री व सत्य प्रेम हीं जगांत अत्यंत दुर्मिळ आहेत. एका पंडिताने म्हटले आहे कीं, " पृथ्वीवर निवास करणे म्हणजेच अभिनव जगत् निर्माण करणे होय " मी कल्पनाशक्तिच्या मगदुराप्रमाणें एक दिव्य निकेतन निर्माण केले आहे. एके दिवशी मी त्याच ठिकाणी माझ्या प्रियतम जननीचे दर्शन करीन. आपण सर्वजण मला पृथ्वीवर एक भटकणारा असे समजत आहां. काका, आजपर्यंत हजारो लोकांनी याच तुमच्या भटक्या सुरेशसमोर मोठ्या अदबीनें माना लवविल्या आहेत; फार काय, मोठमोठाले जंगली हिंस्रपशु देखील त्याच तुमच्या चक्कर मारणारे सुरेशसमोर गोगलगाईसारखे गाय होऊन दास बनतात. जगांत शेकडों मनुष्य आपले घरांतून निघून देशोधडीं गेल्यावर कफल्लक भिकाऱ्याप्रमाणें राहतात व तुम्हीं टाकलेला-दुर लाटलेला हा तुमचा 'सुरी' देखील त्यापैकींच एक आहे. काका, उद्देशरहित भटकणाऱ्यांच्या गोष्टी मला फार आवडतात. त्यांना दिलेले 'भटके' हें नांवही मला फार आवडतें. यांचे कारण असें कीं, ज्याला तुम्ही नांवें ठेवतां तेंच माझे बाबतींत सर्वस्वी खरें आहे. चक्कर मारणारा किंवा भटक्या कोणाला म्हणतात ? ज्यांस राहण्याला घरदार नसेल व ज्याची काळजी वाहण्यास कोणीही नसेल; अशासच ना ? एक प्रकारें ते लोकहि ज्ञानी असतात. कारण कोणतेहि प्रकारचे बंधन नसल्यामुळे, नेहमीं नव्या तत्वांशीं अनुसंधान करण्यांत त्यांचे प्रयत्न चालू असतात. पृथ्वीवर जीं सुखें अज्ञात असतील ती प्राप्त

---

१ सुरी हें सुरेशचंद्र यांचं बालपणाचें आवडतें नांव होतें ; त्यांचे काकां नेहमी याच नांवानें त्यांस हाक मारीत असत.

करून घेण्याकरितां त्यांची नेहमी खटपट चालू असते, व त्या सुखाचे ते अधिकारी बनतात. अखिल ब्रह्माण्डनायक परमेश्वराचे अवाढव्य व विचित्र विश्वाचे ते उत्तराधिकारी असतात व ह्याच दृढ विश्वासानें ते दुसरे कोणाकडेहि दृष्टि न ठेवतां, मोठ्या आनंदानें नाचत, बागडत व गात गात आपले दिवस घालवित असतात. धन्य त्याचें जीवत.

आजपर्यंत कोणती मनःसंयमन करणारी व्यक्ति या माधुर्यमय संसारास भुलून त्यावर आषक झाली नाहीं ? वीरांमध्यें प्लेटो किंवा विजयी पासेमियसपासून जर्मनसम्राट् बिल्यमपर्यंत शूर योद्धे, कवि व तत्ववेत्त्यामध्ये झोरोस्तर, प्लेटो, होरेसपासून शेक्सपियर, सिलार, गटे व
गोल्डस्मिथपर्यंतचे सर्व कवि व तत्त्ववेत्ते हे सर्व महाशक्तिसंपन्न अतिशय अभिमानी शुद्धांतः-करणाचे, कुशाग्र बुद्धीचे व प्रचंड कल्पनाशक्तीचे पुरुष होते. या सर्वांच्या चरित्र्याकडे पाहतां त्यांना सांसारिक सुखसंपत्तीची लालसा नव्हतो, इतर लोक जें जाणण्याकरिता अगदीं व्यथित होतात त्याकरितां हें कधींहि उत्सुक नसत. असे लोक नेहमीं आपापल्या मनोवृत्तीप्रमाणें व्यक्त असतात. उच्चतर कल्पनाशक्तिचे प्रभावानें हें लोक गहन विचारशील बनतात त्यांचें चितन, कल्पना व कार्य ही नेहमीं नानाप्रकारची विचित्र रहस्यें व भेद व त्याचप्रमाणें अनेक तत्त्वें यांजकडे लागून राहतात. सर्वसाधारण सामाजिक अथवा विषयासंबंधी व्यापारांत त्यांची लेशमात्र देखील आसक्ति नसते. त्यांची चित्तवृत्ति नेहमी उच्च वातावरणाकडे धांव घेते. व खरोखर असेंच व्हावयास पाहिजे. कारण आत्मा हा परमात्म्याचा अंश असल्यामुळे त्याचे ठिकाणीही दिव्यज्ञानसंपन्नता आहेच. असो. ह्या उच्च विचाराच्या गोष्टी आतां पुरे करतों. आपण लिहिले की, मी कलकत्त्यास येऊन आपणा सर्वांचे दर्शन करावें व पित्राज्ञेप्रमाणे वागावे. परंतु मी तसे करण्यास अगदी ससमर्थ आहे. तेथे मजकरितां आतां कोण राहिले आहे ? जी मजवर प्राणाहून अधिक प्रेम करीत होती व –

आजही करीत आहे, व जिच्यावर मी प्रेम करीत होतों व आज करीत आहे, ती माझा माता या मर्त्य लोकांतून दिव्य लोकांस गेली आहे. मी धैर्य धरून तिची वाट पहात या दूरच्या देशांत रहात आहे व येथेच राहीन. माझ्या प्रिय मातेला प्राप्त झालली सद्‌गति मला मिळेपर्यंत मी येथेच राहीन. ती अनंत मार्ग आक्रमीत अदृश्य स्थितीत मेघमण्डलाच्या अंतर्भागी असलेल्या माणिमय देव मंदिराचे दरवाजाशीं माझी वाट पहात असेल;

आपला फार दिवसांपासून दूर असलेला आपला भटक्या पण अद्‌याप जिवंत असलेला

-सुरी-
रायो-डि-जैनिरो

पत्र २ रें

काकासाहेब,

मला वाटते कीं, हे पत्र पोंचण्यापूर्वी माझे आणखी एक पत्र तुम्हांस पावले असेल. आज मोठ्या दुःखानें व वैराग्यपूर्ण अतःकरणानें हें मी तुम्हांस लिहित आहे. आमचे इस्पितळांमध्यें पीतज्वरानें फार माणसें मरत आहेत. या कारण मुळ मला पूर्वीचे ठिकाण सोडून दुसरे ठिकाणौ राहाययास जावें लागत आहे. या भयंकर उष्णतेच्या दिवसांत मला कोणत्या प्रकारचे कष्ट सहन करावे लागतात याची एकवेळ कल्पनाच करावी. आजकाल येथील उष्णत मान ९३ अंशापासून ९८ अंशापर्यंत नेहमी असते. याशिवाय येथे रोगाग्नि पेटला असल्यामुळे, आमचे सैन्यांतील पुष्कळ शिपाई घायाळ झाले आहेत. हे पत्र लिहित असतांना देखील त्या
घायाळांचा करुण स्वर माझे कानी पडत आहे. काकासाहेब, अमच्या पूर्वीच्या इस्पितळांचे भीषण स्वरूपाची कल्पना देखील आपणास होणार नाही. तें इस्पितळ या नव्या जागेपासून–

- दूर नाहीं. जेथें पूर्वी ख्रिस्ती सांप्रदायाचे जुनें मंदिर होतें, त्याच जागेत आतां जुनें इस्पितळ आहे. आज देखील तेथील एक खोली माझे ताब्यांत आहे; कारण की, मला माझे सर्व सामान तेथून हालवितां आले नाहीं. तसेंच मला तेथे औषधें तयार करण्याकरितां जावें लागत असतें (मी वैद्यकी शिकलों आहे.) व शस्त्रक्रियेची उपकरणेहि तेथेच आहेत. जर मी येथे कांहीं दिवस राहिलों तर चांगला सर्जन बनेन. मी साधारणतः सर्व प्रकारची शस्त्रक्रिया करतो. व डॉक्टर लोकहि मला योग्य माहिती देऊन, माझे कामाला अनुमोदन देतात. ज्या इस्पितळासंबंधी मी आपणांस लिहीत आहे ते एका मोठ्या भवनामध्ये आहे. त्यांत वरून प्रकाश येण्याची उत्तम सोय केला आहे. जेव्हां भवन रिकामें असते तेव्हां तें एखादे कबरस्थानाप्रमाणे भयाण दिसते. साधारणपणे या घरांत शिरतांच पाहणारांना भीति वाटते. कामानिमित्त मला त्या ठिकाणी वारंवार जावें लागतें परंतु मला त्याचे बिलकुल भय वाटत नाहीं. कारण भूत पिशाच्चें ही मनुष्याला त्रास देण्यास येतात ह्यावर माझा विश्वास नाहीं. मी भूतप्रेतादिकांसंबंधी नेहमी पुष्कळांचे तोंडून ऐकतो, परंतु तो मनुष्याचे मनाचा खेळ आहे असा माझा समज आहे. तथाहि प्रेतात्मे आहेत ही गोष्ट मी मान्य करतों; व तें भुतांहून फार भिन्न असतात. परंतु ज्या घरांत भूतपिशाच्चें आहेत असें सांगण्यात येतें, त्या घराची बरीक प्रत्यक्ष भुतापेक्षां आधक भीति वाटतें. काकासाहेब, मला मृत्यूचें बिलकुल भय वाटत नाहीं. मरत असलेल्या कित्येक रोग्यांना मी औषध पाजले आहे. त्यांतलि अनेक लोक मेले आहेत; त्याच वेळी मलाहि मृत्यु आला असता तर चांगलें झालें असतें. परंतु ज्या अर्थी परमेश्वरानें मला अशा भयंकर परिस्थितींतून सुरक्षित ठेवलें आहे. त्या अर्थी एकदां आपलें दर्शन करावें ही एक गोष्ट मला मोठ्या आनंदाची व उत्साहवर्धक वाटतें. पुरें, यापुढें या मनांत उत्पन्न करणाऱ्या खेद गोष्टीचा मी पुनरुच्चार करीत नाहीं.

काकासाहेब, मी लवकरच या ठिकाणाहून दुसरे गांवी जाणार आहे व माझे प्रवासाचा खर्च निघेल असे कांहीं खेळ करणार आहे. कारण प्रवास करणें हें मला फार आनंददायक वाटतें; व देश फिरतां फिरतां एक वेळ स्वदेशीं जावें व मायभूमीचें व मातेंवें दर्शन घ्यावें अशी भावना मनांत उत्पन्न होते. गति ही सृष्टिनियमानुसार असून जीवनाचे एकमेव लक्षण आहे म्हणून मी नेहमी भ्रमण करीत राहणार. याशिवाय ब्राझिल देशांत जाऊन लष्करी नोकरी करून उच्चपद मिळवीन ही माझी महत्त्वाकांक्षाहि सफल झाली आहे. दुसरें घृणार्ह स्त्रीजातीच्या चांगुलपणाची कसोटी पाहणें हा एक उद्‌देश व एका सैनिकानें माझ्या मित्राचा जो अपमान केला त्याचा सूड उगविणें हा दुसरा उद्‌देश होता. हे दोन्ही ही माझे उद्‌देश आज पूर्ण झाले आहेत.

मी स्त्रीजातीचें नांव घेण्याचे सोडून दिलें आहे व माझे मित्राचा वैरी माझ्या येण्यानें भिऊन फरारी झाला आहे. अनेक कष्ट सहन केल्यावर हें घडून आलें. सर्कशींतील सुखकर जीवनक्रमाचा त्याग करून मी लष्करीपेशा खखुशीनें पत्करला व या गोष्टीला आज जवळ जवळ तीन वर्षे होत आली आहेत. सन १८८९ चे मे महिन्याचे १० वे तारखेस माझी लष्करी नोकरीचे कराराची मुदत संपते. तेव्हां ह्या नोकरीला रामराम ठोकून कांही तरी नवीन कार्य मी हाती घेईन; व वर लिहिल्याप्रमाणें स्वच्छंदानें दशपर्यटण करीन. आतां मी अशी कांहीं अजब चीज शोधून काढतों की जिच्या योगानें मी एखादे सुखवस्तु गृहस्थाप्रमाणे सुखानें व आनंदानें राहीन. आजपर्यंत मी नेहमीं भले मनुष्याप्रमाणेंच वागत आलो. मी बालवयांत घरी असतांना कधीं कधीं फार दुष्ट वर्तन केलें तथापि तेव्हां देखील मी सरळपणा व प्रामाणिकपणा न सोडतां सन्मार्गाने वागलों व स्वाभिमान राखला. आतां आकाशांत उडणारे पक्ष्याप्रमाणें मी पुनः स्वतंत्र होऊन प्रफुल्ल मनानें नानादेशांत भ्रमण करीत नवीन सुखांचा अनुभव घेत राहीन, हा विचार डोक्यांत आला म्हणजे अंतःकरण उसळू लागते. पदार्थविज्ञानशास्राच्या साहाय्यानें मी नवीन शोध व यंत्ररचना करीन. सिंह, वाघ, अस्वल, हीना, हत्ती वगैरे पशूंना शिकविणे हें मोठें ज्ञानाचे काम नाहीं, असे मला वाटूं लागलें आहे.

मी एक बोलणारा मुखवटा, विजेची बाहुली व एक पारदर्शक बालिका तयार करीन. ह्या देशांत व अन्य देशांतहि या तीन अजब चिजा दाखवून मी पुष्कळ धन संपादन करू शकेन.

काकासाहब, धन संपादन करण्यास ज्याजवळ डोके आहे व जो अंत करणाचा सरळ आहे, त्यास ह्या संसारांत सुलभ रीतीनें धनप्राति होते. मनुष्यप्राणी स्वतःची काळजी वाहतो व परमेश्वर सर्व प्राणीमात्रांची चिंता वाहतो. परमात्म्याची शक्ती सर्वांहून श्रेष्ठ आहे. संसार हा परमेश्वर स्वरूप मानिल्यानें आपले मनाप्रमाणें सर्व गोष्टी यथाक्रम चालतात.

सर्व श स्त्रांत चिकित्साशास्त्र श्रेष्ठ आहे. मी त्याचा फार काळजीपूर्वक अभ्यास केला आहे व त्यांतील मूल तत्त्वांचाहि अभ्यास केला आहे. मी ह्या शास्त्राला फार मान देतो, परंतु त्याच्या अध्यापकांना मात्र मी निष्ठुर समजतों. याचे कारण त्यांचे ठिकाणीं औदार्याचा पूर्ण अभाव आहे. हें होय. औदार्याभावी पंख नसलेल्या अप्सरेप्रमाणे त्यांची त्या शास्त्रांतील निपुणता व्यर्थ आहे

सव शास्त्रांमध्ये सृष्टिकर्त्या परमेश्वराशी तादात्म्य करून देणारे व त्याची प्रगति करून देणारे अध्यात्मशास्त्र हे अत्यंत श्रेष्ठ आहे. आज या बाबतीत मी फारस विवेचन करू इच्छित नाही. पण पुढील पत्रीं तसे करण्याचा प्रयत्न करीन.

आपला नम्र
सुरेश.

पत्र तिसरें.

काकासाहेब,

फार दिवसांत आपणाकडून पत्र आले नाहीं. मागचे वर्षी मी आपणांस पत्र लिहिले होते. त्या पत्रांत मी येथील बंडाचा उल्लेख केला होता. त्यांत मझया संबंधाची हकीकत मी लिहिली होती. परंतु अद्याप त्याचे आपणांकडून उत्तर आलें नाहीं. युद्धखात्यांत माझी नोकरी योग्य प्रकारे चालली आहे. प्रथम सार्जण्टचे हुद्यावरून मला ब्रिगेडडोअर हुद्यावर नेमलें आहे.

याचे पूर्वी पुष्कळ दिवस मी यापेक्षां उच्च दर्जाचे हुद्दावर ऑफिसर म्हणून काम करीत होतो. परंतु मी विदेशी आहे, ही गोष्ट माझ्या उन्नतीला प्रतिबंधक होत आहे. तथापि ब्राझिल देशांत राहून मला आता पुरीं सहा वर्षे झालीं आहेत. पुष्कळ मोठमोठे लोक मला चांगल्या प्रकारे ओळखतात या गोष्टोमुळे माझी बाजू थोडीफार यशस्वी राहील. येथील व्यवहार पोर्तुगीज भाषेत चालतो हे आपणास ठाऊकच आहे. मी प्रथम येथे आलो तेव्हां मला ही भाषा बिलकुल येत नव्हती. आतां मी या भाषेचा अभ्यास केला आहे. सांप्रत मी अशा एक अशा एका मोठ्या हुद्दावर आहे कीं, त्या जागी काम करण्याची लायकी आमच्या रेजिमेण्टमध्ये फार थोड्यांचे अंगी आहे प्रजातंत्र राज्याच्या प्रेसिडेंटाकडून सरकारी रीतीनें जाहीर होतांच मी आपणाला माझ्या बढतीविषयी लिहीन. गेल्या वर्षी मी जी कामगिरी बजाविली तिची प्रशंसा सरकारी कागदोपत्री दाखल झाली आहे. एक दिवस देखील वेढा पडूं न देता मी यशःप्राप्ति घडवून आणली. अलीकडे रायो-ग्राण्डी-डी-शिऊल शहरांत बंडखोर लोक जनतेवर जुलूम करीत आहेत माझी तेथे जाण्याची फार इच्छा आहे. परंतु अद्याप आम्हांला तेथे जाण्याचा हुकूम झालेला नाहीं.

पिताजींजी आजकाल प्रकृति कशी आहे ? ते कधी माझी आठवण करतात काय? ईश्वरकृपेनें मी खुशाल आहे एवढे त्यांना जरूर सांगा आतां मी भला गृहस्थ झालो आहे. हूडपणा टाकून दिला आहे समाजांत मी प्रतिष्ठितपगानें राहतो; सर्व लोक मला मान देतात. बदमाषाशीं बदमाषाप्रमाणे, ठकाशी ठक व भल्याशी भलाईनें अशा रीतीने मी वागतो.

मी स्वकष्टाने सुशिक्षीत झालों आहे. कारण चवदावे वर्षापासून आजतागाईत मजकरिता कोणीहि प्रयत्न केला नाहीं. आज माझे वय ३२ किंवा ३४ वर्षांचे असेल. - माझे वय मला पूर्णपणे ठाउक नाहीं. तें कितीहि असो, पण ह्या वयांत माझे डोक्याचे केस पांढरे झाले आहेत हें मोठे आश्चर्य आहे. माझ्या टाळूवरील बहुतेक केस नाहींसे होऊ टक्कल पडले आहे.सर्वांना –

सर्वांना माझी हकीकत देत जावी, जे मला ओळखतात त्यांजविषयों मला हकीकत लिहिण्याचे करावें.

आपला आज्ञधारक
सुरेश.

पत्र चौथें

रायो-डि-जैनिरों
१०-१-१८९४

काकासाहेब,
या खेपेस पुनः आपणास पत्र पाठविण्यास उशीर झाला, याचे कारण फार दिवस मी वातरोगानें बिछान्यास खिळलेला आहे. सुमारे एक वर्षभर या रोगानें मला पछाडलें आहे. गेल्या आठवड्यांत पारा व आयोडाइण्ड ऑफ पोटॅश यांच्या एका औषधी खुराकसेवनानें माझा हा रोग कमी झाला आहे; परंतु या औषधांत कांही विषरी लक्षण दिसून आल्यानें मी त सेवन करण्याचे सोडून दिले आहे. डॉक्टरांचे असें मत आहे की या रोगाचो पीडा पूर्ण नाहीशी होण्यास फार दिवस लागतील. पत्राबरोबर दोन छाया चित्रेंही पाठवीत आहे. एक आपणा करितां व दुसरा माझ्या पिताजीकरितां. माझे पिताजी या समयास इहलोकीं नाहींत अशी मनोधारणा कां होत आहे समजत नाहीं. ब्राझिल देशांतील पायदळ पलटणीच्या दुय्यम सेनापतीच्या पोषाखांत आपले पुत्राला पाहून त्यांना समाधान वाटेल. कारण कीं हा गौरव त्यांचा आहे. या पोशाखाला समारे ३००० रु. खर्च आला, हें ऐकून आपणाला आश्चर्य वाटेल. हा सुंदर पोषाख रेशमाचा असून तो शुद्ध सोन्याच्या कलाबतूनें व जरीच्या नकशीनें सुशोभित केला आहे.

मी माझे प्रिय पत्नीचाही एक फोटो पाठवीत आहे. हा विवाह होण्यापूर्वीचा आहे. मी माझें पुत्राचा फोटो अद्याप काढला नाही म्हणून तो पाठविला नाहीं.

या नंतर निथेरायचे युद्धानंतर घडलेल्या अपघाताची हकीगत लिहि लेली आहे.

आईबाप, पालक व शिक्षक यांनीं दक्षता घ्यावी.

★

लहान मुलें कोणतीं पुस्तकें वाचतात याची दक्षता घेणें जरूर
आहे. पानचट प्रेमकथा, बाष्कळ गोष्टी वाचण्यापेक्षां
राष्ट्रभाषेचें ज्ञान होईल अशी पुस्तकें, शौर्य धैर्य धाडस
यांच्या सत्यकथा किंवा शूरवीरांचीं चरित्रें हीं पुस्तकें
मुलांच्या हातीं बक्षीस म्हणून द्यावींत हीन विचार
प्रवर्तक वाङ्मय वाचणारी मागची पिढी
आज लोकराज्यांत आळशी व निकामी
झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या
देशांत राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ,
यंत्रविशारद व वैमानिक दल
नौदल यांतील प्रवीण
लोकांची उणीव आहे
असें आपले

महामंत्री सांगतात

—: त्याचा नीट विचार करा. :—